म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०११
REFBK-0013756

८५६२३
२०।३।८९.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# भगवान श्रीकृष्ण
## आणि
# भगवद्‌गीता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ७५६२३ दि: १०/७/६१
क्रमांक २०९९ नों: दि: २०।३।७१

स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७३०५६
REFBK-0013756

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

प्रकाशक--
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम
धंतोली, नागपूर-१

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ५३ वें
(श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्व अधिकार सुरक्षित)

मुद्रक--
श्री. दि. गो. लवाटे
मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस,
महाल, नागपूर-२

मूल्य रु. १.६०

# प्रास्ताविक–

स्वामी विवेकानंदकृत 'भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्‌गीता' हें आमचें नवीन प्रकाशन प्रसिद्ध करतांना आम्हांला आनंद होत आहे. आमच्या आश्रमाने प्रकाशित केलेल्या 'स्वामी विवेकानंद ग्रंथावली'च्या दहा खंडांत, भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्‌गीता यांच्यासंबंधी स्वामी विवेकानंदांनी निरनिराळ्या ठिकाणीं जे विचार प्रकट केले आहेत त्यांचें संकलन प्रस्तुत पुस्तकांत केलें आहे. स्वामीजींनी भारतांत आणि परदेशांत दिलेल्या व्याख्यानांत, शिष्यांशीं त्यांचीं जीं संभाषणें झालीं त्यांत आणि त्यांच्या लिखाणांत हे विचार अभिव्यक्त झाले आहेत. भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य व्यक्तिमत्त्वाचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे आणि ज्ञान, भक्ति, कर्म व योग या सार्‍यांचा सर्वोच्च आविष्कार त्यांच्या जीवनांत कसा दिसून येतो याचें स्वामीजींनी प्रस्तुत पुस्तकांत केलेलें विवरण मौलिक स्वरूपाचें आहे. मेंदू, हृदय व हात यांच्या शक्तीचा विकास कसा करून घ्यावा आणि या विकासाच्या साहाय्याने मोक्षाची वा पूर्णत्वाची प्राप्ति कशी करून घ्यावी यासंबंधीची शिकवण भगवंतांनी गीतेंत दिली आहे. स्वामी विवेकानंदांनी गीतेच्या या समन्वयात्मक शिकवणुकीवर अचूक बोट ठेवलें आहे आणि गीतेंतील शक्तिदायी व जीवनदायी उपदेश भारताच्या सद्यःस्थितींत किती आवश्यक आहेत याचें त्यांनी सुंदर दिग्दर्शन केलें आहे. अनासक्ति हा भगवान श्रीकृष्णांच्या जीवनांतील केंद्रीय भाव असून या भावाने युक्त होऊन ईश्वरार्पण बुद्धीने खरें लोकहित कसें साधावें याविषयीची त्यांची शिकवण खरोखरच अमोल आहे. स्वामी विवेकानंदांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने श्रीकृष्णांचें जें सर्वांगपरिपूर्ण जीवनचित्र रेखीव आणि वेधक शब्दांत सर्वांसमोर उभें केलें आहे त्याचा सखोल प्रभाव मनावर पडल्या-वांचून राहत नाही. जीवनाच्या विभिन्न क्षेत्रांत कार्य करणार्‍या व्यक्तींना प्रस्तुत पुस्तकांत प्रकट झालेल्या विधायक विचारांपासून खचित मार्गदर्शन लाभेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

दि. १५–१०–१९६४ —प्रकाशक

# अनुक्रमणिका


१. भगवान श्रीकृष्ण आणि त्यांचा संदेश .. .. १
२. गीतेविषयी कांही विचार .. .. .. ३१
३. श्रीकृष्ण .. .. .. .. ५५
४. गीता–१ .. .. .. .. ६८
५. गीता–२ .. .. .. .. ८७
६. गीता–३ .. .. .. .. ९८



# भगवान श्रीकृष्ण

## आणि

# भगवद्गीता

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. 93556

---o---

## भगवान श्रीकृष्ण आणि त्यांचा संदेश

हिंदूंच्या मतानुसार आपलें हें जग सतत लाटांसारख्या गतीने चाललें आहे. तें एकदा वर उठतें, उन्नतीचा कळस गाठतें आणि नंतर खाली येऊन कांही काळ त्याच अवनतीच्या गर्तेंत पडून राहतें-- जणु पुनरुत्थानासाठी शक्तिसंचयच करीत असतें! सागरावरील उत्तुंग लाटांप्रमाणे निरंतर उत्थान आणि पतन, पतन आणि उत्थान अशा गतीने हा जगत्प्रवाह सारखा चालला आहे. समस्त ब्रह्मांडाला अथवा समष्टीला जो नियम लागू आहे तोच त्यांतील प्रत्येक पिंडाला अथवा व्यष्टीलाहि लागू आहे. मनुष्यसमाजाचे सर्व व्यवहार ह्याचप्रमाणे लाटांच्या गतीने चाललेले असतात. राष्ट्राराष्ट्रांचे इतिहासहि याच सत्याची साक्ष देत आहेत. भिन्न भिन्न राष्ट्रें उठतात आणि पडतात,--उत्थानानंतर पतन आणि पतनानंतर फिरून पूर्वीपेक्षा अधिक जोमाने पुनरुत्थान, हीच त्या सर्वांची कहाणी आहे. ही तरंगगति, हा चक्रनेमिक्रम सर्वत्र आणि सर्वदा चालूं आहे. धर्मजगतांतहि ही अशीच गति दृग्गोचर होते. प्रत्येक जातीच्या आध्यात्मिक जीवनांत उत्थानपतनांचीं युगें येत असतात. जेव्हा एखाद्या जातीचा पतनकाळ येतो तेव्हा असें वाटूं लागतें की तिची सारी जीवनशक्ति

अजीबात नष्ट होऊन गेली आहे, उभी जात नेस्तनाबूद झाली आहे. परंतु त्या अवस्थेंत ती हळूहळू शक्तीचा संचय करीत असते, आणि नवबलसंपन्न होऊन फिरून प्रबल वेगाने वर उठत असते-- तिच्या जीवनप्रवाहांत फिरून एक प्रचंड लाट उफाळत असते. कधी कधी तर या उत्थानाला महापुराचें स्वरूप प्राप्त होत असतें, आणि असें नेहमीच आढळून येतें क़ी, उंच उसळलेल्या त्या प्रत्येक लाटेच्या शिरोभागीं एखादा महापुरुष सभोवार आपल्या तेजाची मंगल प्रभा पसरवीत विराजमान आहे. एकीकडे, त्या लाटेच्या उसळण्याचें, त्या जातीच्या अभ्युत्थानाचें तो महापुरुष स्वतःच कारण असतो तर परत दुसरीकडे, ती लाट उसळविणाऱ्या शक्तीचें तो स्वतःच कार्यहि असतो. उभयतांची एकमेकांवर याप्रमाणे क्रिया-प्रतिक्रिया होत असते, आणि म्हणून त्या महापुरुषाला एका दृष्टीने स्रष्टा किंवा जनक तर दुसऱ्या दृष्टीने सृष्ट किंवा जनित असेंहि म्हणतां येईल. समाजावर ते आपली प्रचंड शक्ति प्रयुक्त करीत असतात तर उलट समाजच त्यांच्या त्या प्रचंड शक्तीच्या अविर्भावाचें कारण असतो. हे असले महापुरुषच अखिल जगाला ललामभूत झालेले थोर तत्त्वचिंतक होत. हेच जगांतील सर्वश्रेष्ठ आचार्य--मंत्रद्रष्टे ऋषि होत, हेच जीवनदायी श्रेष्ठ भावांचे दिव्य वाहक--ईश्वराचे अवतार होत. . . .

मानवजातीच्या इतिहासाचें परिशीलन केल्यास तुम्हांस दिसून येईल की, विश्वाच्या कल्याणाप्रीत्यर्थ वेळोवेळीं हे अवतार धराधामीं आले आहेत, आणि त्यांच्या जन्मापासूनच जणु त्यांचें जीवनोद्दिष्ट सुनिश्चित झालेलें आहे. त्यांचें जीवनव्रत जणु सुस्पष्टपणें ठरून गेलेलें आहे. जीवनांत आपल्याला काय करावें लागणार आहे हें जणुकांही त्यांनी जन्मापासूनच जाणलें असतें,

पक्कें ठरविलेलें असतें. स्वतःच्या भावी जीवनकार्याचा संपूर्ण आराखडा जणु त्यांच्या दृष्टीसमोर आखलेला असतो, आणि तुम्हांला आढळून येईल की, त्या आपल्या नियोजित योजनेपासून ते कधी चुकूनहि बोटभरदेखील ढळत नाहीत. याचें कारण हेंच आहे की, कांही ठरलेलें कार्य करण्यासाठीच ते येत असतात, जगाला एक संदेश देण्यासाठी ते येत असतात, आणि आपलें अवतारकृत्य संपवून निजधामीं परत जात असतात. त्यांच्या जीवन-लीलेचें स्वरूप असें असल्यामुळे ते कधीच तर्क-वितर्कांचें जाळें विणूं जात नसतात. असें कधीतरी तुमच्या वाचण्यांत किंवा ऐकण्यांत आलें आहे काय की, या महापुरुषांनी, या आचार्यवर्यांनी जगाला जो उपदेश दिला आहे तो त्यांनी तर्क-विचारावर आधारून दिला आहे ? त्यांच्यांतील एकानेहि कधी तर्क-विचाराची कास धरलेली नाही. ते सरळ सरळ ठाम सत्य सांगून जात असतात. तर्क-वितर्कांच्या उठाठेवीची त्यांना खरोखरच गरज काय ? त्यांना सत्य प्रत्यक्ष दिसत असतें. त्यांना स्वतःला सत्य दिसत असतें, इतकेंच नव्हे तर ते इतरांनाहि सत्य दाखवूं शकत असतात. 'ईश्वर आहे की नाही' असें जर तुम्ही मला विचाराल आणि मी जर 'आहे' म्हणून उत्तर देईन तर, 'तुमच्या म्हणण्याला काय प्रमाण आहे' असें तुम्ही मला तात्काळ विचाराल. आणि मग या गरीब बिचाऱ्या मला तुमचें समाधान करण्यासाठी डोकें खाजवून खाजवून नि आपलें सारें तर्कबळ एकवटून कांही प्रमाणें दाखल करावीं लागतील ! पण तेंच जर तुम्हीं येशू ख्रिस्तांकडे जाऊन त्यांना विचारलें असतें की, 'ईश्वर म्हणून कांही आहे काय ? ' तर त्यांनीहि उत्तर दिलें असतें, 'होय, आहे'. त्यावर, 'त्याच्या अस्तित्वाविषयी कांही प्रमाण आहे काय ?' असें तुम्हीं

विचारतांच त्यांनी नक्कीच म्हटलें असतें, 'प्रमाण ? ईश्वर तर हा मी तुमच्यासमोरच उभा आहे--बघा, डोळे भरून बघा.' सारांश, ईश्वरासंबंधीची या सर्व महापुरुषांची जी धारणा असते ती त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचें फळ असते, ती त्यांनी तर्क-विचारांनी बनविलेली नसते. तुमच्याआमच्याप्रमाणे त्यांना अंधारांत चाचपडावें लागत नाही, प्रत्यक्ष दर्शनाचें बळ त्यांचे ठायीं वसत असतें. मला समोर हें टेबल दिसत आहे. तुम्हीं कितीहि तर्कटें लढवून इथे हें टेबल नाही असें सिद्ध करण्याचा हवा तितका खटाटोप केला तरीहि त्याच्या अस्तित्वावरील माझा विश्वास तुम्ही कदापि चाळवूं शकणार नाही. कारण मी तें प्रत्यक्षच बघत आहें. माझ्या या विश्वासाप्रमाणेच या महापुरुषांचा स्वतःच्या आदर्शा-वरील, स्वतःच्या जीवनव्रतावरील आणि त्याहिपेक्षा म्हणजे स्वतः आपल्यावरील विश्वासहि दृढ, अटळ आणि अढळ असतो. या दीप्तिमंत नररत्नांचा खुद्द स्वतःवर जसा विलक्षण दांडगा विश्वास असतो तसा इतर कुणामधेहि आढळून येणार नाही. . . .

या सर्वच्या सर्व महान् आचार्यांच्या ठायीं तुम्हांला हें एक व्यवच्छेदक वा सर्वसामान्य लक्षण आढळून येईल की, त्यांच्यांत स्वतःविषयी अगाध विश्वास वसत असतो. इतका आत्मविश्वास अगदीच असाधारण कोटींतील असल्यामुळे आप-ल्याला तो नीट समजूं शकत नाही. आणि समजूं शकत नाही म्हणूनच, हे सर्व महापुरुष स्वतःसंबंधी जें कांही बोलून गेले आहेत त्याचे तऱ्हेतऱ्हेचे विचित्र अर्थ लावून तें उडवून देण्याचा आपण यत्न करीत असतों. स्वतःच्या प्रत्यक्षानुभूतीसंबंधी ते जें कांही बोलून गेले आहेत त्याचा अर्थ लावण्यासाठी लोक खंडो-गणती मतमतान्तरें शोधून काढीत असतात. आपण स्वतःसंबंधी

त्यांच्यासारखी भावना करूं शकत नाहीं, आणि म्हणून अर्थातच आपण त्यांना समजूं शकत नाहीं यांत अस्वाभाविक कांहीच नाही.

त्याचप्रमाणे त्यांचे ठायीं अशी कांही शक्ति वसत असते की, जेव्हा ते बोलूं लागतात तेव्हा अलम दुनियेला त्यांचें म्हणणें ऐकावेंच लागतें. त्यांच्या बोलण्यांतील शब्दन् शब्द थेट हृदयालाच जाऊन भिडतो, ऐकणाऱ्या प्रत्येकाला स्तंभित करून त्याच्यावर प्रचंड प्रभाव गाजवितो. पाठीशीं ती शक्ति नसेल तर केवळ शब्दांत खरोखर काय ठेवलें आहे ? तुम्ही कोणत्या भाषेंत बोलत आहां, बोलतांना शब्दांची रचना कशी करीत आहां यावर वस्तुतः काय अवलंबून आहे ? तुम्ही व्याकरणशुद्ध बोललां काय किंवा मोठीं सरस व्याख्यानें दिलीं काय, त्याचा काय उपयोग ? तुमची भाषा मोहक अलंकारादिकांनी नटविलेली असली किंवा नसली म्हणून काय झालें ? प्रश्न आहे, जगाला देण्यासारखें तुमच्या-जवळ कांही आहे की नाही याचा. हें कांही केवळ कथा-कीर्तनें ऐकणें नव्हे, ही देण्याची आणि घेण्याची बाब आहे. तुमच्यापाशी देण्यासारखें कांही आहे काय ? असेल तर द्या शब्द तर फक्त तुमचें हें देणें लोकांपर्यंत पोहोचवून देऊं शकतील, ते निव्वळ एक माध्यम आहेत. आपला असा अनुभव नाही काय की, कधी कधी एक शब्दहि न उच्चारतां आपल्या हृदयांतील भाव आपण दुसऱ्या व्यक्तींत संचारीत असतों ? संस्कृत भाषेंत एक जुना श्लोक आहे--

"चित्रं ! वटतरोर्मूले वृद्धा शिष्या गुरुर्युवा ।
गुरोस्तु मौनं व्याख्यानं, शिष्या उच्छिन्नसंशयाः ।।"

--"केवढें आश्चर्य हें ! बघा, या वृक्षाखाली एक तरुण गुरु

आणि त्याचे वृद्ध शिष्य बसलेले आहेत. मौनच गुरूंचा उपदेश आहे आणि त्यानेच शिष्यांच्या सर्व संदेहांचा निरास होत आहे."

सारांश, कधी कधी असेंही घडतें की ते तोंडावाटें एक शब्दहि काढीत नाहीत, आणि तरीसुद्धा इतरांच्या अंतःकरणांत सत्याचा संचार करीत असतात. ते जगाला कांहीतरी देण्यासाठी आलेले असतात. त्यांच्या पाठीशीं ईश्वरी शक्ति उभी असते. ते ईश्वराचे दूत म्हणून आलेले असतात, त्यांच्याजवळ जणु ईश्वराचा 'बिल्ला' असतो. म्हणूनच ते जगाला हुकूम करीत असतात आणि जगालाहि माथा लववून तो पाळण्यासाठी तयार व्हावें लागत असतें. येशू ख्रिस्त अधिकारवाणीने ठासून उपदेश करीत असल्याचें बायबलांतील वर्णन तुमच्या लक्षांत आहे ना ? ते म्हणत आहेत,--"म्हणून तुम्ही जा, जाऊन जगांतील सर्व जातींना शिकवा. मीं तुम्हांला ज्या गोष्टींचा आदेश दिला आहे, त्या साऱ्या अमलांत आणावयास त्यांना शिकवा." आपल्याला या जगाला विशेष कांहीतरी शिकवावयाचें आहे असा प्रचंड आत्मविश्वास त्यांच्या शब्दाशब्दांतून, त्यांच्या वाक्यावाक्यांतून ओसंडत असलेला दिसून येतो. ईशदूत किंवा अवतार म्हणून जग ज्यांची पूजा करीत असतें त्या प्रत्येक महापुरुषाचे ठायीं हा असला भाव वसत असल्याचें तुम्हांला आढळून येईल.

हे सर्व महान् आचार्य या पृथ्वीवरील सजीव ईश्वरी मूर्तिच होत. यांना सोडून आपण आणखी उपासना करावयाची तरी कुणाची ? मी डोळे मिटून मनाने ईश्वराची कल्पना करण्याचा यत्न करतों, परंतु बऱ्याच प्रयत्नानंतर मला आढळून येतें की, एक अगदी खोटी आणि तुच्छ धारणाच मी अखेर करून बसलों आहें. गेलों शिवाची मूर्ति घडविण्यासाठी आणि अखेर

बनला आहे वानरच ! तसल्या ईश्वराची उपासना केल्याने पुण्याऐवजी पापच पदरीं पडावयाचें ! मग डोळे उघडून मी या महापुरुषांच्या, या भूदेवांच्या खऱ्याखुऱ्या जीवनाकडे बघतों तेव्हा मला आढळून येतें की, ईश्वरासंबंधी माझी अगदी उच्चांतली उच्च धारणादेखील त्यांच्यापुढे सपशेल कःपदार्थच ठरते. . .

ईश्वरासंबंधी धारणा करण्याचा मीं कितीहि यत्न केला तरी त्यांत यश मिळणें कधीहि शक्य नाही. परंतु या महापुरुषांच्या दैनंदिन जीवनांतील खऱ्याखुऱ्या घटना आपल्या दृष्टीसमोर आहेत. त्या कपोलकल्पित दंतकथा नाहीत कल्पना कर-करून आपल्याला त्यांची धारणा करावी लागत नाही, त्यांच्या जीवनांत आपल्याला प्रेम, दया, पावित्र्य वगैरेंचे असे खरेखुरे दृष्टान्त आढळतात की जे आपण आपल्या कल्पनेनेहि रंगवूं शकणार नाहीं. मग आपण या साऱ्या नरदेवांच्या चरणीं लोटांगण घालून ईश्वर म्हणून त्यांची पूजा केल्यास खरोखर आश्चर्य तें काय बरें ? . . .

प्रथम आपण श्रीकृष्णांकडेच वळूं या. तुम्ही सर्वांनीच गीता वाचली असेल, आणि म्हणून तुम्हां सर्वांनाच माहीत असेल की त्या संपूर्ण ग्रंथाचा सार-सिद्धान्त आहे--अनासक्ति. सदा अनासक्त राहा. आपल्या हृदयांतील समस्त प्रेमावर फक्त एकाजणाचाच अधिकार आहे. आणि तो एकजण कोण ? तोच की ज्याच्यांत कधीही बदल होत नाही, जो कधी परिणाम पावत नाही. आणि असा तो कोण आहे बरें ? ईश्वर ! परिवर्तनशील अशा कोणत्याहि वस्तूला किंवा व्यक्तीला आपलें हृदय अर्पण करण्याची घोडचूक कधीहि करूं नका, कारण ती दुःखाला मूळ होईल. एखाद्या विशिष्ट व्यक्तीला तुम्ही आपलें हृदय समर्पित

करून द्याल तर तिच्या मृत्यूच्या पश्चात् संसारांत चहूकडे अंधारच अंधार पसरलेला तुम्हांला वाटेल, आयुष्य भारभूत आणि ओकेंओकें होऊन बसेल. आज ज्याला अभिन्न मानून तुम्हीं आपलें हृदय अर्पण करून टाकलें आहे, तोच कदाचित् वैमनस्य उत्पन्न होऊन उद्या तुमचा वैरी बनून तुमच्या हृदयाला डागण्या देईल. ज्या पतीला आपला हृदयेश्वर मानून तुम्हीं आपलें प्रेम समर्पित केलें आहे, तोच उद्या तुम्हांला विटून दूर होतांच स्फुंदून स्फुंदून रडणें तुमच्या कपाळीं येईल. ज्या पत्नीला आपल्या हृदयसिंहासनाची सम्राज्ञी बनवून तुम्हीं आपलें प्रेमसर्वस्व तिला अर्पण केलें आहे, तिची आणि तुमची निर्घृण कालाने ताटातूट करतांच तुमच्या सुखाचे मनोरे ढासळून पार धुळीस मिळून जातील. लक्षांत ठेवा, संसारांत हें असें चालावयाचेंच, कुणालाहि तें टाळतां यावयाचें नाही हीं पार्थिव सुखें क्षणभंगुर आहेत, स्वप्नांसारखी ठिसूळ आहेत. म्हणून भगवान श्रीकृष्णांनी गीतेंत अमृतमधुर उपदेश केला आहे की, एकमात्र ईश्वर--केवळ तो प्रभु भगवानच अपरिणामी आहे. त्याच्या प्रेमाला कधी ओहोटी लागत नाही, त्यांत कधी खंड पडत नाही, तें अपरिवर्तनीय आहे. आपण कुठेहि असलों आणि कांहीहि केलें तरी त्या दयामयाच्या प्रेमांत कधीच फरक पडत नाही, आपल्याप्रत तो सर्वदा सारखाच प्रेममय असतो. त्याच्यांत कधीहि कांही परिवर्तन होत नाही. आपण कांहीहि केलें तरी तो कधी रागावत नाही. आणि रागावेल तरी कसा नि कां बरें ? तऱ्हेतऱ्हेच्या खोड्या करून तुमच्या लहानग्याने तुम्हांला कितीहि त्रास दिला तरी तुम्ही त्याच्यावर कधी रागावत असतां काय ? तुम्ही-आम्ही पुढे काय होणार आहोंत, किती महान् होणार आहोंत हें काय ईश्वराला ठाऊक

नाही ? त्याला नक्कीच ठाऊक आहे की, लवकर म्हणा की उशीरा म्हणा आम्ही सर्वच पूर्णत्व पावणार आहोंत. आणि म्हणून आपल्यांत अगणित दोष असले तरी तो त्रासत नाही. त्याच्या सहनशीलतेला सीमा नाही. करिता, आपण त्यालाच हृदयसर्वस्व अर्पण केलें पाहिजे, त्याच्यावरच प्रेम केलें पाहिज़े, आणि त्याच-बरोबर त्याचेच आविष्कार--त्याचींच रूपें मानून जगांतील सर्व प्राण्यांवरहि प्रेम केलें पाहिजे. हाच मूलमंत्र जपत आपण जीवनाचा मार्ग चोखाळीत गेलें पाहिजे. आपल्या पत्नीला हृदयांत स्थान द्या--अवश्य द्या, पण पत्नी म्हणून नव्हे, "न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवति, आत्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति."*--"पति जें पत्नीवर प्रेम करतो तें पत्नीसाठी नव्हे तर तिच्यामध्ये तोच आत्मा आहे म्हणून. पत्नीमध्ये भगवान आहे म्हणूनच ती पतीला प्रिय वाटत असते."

वेदान्त-दर्शन म्हणतें की, प्रेमळ पत्नी पतीवर प्रेम करतांना 'मी पतीवरच प्रेम करीत आहें' असें जरी समजत असली किंवा पुत्रवत्सल जननी 'मी पुत्रावरच प्रेम करीत आहें' असें जरी मानत असली, तरी वस्तुत: ईश्वरच त्या पतीच्या किंवा पुत्राच्या अंतर्यामीं अवस्थान करून पत्नीला व जननीला पतिपुत्रांकडे आकर्षीत आहे. ईश्वरच एकमेव आकर्षणाची वस्तु होय, त्याच्या-खेरीज आकर्षणाची वस्तु आणखी कोणतीच नाही. तथापि पत्नीला किंवा जननीला या वस्तुस्थितीची बहुधा जाणीव नसते. परंतु अजाणतां त्याहि खऱ्या मार्गानेच जात असतात, अर्थात् ईश्वरावरच प्रेम करीत असतात. पण हें सारें अजाणतां होत असल्यामुळे तें दु:ख-कष्टास कारण होत असतें. जाणून घेऊन

*बृहदारण्यक उपनिषद् ४,५.

केल्यास तेंच मुक्तीचें कारण बनतें. आमच्या शास्त्रांची शिकवणूक अशीच आहे. जिथे कुठे प्रेम आहे, जिथे म्हणून आनंदाचा एक बिंदुहि विद्यमान आहे, तिथे तिथे ईश्वर विद्यमान आहे असें निश्चित समजा. कारण, ईश्वर स्वयं रसस्वरूप आहे, प्रेमस्वरूप आहे, आनंदस्वरूप आहे. जिथे तो नाही तिथे प्रेमहि असू शकत नाही.

श्रीकृष्णांच्या समस्त उपदेशांची प्रणाली ही अशीच आहे. समग्र भारतामधे, समस्त हिंदुजातीमधे ते हा भाव प्रविष्ट करून गेले आहेत. परिणामीं, हिंदुलोक कोणतेंहि कार्य करतांना, फार काय पण पाणीदेखील पितांना म्हणत असतात की, या कर्माचें जर कांही शुभ फळ असेल तर तें ईश्वरार्पणमस्तु--ईश्वराला अर्पण असो. कोणतेंहि सत्कर्म करण्याचे वेळीं बौद्ध लोक म्हणत असतात की, ह्या सत्कर्माचें फळ अवघ्या जगाला मिळो आणि जगांतील दुःख-कष्ट माझ्याकडे येवोत. हिंदुलोक म्हणत असतात, "आमचा ईश्वरावर विश्वास आहे, आणि ईश्वर सर्वव्यापी, सर्वशक्तिमान आणि सर्व आत्म्यांचा अंतरात्मा आहे. म्हणून आम्ही जर आपल्या सत्कर्मांचीं फळें त्याला समर्पण केलीं, तर तोच सर्वश्रेष्ठ स्वार्थत्याग होईल, आणि तीं फळें समग्र जगताला निश्चितच प्राप्त होतील."

भगवान श्रीकृष्णांच्या उपदेशाचा हा केवळ एक पैलू आहे. त्यांचा दुसरा एक महान् उपदेश असा आहे की, जे ह्या जगामधे वास करून कार्य करीत असतात, पण समस्त कर्मफलें मात्र ईश्वराला समर्पण करितात, ते कधीच अशुभाने लिप्त होत नाहीत. पाण्यांत राहणारें पद्मपत्र पाण्याने अवलिप्त होत नाही, तद्वतच जगांत राहणाऱ्या ह्या व्यक्तिहि पापाने लिप्त होत नाहीत.

प्रबल कर्मशीलता श्रीकृष्णांच्या उपदेशाचा आणखी एक पैलू होय. गीतेचा संदेश आहे--अहोरात्र कर्म करा, निरंतर कर्मरत राहा.

यावर तुम्ही साहाजिकच विचाराल की, मग शांतीची काय वाट ? ती कशी मिळणार ? जन्मभर जर एखाद्या जुंपलेल्या घोड्याप्रमाणे आपल्याला कामच करीत जावें लागणार असेल, आणि खोगीरलगामासहित रस्त्यांतच प्राण सोडणाऱ्या त्या घोड्याप्रमाणे आपल्यालाहि कर्माच्या रामरगड्यांतच मरावें लागणार असेल तर मग आपण जन्मलों तरी कशाला ? आपल्या जीवनाचें मूल्य तरी काय ? मग तर जीवनांत कधीहि शांति लाभण्याची आशाच बाळगावयास नको म्हणावयाची ? या साऱ्याला श्रीकृष्णांचें उत्तर आहे,--"शांतीची आशा आहे--खात्री आहे. तुम्हांला शांती खचितच लाभेल. परंतु, कार्यक्षेत्र सोडून पलायन करणें हा मात्र शांतीचा मार्ग नव्हे." श्रीकृष्णांचें हें म्हणणें पटत नसेल तर एकदा प्रयोग करूनच पाहा ! शक्य असेल तर आपलीं सारीं कर्तव्य-कर्में सोडून एखाद्या पर्वताच्या शिखरावर जाऊन तिथे राहून बघा. तुमचें तुम्हांलाच आढळून येईल की, तिथेहि मन चूप बसत नाही, सारखें इकडे तिकडे भटकत आहे ! एकाजणाने एका संन्याशाला विचारलें--"महाराज, तुम्हांला एखादें उपद्रवरहित मनोरम असें एकान्ताचें ठिकाण गवसलें आहे काय ? हिमालयांत तुम्ही किती वर्षं भ्रमण करीत आहां ?" संन्याशाने उत्तर दिलें, "चाळीस वर्षें." तेव्हा त्या व्यक्तीने फिरून विचारलें, "पण हिमालयांत तर कितीतरी सुंदर सुंदर स्थानें आहेत. त्यांतील एखादें निवडून तुम्ही अजून एके ठिकाणीं स्थायिक कां बरें झालां नाही ?" संन्याशाने उत्तर

दिलें, "मनापायीं! पुरीं चाळीस वर्षें उलटलीं, पण अजूनहि माझें मन मला एके ठिकाणीं शांतपणें ठाण मांडू देत नाही." आपण सर्वचजण म्हणत असतों की 'आम्ही शांतींत राहूं,' पण आपलें मन आपल्याला तसें करूं देईल तर ना!

तुम्हां सर्वांना ती तार्तर पकडणाऱ्या सैनिकाची गोष्ट माहीत असेलच. नगरांत फेरफटका करावयास गेलेला एक सैनिक लष्करांत परत फिरून आपल्या शिबिराजवळ येऊन मोठ्याने ओरडूं लागला की, "मीं एक तार्तर पकडला आहे" तें ऐकून आंतून एकजण म्हणाला, "मग त्याला आंत घेऊन ये." त्या सैनिकाने उत्तर दिलें, "पण तो येत नाही ना!" आंतील सैनिकाने म्हटलें, "तर मग तूं एकटाच आंत ये कसा." बाहेरील सैनिकाने उत्तर दिलें, "पण तो मला तसें करूं देईल तर ना! तो मला आंत येऊंच देत नाही मुळी!"* आपल्या सर्वांच्या मनाचीहि हीच दशा आहे! आपण सगळ्यांनीच 'तार्तर' पकडला आहे! आपण मनाला शांत करूं शकत नाहीं आणि तेंहि आपल्याला शांत बसूं देत नाही वरील गोष्टींतल्या सैनिका-सारखीच आपली गत आहे, आपणहि त्याच्यासारखेच 'तार्तर पकडणारे' आहोंत. आपण सारेच म्हणत असतों—"शांत होऊं या, स्थिर होऊं या." एखादें शेंबडें पोरहि असें म्हणूं शकेल, आणि आपण तसें वागण्यास समर्थ आहों असें मनाशींच समजूंहि शकेल. परंतु खरोखर असला संकल्प अमलांत आणणें बिकट

---

*हिंदी भाषेमधेहि अशीच एक म्हण आहे. तिचा मराठींत अर्थ असा—'मीं तर कांबळ सोडून दिली आहे, पण कांबळच मला सोडीत नाही.' त्या बिचाऱ्याने कांबळ म्हणून जें धरलें होतें तें कांबळ नसून दुर्दैवाने एक अस्वल होतें!

आहे. मीं स्वत: प्रयत्न करून पाहिला आहे. सगळीं कर्तव्यें झुगारून देऊन मीं पर्वताच्या शिखरांकडे धांव घेतली आहे. गहन गुहांत आणि निबिड अरण्यांत मीं राहून पाहिलें आहे. पण त्याने कांहीच लाभ झाला नाही. कारण, मीहि एक 'तार्तर' पकडलेला होता. माझ्या जगाचा पसारा सतत माझ्याबरोबरच येत होता. आपल्या मनामधेच हा 'तार्तर' शिरलेला आहे मग बाहेरील कुणालाहि आपल्या शांतीचा भंग करण्याबद्दल दोषी ठरविण्यांत काय तात्पर्य ? स्वत:तील गडबडीचा दोष बाह्य परिस्थितीवर लोटून आपण म्हणत असतों की, अमुक परिस्थिति मला अनुकूल आहे, तमुक परिस्थिति मला प्रतिकूल आहे म्हणूनच अशी गडबड होत आहे. परंतु वस्तुत: साऱ्या गडबडीचें मूळ जो हा 'तार्तर' तो आपल्या स्वत:मधेच बसलेला आहे. त्याला शांत करा म्हणजे दिसेल की, सर्वकांही शांत, सुरळीत होऊन गेलें आहे.

म्हणूनच श्रीकृष्णांचा आपल्याला उपदेश आहे की, "स्वत:च्या कर्तव्यकर्मांची अवहेलना करूं नका, तीं टाळण्याचा यत्न करूं नका. 'मनुष्या'प्रमाणे तीं पार पाडण्यास सज्ज व्हा, त्यांचें फलाफल काय होईल याचा विचारहि मनाला शिवूं देऊं नका." भृत्याला 'कां' म्हणून प्रश्न विचारण्याचा कांही अधिकार नसतो. सैनिकाला स्वत:ची बुद्धि चालवून तर्कवितर्क करण्याचा कांहीच अधिकार नाही. कर्तव्यपालन करीत जीवन-पथ आक्रमीत चला. करावें लागत असलेलें कार्य लहान की मोठें इकडे विशेष लक्ष देऊं नका. फक्त, आपण जें कार्य करीत आहोंत, तें नि:स्वार्थपणे करीत आहोंत की नाही, एवढें मात्र स्वत:च्या मनाला विचारा. जर तुम्ही खरोखर नि:स्वार्थ असाल तर मग कशाचीच पर्वा नाही. मग कशानेहि तुमच्या उन्नतीचा मार्ग रोधला जाणें शक्य

नाही. आपल्या कर्तव्यकर्मांत डुबून जा. हाताशीं असलेलें कर्तव्य शांतपणें पार पाडीत चला. याप्रमाणे कर्तव्याचा मार्ग चोखाळीत असतां हळूहळू तुम्हांला सत्याची उपलब्धि होईल.

"कर्मण्यकर्म यः पश्येत् अकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ।।"†

—"ज्याला प्रबल कर्मशीलतेमधे शांतीचा अनुभव येतो, आणि परत, परम निस्तब्धतेमधे व शांतीमधे ज्याला प्रबल कर्मशीलता दिसू शकते तोच योगी होय, तोच महापुरुष होय, त्यालाच पूर्णता लाभली आहे, तोच सिद्ध झाला आहे."

एव्हाना तुमच्या लक्षांत आलेंच असेल की, श्रीकृष्णांच्या पूर्वोक्त उपदेशानुसार आचरण करूं शकल्यास जगामधील सगळींच कर्तव्यें पवित्र होऊन जातील. मग जगामधे असें कोणतेंहि कर्तव्य राहणार नाही की ज्याला आपण 'हलकें काम' म्हणून नाक मुरडूं शकूं. कर्तव्य, मग तें कसेंहि असो, त्याची घृणा करण्याचा कुणालाहि अधिकार नाही. तख्तनशीन बादशहा आणि रस्त्यावरील अगदी मामुली माणूस यांच्या कर्तव्यांत, 'कर्तव्य' ह्या दृष्टीने कांहीच फरक नाही. श्रीकृष्णांच्या शिकवणुकीने माणसाला ह्या दिव्य दृष्टीचा लाभ होतो.

* * *

यानंतर, भिन्नभिन्न स्वरूपांत पूजिला जाणारा, स्त्रीपुरुषांचें, आबालवृद्धांचें प्रिय इष्टदैवत असलेला जो श्रीकृष्ण त्याचा आपण विचार करूं. त्याला केवळ अवतार मानून भागवतकारांचें समाधान झालें नाही. ते म्हणतात, " इतर अवतार परमेश्वराचे केवळ अंश होते, पण श्रीकृष्ण मात्र साक्षात् परमेश्वरच होय."

---

†गीता-४-१८

त्याच्या अष्टपैलू चारित्र्याचा विचार केल्यास त्याला अशीं विशेषणें लावलीं जातात यांत कांही आश्चर्य नाही. तो जसा अपूर्व संन्यासी होता, तसाच तो अपूर्व गृहस्थाश्रमीहि होता; त्याच्या ठिकाणीं विलक्षण रजोगुण होता आणि त्याबरोबरच त्याची त्यागवृत्तिहि विलक्षण होती. गीतेच्या अभ्यासाशिवाय आपल्याला श्रीकृष्णाचें व्यक्तिमत्त्व कळणार नाही, कारण स्वतःच्या उपदेशाचें तो स्वतःच मूर्तिमंत उदाहरण होता. सगळेच अवतार स्वतःच्या उपदेशाचें मूर्तिमंत प्रतीकच होते. गीतेचा उपदेष्टा जो श्रीकृष्ण, त्याचें सगळें जीवनच त्या गीतेचें मूर्तिमंत उदाहरण होतें; त्याचें ज़ीवन अनासक्तीचें एक महान् उदाहरणच होतें. त्याने आपलें राज्य सोडून दिलें, त्याची त्याला कधीच चिंता वाटली नाही. ज्याच्या केवळ शब्दाने राजे सिंहासनावरून खाली येत, त्या भारताच्या या नेत्याला स्वतः राजा होण्याची इच्छा नव्हती. तो कृष्ण, गोपींशीं खेळणारा तो कृष्ण, सदैव साधाच राहिला. अहाहा! त्याच्या जीवनाचा तो भव्योदात्त अध्याय समजण्यास अत्यंत कठीण आहे! आणि स्वतःपूर्णतया शुद्ध व पवित्र झाल्याशिवाय तो समजून घेण्याचा आपण प्रयत्नहि करूं नये. वृंदावनांतील रम्य लीलांमधून विविध रूपकांनी व्यक्त झालेलें तें केवढें उदात्त व व्यापक प्रेम होतें, तें भक्तीने धुंद झालेल्या व भक्तिरस आकंठ प्राशन केलेल्या व्यक्तीखेरीज कोणालाहि आकलन होणें शक्य नाही! गोपींच्या प्रेमजनित विरहदुःखाची उत्कटता कोण समजूं शकेल? त्यांचें प्रेम म्हणजे प्रेमाचा चरम आदर्श होतें, त्यांत कसलीहि अपेक्षा नव्हती, त्यांत स्वर्गाचीहि अभिलाषा नव्हती, इहलोकांतील किंवा परलोकांतील कोणत्याहि सुखाची त्यांत लालसा नव्हती. आणि माझ्या मित्रांनो, या गोपींच्या

प्रेमामधूनच सगुण ईश्वरवाद व निर्गुण ईश्वरवाद यांमधील विरोध दूर करण्याचा मार्ग सापडतो. आपल्याला ठाऊक आहे की माणूस ईश्वराच्या सगुण रूपाहून अधिक उच्च अशी ईश्वराची धारणा करूं शकत नाही. आपल्याला हेंहि माहीत आहे की जो जगांत सर्वत्र व्याप्त असून सर्वकांही ज्याची अभिव्यक्ति आहे अशा निर्गुण ईश्वरावर विश्वास ठेवणें हें तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने योग्य आहे. त्याचबरोबर, कोणत्यातरी साकार वस्तूची आस आपल्या हृदयांत असते; ज्याचें आपल्याला आकलन करतां येईल व ज्याच्या चरणीं सर्वस्व अर्पण करतां येईल असें कांहीतरी आपल्याला हवें असतें. म्हणून सगुण ईश्वर हीच मनुष्याची सर्वोच्च कल्पना होय. परंतु तर्काला ही कल्पना सहन होत नाही. ब्रह्मसूत्रांतून चर्चिला गेलेला हाच तो प्राचीन प्रश्न आहे; द्रौपदीने अरण्यवासांत युधिष्ठिराबरोबर याच प्रश्नाची चर्चा केली होती: जर दयाळू, सर्वशक्तिमान् असा सगुण ईश्वर असेल तर या जगांत अशी नरकावस्था कां आढळते, त्याने असें जग कां निर्मिलें ? हा ईश्वर पक्षपाती असला पाहिजे. या प्रश्नाचें उत्तर सापडत नाही; गोपींच्या प्रेमाचें वर्णन वाचतांना या प्रश्नाचें एकमेव उत्तर सापडतें. कृष्णाला कोणतेंच विशेषण लावलेलें त्यांना आवडत नसे, तो सृष्टीचा कर्ता आहे हें जाणण्याची जरूरी त्यांना वाटली नाही, तसेंच तो सर्वशक्तिमान् आहे इत्यादि गोष्टींची आवश्यकता त्यांना भासली नाही. त्यांना एकच गोष्ट कळत होती, ती म्हणजे तो अनंत प्रेममय आहे. एवढेंच त्यांना पुरें होतें. गोपी ह्या कृष्णाला 'वृंदावनांतील कृष्ण' म्हणूनच जाणत होत्या. मोठमोठ्या सैन्यांचा सेनापति व राजांचा राजा असूनहि त्यांच्या दृष्टीने मात्र तो अखेरपर्यंत 'गोपाल'च

होता. "मला धन नको, लोकांचा परिवार नको, विद्वत्ता नको, इतकेंच काय स्वर्गाचीहि मला इच्छा नाही. मला वारंवार जन्म घ्यावा लागला तरी चालेल, पण प्रभो, मला तुमच्याबद्दल उत्कट प्रेम वाटो, केवळ प्रेमासाठीच प्रेम वाटो." धर्माच्या इतिहासांतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे----प्रेमाकरिता प्रेम, कर्तव्यासाठी कर्तव्य, कर्मासाठी कर्म. आणि सर्वश्रेष्ठ अवतार जो श्रीकृष्ण त्याच्या तोंडून, या भारतभूमीमधे, मानवाच्या इतिहासांत अगदी प्रथमच हें तत्त्व बाहेर पडलें. भीतीचा व प्रलोभनांचा धर्म केव्हाच मागे पडला, आणि नरकाची भीति व स्वर्गीय भोगांचें प्रलोभन हीं मानवी हृदयांत स्वभावतः असूनहि प्रेमाकरिता प्रेम, कर्मासाठी कर्म व कर्तव्यासाठी कर्तव्य यांसारखीं उत्तुंग ध्येयें अवतीर्ण झालीं.

केवढें हें अलौकिक प्रेम! मीं आताच तुम्हांला सांगितलें की गोपींची भक्ति आकलन होणें फार कठीण आहे. आपल्यामधेहि असे मूर्ख कमी नाहीत की ज्यांना अशा अपूर्व कथानकांतील वैशिष्टयपूर्ण आशय कळूं शकत नाही. मी पुन्हा सांगतों की अपवित्र हृदयाचे व मूर्ख असे आपलेच कांही बांधव आहेत की जे गोपीप्रेमाच्या या कथानकाला एक अत्यंत अपवित्र गोष्ट समजून त्याच्यापासून दहा हात दूर सरतात. त्यांना मला एवढेंच सांगावयाचें आहे की त्यांनी प्रथम स्वतःचें मन शुद्ध करावें. आणि तुम्हीं ध्यानांत ठेवलें पाहिजे की गोपीप्रेमाची ही अद्‌भुत कथा सांगणारे दुसरे कोणी नसून स्वतः व्यासपुत्र शुकदेवच आहेत. ते जन्मतःच शुद्ध होते, नित्यशुद्ध होते. अंतःकरणांत जोंवर स्वार्थवृत्ति आहे तोंवर ईश्वरभक्ति अशक्यच; तोंवर भक्ति म्हणजे एकप्रकारचा व्यापारच असतो. " ईश्वरा, मी

तुला कांही देतों, तूं मला मोबदल्यांत कांही दे." या लोकांचा ईश्वर म्हणतो, "तूं जर हें केलें नाहीस तर मेल्यावर मी तुझी खबर घेईन; अनंत काळ मी तुला नरकाग्नींत जाळीन"-- इत्यादि. जोंपर्यंत अशा कल्पना डोक्यांत आहेत तोंपर्यंत गोपींच्या प्रेमजनित विरहदुःखाची उत्कटता कशी कळणार? "त्या ओठांचें एकदा तरी चुंबन मिळाल्यास किती चांगलें होईल ! ज्याला तुझ्या दिव्य चुंबनाचा लाभ झाला त्याची तुझ्याबद्दलची आतुरता नित्य वाढीस लागते, सर्व दुःखांचा लय होतो, आणि केवळ तुझ्याव्यतिरिक्त अन्य सर्व गोष्टींबद्दलची त्याची अभिलाषा नाहीशी होते." धनसंपत्ति, नांवलौकिक यांच्याविषयीची आसक्ति प्रथम सोडा; तसेंच या आपल्या क्षुद्र जगाविषयीची अभिलाषा प्रथम विसरा; मगच तुम्हांला गोपींच्या प्रेमाचें आकलन होईल. त्यांचें प्रेम इतकें पवित्र आहे की सर्वस्वाचा त्याग केल्याशिवाय तें समजून घेण्याचा प्रयत्नच करूं नये; पूर्णतया आत्मशुद्धि झाल्याशिवाय तें कळणें शक्यच नाही. मनामधे काम-कांचन व नांवलौकिक यांची अभिलाषा बाळगून, व तिच्यामुळे प्रतिक्षणीं मन हेलावून जात असतां, हे लोक गोपींचें प्रेम समजून घेण्याचा व त्यावर टीका करण्याचा बालिश प्रयत्न करीत असतात ! या प्रेमाची शिकवण देणें हेंच कृष्णाच्या अवताराचें सार आहे. गीतेच्या महान् तत्त्वज्ञानाचीहि या प्रेमाच्या उन्मादा-बरोबर तुलना होऊं शकणार नाही; कारण गीतेमधे साधकाला अंतिम ध्येयाकडे हळूहळू कसें जावें हें शिकविलें आहे. पण या गोपीप्रेमांत भगवंताच्या आस्वादामुळे आलेला धुंदपणा आहे, त्यांत भगवत्प्रेमाने आलेला उन्माद आहे, तेथे गुरु, शिष्य, उप-देश, शास्त्र आदि सर्व एक झालीं आहेत; ईश्वर, स्वर्ग व भय

या कल्पनांचा संपूर्णपणें विसर पडून गेला आहे. उरला आहे फक्त प्रेमाचा उन्माद. यांत सर्व गोष्टींची विस्मृति होऊन भक्ताला या जगांत कृष्णाशिवाय कांहीच दिसत नाही, प्रत्येकजण त्याला कृष्णरूपच दिसतो, त्याचें स्वतःचेंहि मुख कृष्णासारखें दिसूं लागतें; अशा वेळीं त्याचा आत्माहि कृष्णाच्या रंगाने रंगून जातो. श्रीकृष्णाचा महिमा हा असा आहे!

श्रीकृष्णाच्या जीवनांतील क्षुल्लक तपशिलावर आपला वेळ वाया घालवूं नका. त्या जीवनाचें जें सार आहे, जो मुख्यांश आहे तोच घ्या. कृष्णाच्या चरित्राविषयी कांही ऐतिहासिक विसंगतिहि असूं शकतील, कांही प्रक्षिप्त गोष्टीहि त्यांत असूं शकतील. हे सारें खरें असेल, पण त्याचबरोबर या सर्व अपूर्व कल्पनांना कांहीतरी आधार असलाच पाहिजे. आपण दुसऱ्या कोणत्याहि महापुरुषाचें जीवन पाहिलें तर आपल्याला आढळतें की तो थोर पुरुष म्हणजे त्याच्या पूर्वी विद्यमान असलेल्या विचारांचेंच केवळ विकसित स्वरूप असतो. आपण हेंहि पाहतों की, त्याच्या देशांत, इतकेंच काय, पण त्याच्या स्वतःच्याच काळांत प्रचलित असलेल्या कल्पनांचा व विचारांचाच तो प्रचार करीत असतो. असा महापुरुष झाला किंवा नाही याविषयीहि मोठा संदेह असूं शकतो. पण श्रीकृष्णाच्या बाबतींत मी तुम्हांला आव्हान देतों की, 'कर्तव्यासाठी कर्तव्य', 'प्रेमासाठी प्रेम' व 'कर्मासाठी कर्म' ही श्रीकृष्णाची स्वतःची मौलिक शिकवण नव्हती असें कोणींहि सिद्ध करून दाखवावें. तुम्हांला हें मानावेंच लागेल की ही शिकवण कोणत्या ना कोणत्या व्यक्तीची स्वतःची मौलिक अशी शिकवण असली पाहिजे. त्या व्यक्तीने ह्या कल्पना, हे आदर्श दुसऱ्या कोणाकडूनहि घेतलेले असणें

शक्य नाही. कृष्णाच्या जन्माच्या वेळीं ह्या कल्पना सर्वत्र प्रचारांत होत्या असें म्हणतां येत नाही. भगवान् श्रीकृष्णांनी सर्व-प्रथम त्यांचा प्रचार केला. त्यांचे शिष्य व्यास यांनी त्यांच्यापासून हे आदर्श घेऊन त्यांचा सामान्य जनांपर्यंत प्रचार केला. अशा प्रकारचे आदर्श मानवी भाषेंत कधी वर्णिलेले नव्हते. व्यासांच्या ग्रंथामधे आढळणारी सर्वोच्च कल्पना म्हणजे 'गोपीजनवल्लभ'--वृंदावनांतील गोपींचा परम 'प्रेमास्पद'--ही होय. प्रेमाचा हा उन्माद जेव्हा तुमच्यांत शिरेल, भाग्यशाली गोपींचा भाव जेव्हा तुम्हांला खरोखर समजेल तेव्हाच प्रेम म्हणजे काय हें तुम्हांला कळेल. जेव्हा सर्व जग तुमच्या समोरून लोप पावेल, जेव्हा तुमच्या हृदयांतील सर्व कामना दूर होतील, जेव्हा तुमचें हृदय पूर्णपणें शुद्ध होईल, जेव्हा दुसरें कोणतेंहि ध्येय तुमच्या समोर उरणार नाही, एवढेंच नव्हे तर सत्यानुसंधानाची तुमची स्पृहा देखील जेव्हा गौण ठरेल तेव्हाच तुमच्या ठायीं प्रेमाचा तो उन्माद प्रकट होईल. अशा अनंत अहेतुक प्रेमाचें सामर्थ्य गोपींच्या ठायीं वसत होतें. हेंच परमसाध्य होय. तें तुम्हांला प्राप्त झालें की तुम्हीं सर्वकांही मिळविलें.

आता आपण थोडें खाली येऊन गीतेचा उपदेष्टा जो कृष्ण त्याच्याविषयी विचार करूं. आज भारतांत वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याचा प्रयत्न चालू आहे. आमच्यापैकी पुष्कळांना असें वाटतें की गोपींचें कृष्णाविषयीचें प्रेम हें विचित्र प्रकारचें असून तें युरोपियन लोकांना पटणार नाही. डॉ. 'क्ष' यांना तें आवडत नाही म्हणून गोपींचें हें आख्यान आपण टाकून दिलें पाहिजे ! युरोपियन लोकांच्या मान्यतेशिवाय कृष्णाचें अस्तित्व कसें राहूं शकेल ? शक्यच नाही ! महाभारतांत एक-दोन ठिकाणां-

व्यतिरिक्त गोपींचा उल्लेख नाही, आणि जो उल्लेख आहे तोहि विशेष महत्त्वाचा नाही. द्रौपदीच्या प्रार्थनेंत वृंदावनांतील जीवनाचा उल्लेख आहे, व दुसरा उल्लेख शिशुपालाच्या भाषणांत आहे. तेव्हा हे सर्व प्रक्षिप्त उल्लेख असावेत! युरोपियन लोकांना अप्रिय असेल तें टाकून दिलें पाहिजे. गोपींचा उल्लेख, एवढेंच नव्हे तर कृष्णाचाहि उल्लेख प्रक्षिप्त आहे! ठीक. व्यापारांत मुरलेल्या या युरोपियन लोकांच्या बाबतींत धर्म सुद्धा व्यापारी स्वरूपाचा झाला आहे; इहलोकीं कांहीतरी करून ही सर्व मंडळी स्वर्गप्राप्तीच्या प्रयत्नांत आहेत; व्यापाऱ्याला चक्रवाढ व्याज हवें असतें, इहलोकांत कांही भांडवल गुंतवून परलोकीं त्याची वसूली करण्याची त्याची कल्पना असते. खरोखरच त्यांच्या या अशा पद्धतींत गोपींना कांहीच स्थान नाही. असो. आदर्श प्रेमिक असा जो कृष्ण त्याच्यापासून थोडें खाली येऊन गीतेचा उपदेश करणाऱ्या कृष्णाकडे आपण आता वळूं या. वेदावर गीतेपेक्षा अधिक चांगलें भाष्य लिहिलें गेलें नाही व लिहिलें जाणेंहि शक्य नाही. श्रुति किंवा उपनिषदें यांचा आशय समजणें कठीण आहे; कारण कितीतरी भाष्यकारांनी आपापल्यापरीने त्यांचा अर्थ लावण्याचा यत्न केला आहे. त्यानंतर श्रुतींचा जो प्रेरक आहे तो स्वतःच श्रुतींचा आशय समजावून देण्यासाठी गीतेच्या उपदेष्टयाच्या रूपांत आविर्भूत झाला. त्याने श्रुतींचा ज्या पद्धतीने अर्थ लावला त्या पद्धतीची भारताला आणि अखिल जगालाहि अत्यंत आवश्यकता आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की नंतरचे शास्त्रांचे भाष्यकार गीतेवरहि भाष्य करीत असतां त्यांना कांही ठिकाणीं अर्थबोध होत नाही, व पुष्कळदा आशय कळत नाही. गीतेंत काय आढळतें, व नंतरच्या भाष्यकारांच्या भाष्यांत

काय आढळतें ? एखादा अद्वैतवादी भाष्यकार उपनिषदांतील एखादा भाग घेतो, तेथे त्याला पुष्कळ द्वैतात्मक उतारे आढळतात. तो त्या सर्वांच्या अर्थाची ओढाताण करून त्याला आपल्या स्वत:च्या साच्यांत बसविण्याचा प्रयत्न करतो. द्वैतवादी भाष्यकारापुढे जेव्हा अद्वैतात्मक उतारे येतात तेव्हा तोहि त्यांची हवी तशी ओढाताण करून त्यांचा द्वैती पद्धतीने अर्थ लावू पाहतो. पण गीतेमधे श्रुतींच्या अर्थाची अशी ओढाताण करण्याचा प्रयत्न मुळीच आढळत नाही. भगवान म्हणतात, सर्वच श्रुति बरोबर आहेत; कारण मनुष्याची आध्यात्मिक प्रगति पायरीपायरीने होत असते; तो स्थूलापासून सूक्ष्माकडे, सूक्ष्मापासून सूक्ष्मतर विचाराकडे जात जात अखेरीस अंतिम लक्ष्य जें अनंत पूर्णत्व तें प्राप्त करून घेतो. गीतेंत अशा प्रकारें वेदांचा अर्थ समजावून सांगितला आहे. गीतेंत कर्मकांडाचाहि विचार केलेला आहे आणि असें दाखविलें आहे की त्यामुळे जरी प्रत्यक्ष मोक्षप्राप्ति होत नसली तरी तें मोक्षास अप्रत्यक्षपणें उपकारक आहे व तेवढ्या अर्थाने तें ग्राह्य आहे; मूर्तिपूजा देखील ग्राह्य आहे; विधि, अनुष्ठानें सर्वकांही एका अटीवर ग्राह्य आहेत, आणि ती म्हणजे चित्तशुद्धि ही होय. हृदय जर शुद्ध व कपटहीन असेल तर उपासना ही ग्राह्य मानतां येईल व ती आपल्याला अंतिम लक्ष्याकडे घेऊन जाईल. उपासनेचे सर्व प्रकार आवश्यक आहेत, अन्यथा ते अस्तित्वांत आलेच नसते. आजकालचे कांही लोक म्हणतात की धर्म व संप्रदाय हे कांही ढोंगी व दुष्ट लोकांची निर्मिति असून त्यांनी हे सर्व स्वत:ला पैसे मिळावे म्हणून निर्माण केले आहेत, पण हें खरें नाही. हें असलें स्पष्टीकरण कितीहि सयुक्तिक दिसलें तरीहि तें खरें नाही, आणि या प्रकारें धर्मांची

व संप्रदायांची निर्मिति झालेली नाही. मानवी आत्म्याची एक गरज म्हणूनच त्यांचा उदय झाला. निरनिराळ्या श्रेणींच्या मानवांच्या आशा व आकांक्षा यांच्या पूर्तीसाठी हे सर्व विभिन्न धर्म व संप्रदाय आहेत. त्यांच्या विरुद्ध प्रचार करण्याची कांही आवश्यकता नाही. ज्या वेळीं त्यांची आवश्यकता उरणार नाही त्या वेळीं तेहि लोप पावतील आणि जोंवर त्यांची गरज आहे तोंवर ते राहतीलच, मग तुम्ही त्यांच्याविरुद्ध कितीहि प्रचार करा किंवा त्यांच्यावर कितीहि टीका करा. तुम्ही हातीं तलवार घ्या वा बंदूक घ्या, अथवा सर्व जग मानवी रक्तांत बुडवा, तरी पण मूर्तींची जोंपर्यंत गरज आहे तोंपर्यंत त्या राहणारच. या साऱ्या अनुष्ठानांच्या पद्धति व धर्माच्या या सर्व पायऱ्या राहतीलच, आणि त्या कां राहिल्या पाहिजेत हें आपल्याला भगवान श्रीकृष्णाच्या उपदेशांवरून कळून येतें.

* * *

गीतेचे मूल नायक भगवान श्रीकृष्ण होत. तुम्ही ख्रिस्ती लोक ज्याप्रमाणे नॅझारेथनिवासी येशूंना ईश्वराचे अवतार मानून त्यांची उपासना करीत असतां, त्याचप्रमाणे हिंदु लोक ईश्वराचे अनेक अवतार मानून त्यांची पूजा करीत असतात. अवतारांसंबंधी हिंदु लोकांचा असा विश्वास आहे की, जगाच्या प्रयोजनानुसार धर्माचें रक्षण आणि अधर्माचा विनाश करण्यासाठी भगवान वेळोवेळीं अवतार धारण करून ही पृथ्वी पुनीत करीत असतात. भारतांतील प्रत्येक धर्मपंथांत एकेका अवताराची उपासना प्रचलित आहे. कृष्णांच्या उपासकांचा एक स्वतंत्र संप्रदायहि आहे. इतर अवतारांच्या उपासकांपेक्षा भारतांत बहुधा कृष्णोपासकांचीच संख्या अधिक असावी. कृष्णांच्या भक्तांचें म्हणणें आहे

की, कृष्णच सर्व अवतारांमधे श्रेष्ठ आहेत--कृष्ण पूर्णावतार आहेत. या त्यांच्या विधानाचें कारण विचारल्यास ते म्हणतात की, बुद्ध व इतर अवतारांचें जीवितकार्य लक्षांत घ्या. ते सर्व संन्यासी होते. गृहस्थांच्या सुखदुःखांविषयी त्यांच्या हृदयांत सहानुभूति नव्हती. आणि असणार तरी कशी? परंतु श्रीकृष्णांचें जीवन बघा--पुत्राच्या म्हणा, मित्राच्या म्हणा की राजाच्या म्हणा, सर्वांच्याच भूमिकांचा आदर्श त्यांच्या चरित्रांत आढळून येतो. आणि ते ज्या अपूर्व उपदेशांचा प्रचार करून गेले आहेत, त्यांचें साऱ्या जन्मभर स्वतः प्रत्यक्ष आचरण करून दाखवून त्यांनी जीवांना उद्धाराचा मार्ग दाखवून दिला आहे. श्रीकृष्ण सांगून गेले आहेत--

"कर्मण्यकर्म यः पश्येत्, अकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ।।"

"जो निरंतर कर्मशील असूनहि नैष्कर्म्याची मधुर शांति अनुभवीत असतो, आणि जो परत निस्तब्धतेमधेहि अत्यंत कर्मशील असतो, त्यालाच जीवनाचें रहस्य यथार्थपणें कळलें आहे."

आणि हा आपला उपदेश प्रत्यक्ष कृतींत कसा आणतां येईल हेंहि श्रीकृष्णांनी दाखवून दिलें आहे. ह्याचा उपाय आहे--अनासक्ति. सर्व कर्मं करा, परंतु कशांतहि स्वतःला गुरफटून घेऊं नका--कशावरहि आसक्त होऊं नका. तुम्ही स्वरूपतः शुद्ध-बुद्ध-मुक्त साक्षिस्वरूप आत्मा आहांत. त्या तुमच्या स्वरूपाचा लोप कधीहि झालेला नाही, कधी होणार नाही. आपल्या दुःखांचें कारण कर्म नव्हे, आसक्तिच आपल्या दुःखांचें कारण होय. दृष्टान्तादाखल धनाचीच गोष्ट घ्या. धनवान होणें फार

अनुक्रम ७५६२३ दि. 1/10/1961
क्रमांक २०११ नोंद दि. २०१३।०७


चांगलें आहे. परंतु या बाबतींत कृष्णांचा उपदेश हा असा आहे की, अर्थोपार्जन करा, पैशासाठीं प्राण पणास लावून प्रयत्न करा, परंतु त्यावर आसक्त होऊं नका. पति-पत्नी, पुत्र-कन्या, आप्तेष्ट, मान-यश वगैरे सर्व बाबतींत हा उपदेश सारखाच लागू आहे. तुम्हीं या साऱ्यांचा त्याग करण्याचें कारण नाही, आवश्यकताहि नाही. फक्त इतकें मात्र लक्षांत ठेवा की, त्यांवर कदापि आसक्त होऊन बसूं नका. आपल्या आसक्तीला वा अनुरागाला पात्र अम्हे केवळ एकचजण, आणि तो म्हणजे——स्वयं भगवान. इतर कुणीहि नाही. स्वजनांकरिता कर्म करा, त्यांच्यावर प्रेम करा, त्यांचें हित साधण्याचा यत्न करा. आणि गरज पडेल तर त्यांच्यावरून एका नव्हे, शंभर जीवनांचें लिंबलोण उतरून ठेवा. परंतु कधीहि त्यांच्यावर आसक्त मात्र होऊं नका. भगवान श्रीकृष्णांचें स्वतःचें जीवन या उपदेशाचें जाज्वल्य उदाहरण होतें.

बंधूंनो, ज्या ग्रंथांत श्रीकृष्णांचें चरित्र वर्णिलेलें आहे तो कैक हजार वर्षांपूर्वीचा जुना ग्रंथ आहे, आणि तरीहि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की, त्यांच्या जीवनाशीं कांही बाबतींत नॅझारेथनिवासी येशूंच्या जीवनाचें बरेंचसें साम्य आहे. श्रीकृष्ण राजवंशांत जन्मास आले होते त्या समयीं कंस नांवाचा एक अत्याचारी राजा राज्य करीत होता. या कंसाला अशी एक आकाशवाणी ऐकूं आली होती की, लवकरच त्याचा संहारकर्ता जन्मास येणार आहे. ती वाणी ऐकून त्या दुष्टाने एकूणएक सर्व कोवळ्या अर्भकांची हत्या करण्याचा आपल्या भृत्यांना आदेश दिला. कृष्णांचे आईवडीलहि कंसाने बंदींत ठेवले होते आणि त्या बंदिवासांतच कृष्णांचा जन्म झाला. कृष्णांचा जन्म झाला त्या क्षणीं तें समस्त कारागार एका दिव्य ज्योतीने प्रकाशित होऊन

गेलें. त्या क्षणीं तें बालक (श्रीकृष्ण) म्हणालें, "मीच समस्त जगाची ज्योति आहें, जगाच्या कल्याणार्थ मी अवतीर्ण झालों आहें." श्रीकृष्णाचें 'गायी चारणारे' असेंहि वर्णन केलें गेलें आहे--त्यांचें 'गोपाल' असेंहि एक नांव आहे. कांही ऋषींनी दुरूनच अंतर्ज्ञानाने जाणलें की, साक्षात् परमेश्वर नरदेह धारण करून श्रीकृष्णाच्या रूपाने पृथ्वीवर अवतरले आहेत, आणि हें जाणून ते त्या लीलामानवाची पूजा करण्यासाठी तिथे येऊन उपस्थित झाले. बायबलांतील येशूंच्या चरित्रांतहि असल्याच एका घटनेचा उल्लेख आढळतो. तत्कालीन हेरॉड राजानेहि अशीच एक देववाणी ऐकून सर्रास शिशुहत्येचा आदेश दिला होता. येशूंचे आईवडील प्रवासांत असतांनाच बेथलेहेम नामक जागीं एका पागेंत येशूंचा जन्म झाला. येशूंना रूपकाच्या भाषेंत Shepherd किंवा 'मेंढपाळ' म्हणण्यांत येतें. बालक येशूंच्या रूपाने परमेश्वर जन्मले आहेत हें दैवी उपायाने जाणून पूर्वेकडचे कांही ज्ञानी पुरुष त्या दैवी बालकाच्या दर्शनासाठी तिथे गेले होते. कृष्ण व येशू यांच्या जीवनांतील कित्येक घटनांत याप्रमाणे सादृश्य असलेलें दिसून येतें. परंतु उभयतांच्या जीवनलीलेंतील इतर भागांत मात्र हें सादृश्य आढळत नाही.

तें कसेंहि असो, कृष्णांनी त्या अत्याचारी कंसाचा निःपात केला खरा, परंतु स्वतः त्या रिकाम्या सिंहासनावर आरूढ होण्याची कल्पनादेखील त्यांच्या मनाला शिवली नाही. आपलें कर्तव्य म्हणूनच त्यांनी तें कार्य केलें होतें. त्याच्या फलाचा, त्याने स्वतःचा कोणता स्वार्थ साधूं शकेल याचा विचारहि त्यांच्या चित्तांत उद्भवला नाही.

* * *

† प्रश्नः--कृष्ण गोपाळांबरोबर कां वाढला ?

उत्तरः--कंस नांवाच्या जुलमी राजाच्या हातून आपल्या शिशूला वांचविण्यासाठी कृष्णाच्या पित्याला गोकुळांत धाव घ्यावी लागली होती. 'कृष्ण नांवाचा बालक जन्माला येऊन तुला सिंहासनावरून खाली ओढील' अशी आकाशवाणी झाली होती. त्या भीतीने, त्या वर्षीं जन्मलेल्या सगळ्या मुलांना मारून टाकावें असा हुकूम सोडला होता. कृष्णाची आई कंसाची बहीण होती. आकाशवाणीच्या भयाने, आपल्या बहिणीला आणि मेव्हण्याला कंसाने तुरुंगांत टाकलें होतें.

प्रश्नः--कृष्णाच्या जीवनांतील ह्या प्रकरणाची समाप्ति कशी झाली ?

उत्तरः--दुष्ट कंसाच्या निमंत्रणावरून, बंधु बलदेव आणि पालक पिता नंद ह्यांच्या समवेत श्रीकृष्ण एका उत्सवांत उपस्थित झाला. त्या दुष्ट कंसाने श्रीकृष्णाच्या नाशाचा कट रचला होता. श्रीकृष्णाने त्या दुष्टाचा वध केला. आणि नंतर स्वतः सिंहासनावर बसण्याऐवजी त्याने कंसाच्या सर्वांत निकटच्या वारसाला सिंहासनाधिष्ठित केलें. श्रीकृष्णाने कधीहि आपल्या कार्याचीं फळें स्वतः उपभोगिलीं नाहीत.

प्रश्नः--ह्या काळांतील एखादा नाट्यपूर्ण प्रसंग आपण मला सांगू शकाल काय ?

उत्तरः--हा काळ चमत्कारांनी भरलेला आहे. बाल्यावस्थेंत श्रीकृष्ण फार खोडकर होता. एकदा यशोदामातेने त्याला

---

† भगिनी निवेदिता ह्यांनी कांही प्रश्न विचारले होते. त्यांचीं उत्तरें स्वामीजींनी लिहून ठेवलीं होतीं. हें टिपण २४ मे १९०० रोजीं सन् फ्रॅन्सिस्को येथे लिहिलेलें आहे.

ताक घुसळण्याच्या दोरीने बांधायचें ठरविलें. पण काय! सगळ्या दोऱ्या आणल्या तरी तो बांधला जाईना, मग तिचे डोळे उघडले. सगळें विश्व ज्याच्या देहांत सामावलेलें आहे त्याला बांधण्याचा ती प्रयत्न करीत होती हें तिच्या लक्षांत आलें. मग ती भीतीने कांपूं लागली व प्रार्थना करूं लागली. तात्काळ प्रभूने आपल्या मायेचा तिला स्पर्श घडविला. पुन्हा श्रीकृष्ण तिला पूर्ववत् बालकरूपांत दिसूं लागला.

भगवान हे गोपाल बनले आहेत ह्या गोष्टीवर देवाधिदेव ब्रह्मदेवाचा कांही विश्वास बसेना. एके दिवशीं त्याने सगळ्या गाईंना आणि गोपाळांना चोरून नेलें आणि एका गुहेंत झोपवून ठेविलें. पण परत येऊन पाहतो तों तींच मुलें आणि गाई कृष्णा-भोवती जमल्या असल्याचें त्याला दिसलें. त्यांनाहि त्याने पुन्हा चोरून नेलें आणि लपवून ठेविलें. परत येऊन पाहतो तों सगळेजण श्रीकृष्णाभोवती आहेतच. मग त्याचे डोळे उघडले. श्रीकृष्णाच्या देहांत त्याला एकापेक्षा एक मोठीं अशीं असंख्य जगतें आणि स्वर्ग दिसूं लागले आणि तसेच हजारो ब्रह्मदेवहि दिसूं लागले.

कालिया नांवाच्या सर्पाने यमुनेचें सगळें पाणी विषारी करून टाकलें होतें. कृष्ण त्या सर्पाच्या फणेवर नाचला. तसेंच त्याने गोवर्धन पर्वतहि उचलला. एकदा इंद्राची पूजा कृष्णाने बंद केली. इंद्र रागावला. त्याने सूडबुद्धीने पाऊस पाडून जल-प्रलय करून व्रजांतील सगळ्या लोकांना ठार मारायचें ठरविलें. कृष्णाने आपल्या करांगुलीवर गोवर्धन पहाड उचलून धरला आणि त्याखाली व्रजांतील सर्व लोकांना आश्रय दिला.

बालपणापासूनच कृष्ण सर्पपूजेच्या आणि इंद्रपूजेच्याविरुद्ध होता. इंद्रपूजा हें एक वैदिक कर्म आहे. वैदिक कर्मकांडाचा

श्रीकृष्ण पुरस्कार करीत नव्हते असेंच गीतेंत सर्वत्र आढळतें

हा त्यांच्या गोपीप्रेमाचा काळ आहे. ह्या काळीं त्यांचें वय अकरा वर्षांचें होतें.

*　　　*　　　*

गोपीजनवल्लभ श्रीकृष्णांनी वृंदावनांत कशी लीला केली-- त्यांच्यावरील प्रेमाने व्रजवासी कसे मोहून, कसे वेडावून गेले होते, त्यांच्या वेणूचा ध्वनि कानीं पडतांच त्या महाभाग्यवान गौळणी सर्वकांही विसरून जाऊन, जगत् विसरून जाऊन, जगाचें सगळे कडुगोड बंध विसरून जाऊन, जागतिक कर्तव्याकर्तव्य, जागतिक सारें सुखदु:ख विसरून जाऊन आपल्या प्रेमनिधानाच्या अलौकिक ओढीने त्याच्याशीं मीलित होण्यासाठी कशी धांव घेत असत--हें सारें आपली तोटकी, पंगु मानवी भाषा कितपत बरें वर्णू शकणार?

मानवा !--मानवा ! --तूं दैवी प्रेमाच्या गोष्टी बोलतोस आणि त्याबरोबरच संसाराच्या ह्या असार पसाऱ्यांत घुटमळत राहून परत त्यांतहि दंग असूं शकतोस ! धन्य तुझ्या प्रामाणिकपणाची ! पोटांत आणि ओठांत किती अंतर तुझ्या हें ! पण ध्यानांत ठेव--"जहाँ राम तहँ काम नहिं, जहाँ काम नहिं राम, तुलसी कबहूँ होत नहिं, रवि रजनी इक ठाम--जिथे राम तिथे कामाला वाव नसतो, आणि जिथे काम तिथे राम फिरकत नाही ! दोहोंत अंधार-उजेडाइतकें उजू ! दोन्ही एकत्र नांदणें कधीतरी शक्य आहे ?"

*　　　*　　　*

कोणत्याहि दृष्टिकोनांतून पाहा, भगवान् श्रीकृष्णांचें चरित्र सर्वांगपूर्ण आहे. ज्ञान, कर्म, भक्ति, योग--साऱ्यांची ते

जणु साकार मूर्तिच होत. श्रीकृष्णचरित्राच्या याच बाजूचा आज अधिक विचार व्हावयास हवा. वृंदावनांत मुरली वाजविणाऱ्या कृष्णालाच केवळ स्वीकारून आज चालणार नाही, त्याने जीवांचा उद्धार होणार नाही. आज अत्यावश्यक आहे गीतारूपी सिंहनाद करणाऱ्या श्रीकृष्णांची पूजा, धनुर्धारी राम, महावीर हनुमान, कालीमाता यांची पूजा ! तेव्हाच कुठे लोक मोठ्या उत्साहाने कर्म करून शक्तिसंपन्न होतील. खूप विचाराअंतीं अखेर माझें तर मत झालें आहे की जे लोक या देशांत आज धर्म धर्म करून आरडाओरड करतात, त्यांच्यांतील बरेचसे आहेत विकृत, डोक्याचे हलके आणि धर्मान्ध. आत्यंतिक रजोगुणाची कास धरल्याखेरीज तुम्हांला आता ना इहलोकाची आशा, ना परलोकाची. सारा देश तमोगुणाने कुंद होऊन गेला आहे. आणि फलहि तसेंच मिळत आहे--इहलोकीं गुलामी, परलोकीं नरक.

---

# गीतेविषयी कांही विचार

'गीता' म्हणून प्रसिद्ध असलेला ग्रंथ महाभारताचा एक भाग आहे. गीता ही चांगल्या रीतीने समजून घ्यावयाची असेल तर त्यासाठी कित्येत गोष्टी जाणणें अगत्याचें आहे. प्रथमतः हें जाणलें पाहिजे की ती महाभारताचा एक भाग आहे काय; म्हणजेच तिचें कर्तृत्व जें वेदव्यासांना देण्यांत येतें तें खरें आहे काय?——किंवा गीता ही त्या थोर महाकाव्यांत मागाहून घुसडून देण्यांत आली ? दुसरें म्हणजे श्रीकृष्ण नांवाची कोणी ऐतिहासिक व्यक्ति होती काय ? तिसरा प्रश्न असा की गीतेंत निर्दिष्ट केलेला कुरुक्षेत्राचा मोठा संग्राम प्रत्यक्षांत घडला होता काय ? चौथी बाब विचारांत घ्यायची ती अशी की अर्जुन आणि इतर लोक ह्या वास्तविक ऐतिहासिक व्यक्ति होत्या काय ?

आता आरंभींच, अशा तऱ्हेच्या प्रश्नांना आधारभूत असें काय आहे तें पाहूं या. आपल्याला हें ठाऊक आहे की वेदव्यास ही संज्ञा पुष्कळांना दिली गेली होती. त्या सर्वांत गीतेचा खरा कर्ता कोण होता ?——बादरायण व्यास की द्वैपायन व्यास ? 'व्यास' ही केवळ एक उपाधि होती. कोणींहि एखादें नवें पुराण रचलें की तो 'व्यास' या नांवाने ओळखला जाई. 'विक्रमादित्य' ही जशी एक साधारण संज्ञा आहे, तसेंच हें आहे. दुसरा मुद्दा असा आहे की शंकराचार्यांनी आपलें थोर भाष्य लिहून गीतेला प्रसिद्धि प्राप्त करून देईपर्यंत हा ग्रंथ सामान्य जनतेस विशेष माहीत नव्हता. पुष्कळांच्या मतें शंकराचार्यांच्या पुष्कळ आधी-पासून गीतेवरील बोधायनांचें भाष्य प्रचलित होतें. हें जर सिद्ध करतां आलें तर त्यामुळे निःसंशयपणें गीतेची प्राचीनता आणि तिचें व्यासकर्तृत्व प्रस्थापित होण्यास पुष्कळ साहाय्य होईल.

परंतु बोधायनांचें वेदान्तसूत्रांवरील भाष्य--ज्यावरून "मीं आपलें 'श्रीभाष्य' रचलें" असें रामानुजाचार्य म्हणतात, ज्याचा शंकराचार्य निव्वळ उल्लेख करून थांबले नाहीत, तर ज्यांतून त्यांनी कांही अवतरणेंहि आपल्या भाष्यांत दिलीं आहेत असे कांही लोकांचें म्हणणें आहे, आणि ज्याचा एवढा ऊहापोह स्वामी दयानंदांनी केला--त्या बोधायनभाष्याची एकहि प्रत मला साऱ्या भारतभरच्या प्रवासांत मिळाली नाही. असें म्हणतात की रामानुजाचार्यांनीहि आपलें भाष्य हातीं आलेल्या एका कीटकभक्षित हस्तलिखितावरून रचलें. जेथे वेदान्तसूत्रांवरील हें महान् बोधायनभाष्यहि अनिश्चिततेच्या अंधकारांत गुरफटलेलें आहे, तेथे गीतेवरील बोधायनभाष्याचें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करणें हें केवळ व्यर्थ आहे. कांहींचें असें अनुमान आहे की शंकराचार्य हे गीतेचे कर्ते होते आणि त्यांनी ती महाभारतांत घुसडून दिली.

आता आपण दुसऱ्या प्रश्नाकडे वळूं. कृष्णाच्या व्यक्तित्वा-बद्दल बराच संदेह आहे असें आपल्याला दिसून येतें. छांदोग्यो-पनिषदांत एका ठिकाणीं आपल्याला देवकीपुत्र कृष्णाचा उल्लेख आढळतो; या कृष्णाने 'घोर' नामक योग्याकडून उपदेश ग्रहण केला होता. महाभारतांत कृष्ण हा द्वारकेचा राजा आहे; आणि विष्णुपुराणांत गोपींबरोबर क्रीडा करणाऱ्या कृष्णाचें वर्णन आपल्याला आढळतें. तसेंच भागवतांत त्याच्या रासलीलेचें विस्तृत वर्णन केलेलें आहे. आपल्या देशांत अतिप्राचीन काळीं 'मदनोत्सव' नांवाचा उत्सव प्रचिलित होता. त्याचेंच रूपान्तर नंतर 'दोल' नामक उत्सवांत करण्यांत आलें आणि हें सगळेंच कृष्णाच्या नांवावर लादण्यांत आलें. रासलीला आणि तत्सदृश

इतर गोष्टीहि अशाच रीतीने त्याच्या गळ्यांत अडकविण्यांत आल्या नाहीत असें निश्चितपणें कोण म्हणूं शकेल ? प्राचीन काळीं ऐतिहासिक संशोधनाच्या द्वारें सत्य शोधून काढण्याची प्रवृत्ति आपल्या देशांत फार कमी होती. त्यामुळे, ज्याला जें वाटे तें तो योग्य अशा पुराव्यावांचूनच प्रतिपादन करीत असे. आणखी एक गोष्ट––प्राचीन काळीं माणसांच्या ठिकाणीं नांवलौकिका-विषयी फार कमी अभिलाषा असे. त्यामुळे असें अनेकदा घडलें की ग्रंथ लिहिला एकाने परंतु तो त्याने प्रसृत केला आपल्या गुरूच्या वा दुसऱ्या कोणाच्या नांवाने. अशा ठिकाणीं ऐतिहासिक घटनांचा शोध घेणाऱ्याला सत्यापर्यंत जाऊन पोहोचणें अत्यंत कठीण होऊन बसतें. प्राचीन काळीं लोकांना भूगोलाचें कांहीच ज्ञान नव्हतें; म्हणून अनेकांनी केवळ कल्पनेच्या बळावर इक्षुसागर, क्षीरसागर, घृतसागर, दधिसागर इत्यादि निर्माण केले. पुराणांत आपल्याला कोणी दहा हजार वर्षें, तर आणखी कोणी एक लाख वर्षें जगणारा भेटतों ! परंतु वेद म्हणतात "शतायुर्वै पुरुषः"––"मनुष्य शंभर वर्षें जगतो." आपण या बाबतींत कुणाला अनुसरावयाचें ? म्हणून कृष्णाच्या बाबतींत बिनचूक निष्कर्षाप्रत येऊन पोहोचणें हे अशक्यप्राय आहे.

एखाद्या थोर पुरुषाच्या वास्तव व्यक्तित्वाभोवती अलौकिक अशा सर्व प्रकारच्या काल्पनिक गुणांचें तेजोवलय निर्माण करणें हा मनुष्यस्वभाव आहे. कृष्णाविषयी हेंच घडलें असलें पाहिजे. परंतु हें अगदी संभवनीय वाटतें की तो एक राजा होता. 'अगदी संभवनीय' असें मी म्हणतों, कारण प्राचीन काळीं आपल्या देशांत मुख्यत्वें-करून राजांनीच ब्रह्मज्ञानाचा प्रसार करण्याचें कार्य केलें. या ठिकाणीं आणखी एक मुद्दा विशेषेंकरून ध्यानांत घ्यावयाचा तो

हा की गीतेचा कर्ता कोणीहि असो, गीतेंत जी शिकवण देण्यांत आली आहे तीच समग्र महाभारतांत आपल्याला आढळून येते. यावरून आपण बिनधोकपणें असें अनुमान करूं शकतों की महाभारताच्या काळीं कोणी थोर पुरुष उत्पन्न झाला आणि त्याने तत्कालीन समाजाला या नव्या रूपांत ब्रह्मज्ञानाची शिकवण दिली. आणखी एक गोष्ट दिसून येते ती ही की पुरातन कालीं जसजसा एका पंथामागून दुसरा पंथ उदयास येत गेला तसतसें त्या त्या पंथाचें एक एक नवें शास्त्रहि प्रचारांत येत गेलें. असेंहि घडलें की काला-न्तराने पंथ व त्याचें शास्त्र या दोघांचाहि लोप झाला, अथवा पंथ संपुष्टांत आला पण त्याचें शास्त्र मात्र मागे राहिलें. म्हणून हें अगदी संभवनीय आहे की गीता हें अशा एखाद्या पंथाचें शास्त्र होतें व त्या पंथाने आपले उच्च व उदात्त विचार या पवित्र ग्रंथांत ग्रथित केले होते.

आता तिसरा मुद्दा कुरुक्षेत्रावरील युद्धाविषयीचा. या-संबंधीचा कोठलाच खास पुरावा देतां येण्यासारखा नाही. परंतु, कुरु आणि पांचाल या उभयतांत युद्ध झालें होतें हें निःसंशय. आणखी एक गोष्ट. रणांगणावर ज्ञान, भक्ति, योग यांविषयी एवढी चर्चा कशी होऊं शकली ? त्या ठिकाणीं तर प्रचंड सैन्य अगदी लढण्याच्या जय्यत तयारीनिशी शेवटच्या इशाऱ्याची प्रतीक्षा करीत उभें ठाकलें होतें. आणि तेथे कृष्ण आणि अर्जुन यांनी बोललेला प्रत्येक शब्द टिपून घ्यायला कोणी लघुलिपिज्ञ होता काय की ज्याला त्या युद्धाच्या प्रचंड कोलाहलांत हें काम करणें शक्य झालें ? कांहींच्या मतें हें कुरुक्षेत्रावरील युद्ध म्हणजे एक रूपक आहे. जेव्हा त्याचा आध्यात्मिक अर्थ आपण थोडक्यांत मांडतों तेव्हा असें दिसतें की हें युद्ध म्हणजे मनुष्याच्या आंत

सत् व असत् प्रवृत्तींमध्ये सतत चालत असणारा संग्राम होय. हा अर्थसुद्धा तर्काशीं विसंगत नाही.

आता चौथ्या मुद्द्याविषयी बोलूं या. अर्जुन आणि इतर योद्धे यांच्या ऐतिहासिकतेबद्दल संशय घेण्यास पुरेसें कारण आहे. आणि तें हें : शतपथ ब्राह्मण हा फार प्राचीन ग्रंथ आहे. त्यांत कांही ठिकाणीं अश्वमेघ यज्ञ करणाऱ्या सर्व राजांचीं नांवें उल्लेखिलेलीं आहेत; परंतु त्या स्थळीं परीक्षिताचा पुत्र व अर्जुनाचा पौत्र जनमेजय याचा उल्लेख असला तरी अर्जुन व इतर योद्धे यांचा त्या ठिकाणीं नामनिर्देश सुद्धा नाही. तरीहि महाभारत आणि इतर ग्रंथ यांत असें विधान केलेलें आहे की युधिष्ठिर, अर्जुन इत्यादींनी अश्वमेध यज्ञ केला होता.

एका गोष्टीचें येथे विशेष स्मरण बाळगावयास हवें की हीं ऐतिहासिक अन्वेषणें आणि आपलें खरें उद्दिष्ट यांत कांहीहि संबंध नाही. आपलें खरें उद्दिष्ट म्हणजे धर्मप्राप्ति करून देणारें ज्ञान हेंच होय. या समग्र गोष्टींची ऐतिहासिकता आज जरी सर्वस्वी खोटी ठरली तरी त्यामुळे आपला यत्किंचितहि तोटा होणार नाही. मग, तुम्ही विचाराल की एवढ्या मोठ्या ऐतिहासिक संशोधनाचा उपयोग काय? त्याचा उपयोग आहे; कारण आपल्याला सत्य जाणून घ्यावयाचें आहे. खुळचट समजुतींनी जखडलेले असणें योग्य होणार नाही. या देशांत लोक अशा अन्वेषणांना फार कमी महत्त्व देतात. बऱ्याचशा पंथांचा असा विश्वास आहे की पुष्कळांना हिताची ठरणारी एखादी चांगली गोष्ट शिकवायची असली तर त्यासाठी साहाय्यभूत होत असल्यास एखादें असत्य सांगण्यांत कांही हानि नाही. किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर उद्दिष्ट चांगलें असल्यास कोणतेंहि साधन चालेल. म्हणून आपल्या पुष्कळशा तंत्रशास्त्रांचा

प्रारंभ "महादेव पार्वतीला म्हणाले" या शब्दांनी होतो. परंतु स्वतःची सत्याविषयी खात्री पटवून घेणें, केवळ सत्याविषयीच श्रद्धा बाळगणें हेंच आपलें कर्तव्य आहे. रूढ असलेल्या खुळचट समजुतींची शक्ति एवढी आहे की ती लोकांचे हातपाय जखडून टाकते; इतके की येशू ख्रिस्त, महंमद आणि इतर थोर पुरुषांनी अशा अनेक भोळसट समजुतींवर विश्वास ठेवला व त्यांना त्या झुगारून देतां आल्या नाहीत. तुम्हीं आपली दृष्टि निरंतर सत्यावर खिळवून ठेवली पाहिजे. आणि सर्व प्रकारच्या खुळचट समजुतीं-पासून तुम्ही स्वतःला सर्वस्वी दूर ठेवलें पाहिजे.

आता गीतेंत काय सांगितलें आहे हें आपण पाहूं या. आपण उपनिषदांचें अध्ययन केलें तर अनेक असंबद्ध विषयांच्या गुंता-गुंतीच्या जाळ्यांतून भ्रमण करीत असतांना अकस्मात् एखाद्या महान् सत्याचें विवेचन आपल्याला आढळून येतें. जंगलात पानें, कांटे इत्यादींसह एखादें गुलाबाचें सुंदर फूल आढळावें तसेंच हें आहे. आणि गीतेंत काय दिसून येतें ? गीतेंत या सत्यांची सु-व्यवस्थित व आकर्षक अशी मांडणी केलेली आढळते. गीता ही एखाद्या सुंदर हारासारखी अथवा निवडक पुष्पांच्या गुच्छासारखी आहे. उपनिषदांनी अनेक ठिकाणीं श्रद्धेविषयी विस्तृत विवेचन केलें आहे. परंतु भक्तीचा उल्लेख त्यांनी क्वचितच केला आहे. याउलट गीतेंत 'भक्ति' या विषयाचें पुनः पुनः प्रतिपादन केलें आहे; इतकेंच नव्हे तर भक्तितत्त्वाचें जें सार आहें त्याच्या आविष्काराची चरम सीमा गीतेने गाठली आहे.

आता आपण गीतेंत विवेचिलेल्या कांही मुद्द्यांचा परामर्श घेऊं या. तत्पूर्वीच्या सर्व पवित्र ग्रंथांपासून गीतेचा वेगळेपणा दाखविणारी अशी तिची मौलिकता कशांत आहे ? ही मौलिकता

पुढीलप्रमाणे आहे : गीतेच्या आगमनापूर्वी जरी योग, ज्ञान, भक्ति इत्यादि मार्गांपैकी प्रत्येकाचे अगदी निष्ठावंत अनुयायी होते तरी ते सर्व परस्परांशीं भांडत असत. प्रत्येक मार्गाचा अनुयायी हा 'माझाच मार्ग श्रेष्ठ आहे' असा दावा मांडी. कोणीहि या विविध मार्गांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला नव्हता. गीताकारानेच प्रथम या सर्व मार्गांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. त्या काळीं अस्तित्वांत असलेल्या सर्व पंथांमधे जें कांही उत्कृष्ट असें होतें तें गीताकाराने स्वीकारलें आणि गीतेंत ग्रथित केलें. परंतु परस्परांशीं झगडणाऱ्या ह्या पंथांत जेथे श्रीकृष्णहि संपूर्ण समन्वय दाखवूं शकले नाहीत तेथे या एकोणिसाव्या शतकांत श्रीरामकृष्णांनी ही गोष्ट पूर्णपणें साध्य केली.

यानंतरचा मुद्दा म्हणजे निष्काम कर्म. लोक आजकाल याचा अर्थ अनेक रीतींनी करतात. कांहीजण म्हणतात की निष्काम होणें म्हणजे कोणताच उद्देश नसणें होय. त्याचा तो जर खरा अर्थ असेल तर हृदयशून्य पशु व भिंती हीं 'निष्काम कर्मा'चे आदर्श प्रतिनिधि गणलीं जातील. तसेंच बरेचजण जनकाचा दाखला देतात आणि स्वतःला निष्काम कर्मी म्हणवून घेण्याची इच्छा बाळगतात ! पण जनक हे त्या श्रेष्ठत्वाला केवळ मुलांना जन्माला घातल्याने निश्चितच पोहोचले नाहीत ; परंतु या सर्व लोकांना केवळ अनेक मुलें उत्पन्न करूनच 'जनक' व्हावयाचें आहे ! छे ! खरा 'निष्काम कर्मी' हा पशूसारखाहि असूं नये, निष्क्रियहि असूं नये किंवा हृदयहीनहि असूं नये. तो तामसिक नसतो, तर तो शुद्ध सात्त्विक असतो. त्याचें हृदय प्रेमाने व सहानुभूतीने इतकें ओथंबलेलें असतें की तो आपल्या प्रेमाने साऱ्या जगास आलिंगन देऊं शकतो. जगांतील लोक

बहुधा त्याचें हें सर्वसमावेशक प्रेम व सहानुभूति आकलन करूं शकत नाहीत.

धर्माच्या विविध मार्गांचा समन्वय आणि निष्काम कर्म हीं गीतेचीं दोन वैशिष्टयें होत.

आता आपण दुसऱ्या अध्यायांतील थोडेसें वाचूं या–

संजय उवाच–

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ।। १ ।।

श्रीभगवानुवाच–

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ।। २ ।।
क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।। ३ ।।

संजय म्हणाला :

"जो कृपेने व विषादाने आविष्ट झाला होता, ज्याचे नेत्र अश्रूंनी भरले होते अशा अर्जुनाला मधुसूदन हे शब्द बोलला:"

श्रीभगवान म्हणाले :

"अशा बिकट स्थितींत, हे अर्जुना! आर्यांस न शोभणारा, दुष्कीर्ति करणारा आणि स्वर्गप्राप्तीस विरोधक असलेला हा विषाद तुझ्यावर कोठून येऊन कोसळला ?

"हे पार्था ! अपौरुषाच्या अधीन होऊं नकोस. हें तुला शोभत नाही. हें तुच्छ हृदयदौर्बल्य टाकून दे. आणि हे शत्रु-दाहका ! उठून उभा हो."

"तं तथा कृपयाविष्टं" या शब्दांनी सुरू होणाऱ्या श्लोकांत अर्जुनाची खरी अवस्था किती काव्यात्मकतेने, किती

सुंदरपणें वर्णिली आहे ! नंतर श्रीकृष्ण अर्जुनास बोध करतात. आणि "क्लैब्यं मास्म गमः पार्थ ! " इत्यादि शब्दांनी ते अर्जुनास युद्ध करण्यासाठी कां प्रेरित करीत आहेत ? कारण, युद्धविषयक जी अप्रवृत्ति अर्जुनाच्या ठिकाणीं उद्‌भवली होती ती शुद्ध सत्त्व-गुणाच्या प्राबल्यामुळे उद्‌भवली नव्हती, तर त्याच्या या अनिच्छेच्या मुळाशीं संपूर्णतया तमोगुणच होता. सत्त्वगुणी मनुष्याचा स्वभाव असा असतो की जीवनांतील सर्व प्रकारच्या परिस्थितींत --भरभराटीच्या काळांत किंवा विपत्तीच्या काळांत--तो सार-खाच शांत असतो. परंतु अर्जुन भ्याला होता आणि दयेच्या भाव-नेने व्याकुळ झाला होता. त्याची लढण्याची वृत्ति होती हें तो दुसरा कोणताच विचार मनीं न बाळगतां रणांगणावर येऊन दाखल झाला होता यावरून सिद्ध होतें. आपल्याहि जीवनांत असें बऱ्याच वेळां घडत असल्याचें दिसतें. पुष्कळ लोकांना वाटतें की " आपण स्वभावाने 'सात्त्विक' आहोंत ", परंतु वस्तुतः ते तमोगुणी असतात. अस्वच्छतेने राहणाऱ्या कित्येकांची आपण परमहंस असल्याची समजूत असते ! याचें कारण काय ?--तर शास्त्रें म्हणतात की " परमहंस हे जडवत्, उन्मत्त अथवा अस्वच्छ पिशाच्चांप्रमाणे असतात. " परमहंसांची मुलांशीं तुलना केली जाते परंतु येथे हें समजून घ्यावयास हवें की हीं तुलना एकांगीच आहे. परमहंस आणि मुलें ही एक वा अभिन्न नाहीत. तीं जणुकांही दोन विरुद्ध टोकांचीं असल्यामुळे समान भासतात. एक ज्ञानाच्या पलीकडील अवस्थेस जाऊन पोहोचलेला असतो, तर दुसऱ्याला ज्ञान म्हणजे काय याची पुसट जाणीवदेखील झालेली नसते. प्रकाशाचीं अत्यंत तीव्र व अत्यंत मंद स्पंदनें हीं दोन्हीं आपल्या दृष्टीच्या टप्प्यापलीकडे असतात. परंतु एकांत

आत्यंतिक उष्णता असते, तर दुसऱ्यांत उष्णतेचा अभाव असतो असें म्हणतां येईल. सत्त्व आणि तम या परस्परविरुद्ध गुणांचें असेंच आहे. ते दोन्ही कांही बाबतींत समान असल्याचें भासतें खरें, परंतु त्यांत आकाशपाताळाचें अंतर असतें. तमोगुणाला सत्त्वगुणाचा वेष चढवून मिरविण्याचा मोठा हव्यास असतो. येथे अर्जुनाच्या ठायीं तो दयेचें रूप धारण करून आला आहे.

ज्याने अर्जुनाला पछाडून टाकलें होतें त्या ह्या मोहाला घालवून देण्याकरिता भगवान काय म्हणाले ? " 'तूं पापी आहेस !' असें म्हणून तुम्ही कोणाचाहि अधिक्षेप करूं नका, उलट 'तुझ्या ठिकाणीं महाशक्ति वसत आहे' असें सांगून तुम्ही त्याचें तिच्याकडे लक्ष वेधा " असें मी नेहमी सांगत असतों. अगदी त्याच पद्धतीने भगवान अर्जुनाला म्हणतात, " नैतत्त्वय्युपपद्यते "—" हें तुला शोभत नाही !" " तूं तो अविनाशी आत्मा आहेस, तूं सर्व वाइटाच्या पलीकडे आहेस. आपलें खरें स्वरूप विसरून, स्वतःला पापी, रोगी, शोकग्रस्त मानून तूं आपली अशी अवस्था करून घेतली आहेस. हें तुला शोभत नाही !" म्हणून भगवान म्हणतात, " क्लैब्यं मास्म गमः पार्थ! "—" पार्था ! अपौरुषाच्या आहारीं जाऊ नकोस. जगांत पापहि नाही व दुःखहि नाही, रोगहि नाही व शोकहि नाही; जगांत ज्याला 'पाप' म्हणतां येईल असें जर कांही असेल तर तें हें भय आहे; तुझ्यांतील सुप्त सामर्थ्याला जागृत करणारें जें कांही असेल तें पुण्य आहे आणि जें कांही तुझें शरीर व मन यांना दुर्बल करतें तें खरोखर पाप आहे असें जाण. हा दुबळेपणा, हृदयाचा हा कमकुवतपणा झटकून टाक.

"क्लैब्यं मास्म गमः पार्थ ! तूं शूर, वीर आहेस. तुला हें

शोभत नाही." वत्सांनो ! तुम्ही जर "क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते" हा संदेश जगाला घोषित करून सांगाल तर हा सारा रोग हा शोक, हें पाप, हें दुःख हीं सारीं पृथ्वीच्या पाठीवरून तीन दिवसांत नाहीशीं होऊन जातील. दुबळेपणाच्या या साऱ्या कल्पना कोठच्या कोठे लुप्त होऊन जातील. सध्या भयाचें कंपन सर्वत्र भरलें आहे. हा प्रवाह उलटवा. विरुद्ध प्रकारचें कंपन येथे निर्माण करा आणि मग कसें आश्चर्यकारक परिवर्तन घडून येतें तें पाहा ! तूं सर्व शक्तिमान् आहेस; जा, तोफेच्या तोंडाशीं जा; भिऊं नकोस. महापाप्याचाहि तिरस्कार करूं नकोस; त्याचें बाह्य रूप पाहूं नकोस. तुझी दृष्टि अभ्यंतरी वळव. येथे परमात्मा वास करीत आहे. उच्च स्वराने साऱ्या जगाला उद्घोषून सांग-- "तुझ्या ठायीं पापाचा लेशहि नाही. तुझ्या ठायीं दुःखाचा कणहि नाही; तूं सर्व शक्तीचें भांडार आहेस, ऊठ ! जागा हो ! आणि स्वतःचें दिव्य स्वरूप प्रकट कर !"

एखाद्याने "क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते । क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।।" हा एकच श्लोक वाचला तर सारी गीता वाचल्याचें पुण्य त्याच्या पदरीं पडतें; कारण या श्लोकांत गीतेचा समग्र संदेश साठलेला आहे.

* * *

गीतेंत 'हृषीकेश' म्हणजेच इंद्रियांचे वा इंद्रिययुक्त जीवात्म्यांचे ईश्वर हे, 'गुडाकेशा'ला म्हणजेच निद्रेच्या अधीश्वराला वा निद्राजयी अर्जुनाला उपदेश देत आहेत. 'धर्मक्षेत्र' कुरुक्षेत्र म्हणजेच हें जग. पांच पांडव (म्हणजेच धर्म) शंकर कौरवांशीं (म्हणजेच ज्या सर्व गोष्टींवर आपण आसक्त असतों नि ज्यांच्याशीं आपला सतत विरोध निर्माण होत असतो त्यांच्याशीं) युद्ध करीत

आहेत. पांच भावांमधे सर्वांत शूर जो अर्जुन (म्हणजेच प्रबुद्ध जीव) तो त्यांचा नायक होता. आपल्याला समस्त इंद्रियसुखांशीं-- ज्या साऱ्या वस्तूंवर आपण अत्यंत आसक्त आहोंत त्यांच्याशीं --युद्ध करावयाचें आहे, त्यांना मारून टाकावयाचें आहे. आपण नि:संग होऊन उभें ठाकलें पाहिजे. आपण स्वरूपत: ब्रह्म आहोंत, आपल्या इतर सर्व भावना आपण ह्या एकाच भावनेंत विलीन करून टाकल्या पाहिजेत--तींतच डुबवून टाकल्या पाहिजेत.

श्रीकृष्णांनी सारींच कामें केलींत, परंतु कसल्याहि आसक्ती-खेरीज. ते 'जगांत' होते खरे, पण कधी 'जगाचे' झाले नाहीत. सर्व कर्मे करा, परंतु आसक्तीला थारा न देतां. कर्मासाठीच कर्म करा, कधीच स्वत:साठी नव्हे.

* * *

आपण पाहिलेंच की, चांगलें करूं जातां कांहीतरी वाईट, आणि वाईट करूं जातां कांहीतरी चांगलें केल्याखेरीज आपण कांहीहि करूं शकत नाही. समजा हें आपल्याला समजलें; पण मग आपण कर्म करावयाचें तरी कसें ? ह्या तत्त्वाची मीमांसा करण्याच्या प्रयत्नांत जगामधे अशा कित्येक संप्रदायांचा उदय झाला की ज्यांनी, हळूहळू आत्महत्या करणेंच संसारांतून बाहेर पडण्याचा एकमात्र उपाय म्हणून बेदिक्कत प्रचार केलेला आहे. कारण माणसाने जिवंत राहावयाचें म्हणजे क्षुद्र क्षुद्र जंतूंचा नि वृक्षलतांचा नाश करून किंवा कुणा ना कुणाचें कांही ना कांही तरी अनिष्ट करूनच ना ? म्हणून त्यांच्या मतें ह्या संसार-चक्रांतून सुटण्याचा एकमेव उपाय म्हणजे मृत्यु ! जैनांनी हाच आपला सर्वोच्च आदर्श असल्याचा प्रचार केला आहे. वरवर बघतां हा उपदेश खूप तर्कसंगत असा वाटतो. परंतु ह्या प्रश्नाची

खरी खरी मीमांसा गीतेंत आढळते. आणि ती म्हणजे अनासक्ति, निर्लिप्तता -- जीवनांतील कार्यें पार पाडीत असतां कशांतच आसक्त वा लिप्त न होणें. लक्षांत ठेवा की, तुम्ही जगापासून संपूर्ण पृथक् आहां. तुम्ही जगांत आहांत खरे, परंतु तुम्हीं त्यांत कांहीहि केलें तरी तें तुमच्या स्वत:करिता नव्हे हें विसरूं नका. स्वत:करिता जें कार्य कराल त्याचें फळ तुमच्यावर प्रभाव गाजवील. सत्कार्य कराल तर त्याचें शुभ फळ तुम्हांला उपभोगावें लागेल, असत्कार्य कराल तर अशुभ फळ भोगावें लागेल. परंतु कार्य कोणतेंहि असेना, तें जर तुम्ही स्वत:साठी आचरणार नाही, तर त्याचा कसल्याच तऱ्हेचा प्रभाव तुमच्यावर पडूं शकणार नाही. "जर कुणामधे असा बोध असेल की, मी हें स्वत:करिता मुळीच करीत नाहीं, तर त्याने साऱ्या जगाची हत्या केली किंवा तो स्वत: हत झाला तरीहि तो हत्या करीत नाही वा हतहि होत नाही." आमच्या शास्त्रांत असें अत्यंत अर्थगर्भ विधान आढळून येतें. एवढ्याचसाठी कर्मयोग आपल्याला विशेषेंकरून शिकवितो की जगाचा त्याग करूं नका, जगांत वास करा, जगाचा प्रभाव हवा तितका तुमच्यावर पडूं द्या. परंतु भोगासाठी नव्हे--कदापि नव्हे. भोग तुमचें लक्ष्य न होवो. आधी 'स्वत:'ला मारून टाका आणि मग तुम्ही, 'स्वत:'च हें सारें जगत् आहांत असा बोध बाळगा. जुने ख्रिश्चन म्हणत असत, "पुराण्या माणसाला मारून टाकिलें पाहिजे." ह्यांतहि मी म्हणतों तोच भाव गर्भित आहे. 'पुराणा माणूस' म्हणजे आपल्या मनांतील हीच स्वार्थपर वृत्ति की जगत् आपल्या भोगासाठी निर्मिलें गेलें आहे. अजाण आईबाप आपल्या मुलामुलींना असली प्रार्थना करण्यास शिकवीत असतात की,--"हे प्रभो, तूं हा सूर्य, हा चंद्र माझ्यासाठी निर्माण केला

आहेस." जणु त्या प्रभूला ह्या साऱ्या पोरांसाठी हें सगळे सृजन करण्याखेरीज आणखी कांही कामच नव्हतें ! हा सारा प्रकार म्हणजे आमच्या कामनारूपी अग्नींत तूप ओतण्यासारखाच होय. मुलांना असला फाजीलपणा कधीहि शिकवूं नका. आपल्या ह्या जगाच्या पाठीवर आणखी एका तऱ्हेचे लोक आहेत--त्यांचा वेडेपणा आणखी एका तऱ्हेचा असतो. ते जगाला शिकवीत असतात की, या साऱ्या जीवजंतूंची सृष्टि केवळ आपण त्यांना मारून खाण्यासाठीच झाली आहे, आणि हें जग माणसाच्या भोगासाठीच अस्तित्वांत आहे ! हाहि एक प्रचंड मूर्खपणाच होय. कारण, मग वाघहि म्हणूं शकेल की माणसाची उत्पत्ति माझ्या-साठी आहे, आणि मग तो प्रार्थना करील की, "हे प्रभो, हीं माणसें किती दुष्ट आहेत बरें ! तीं माझ्यासमोर येऊन उभीं राहून माझें भक्ष्य बनत नाहीत; तीं तुझी आज्ञा उल्लंघीत आहेत !" जग जर आपल्यासाठी सृष्ट झालें असेल तर मग आपणहि जगासाठी सृष्ट झालों आहोंत. हें जग आपल्या भोगा-साठीच उत्पन्न झालें आहे ही पराकाष्ठेची ओंगळ धारणाच आपल्याला आबद्ध करून ठेवते--तीच अधःपाताचें मूळ होय. हें जग आपल्यासाठी नाही. प्रतिवर्षी लक्षावधि कोटचवधि लोक जगांतून निघून जातात, जगाचें तिकडे लक्ष देखील नसतें. त्यांच्या जागीं दुसरे लक्षावधि पुरविले जात आहेत. जग जितकें आपल्या-साठी आहे तितकेंच आपणहि जगासाठी आहोंत.

अतएव योग्य प्रकारें कर्माचें अनुष्ठान करण्यासाठी प्रथम म्हणजे आपण आसक्तीच्या भावनेचा त्याग केला पाहिजे. द्वितीयतः, कर्माच्या रामरगाडयांत स्वतःला गुरफटून घेऊं नका, त्याच्याशीं एकरूप होऊन बसूं नका. स्वतः साक्षीस्वरूप राहून कर्म आचरीत

जा. माझे गुरुदेव भगवान श्रीरामकृष्ण म्हणत असत, "स्वतःच्या मुलांशीं दाईप्रमाणे वागा." दाई तुमच्या मुलाला घेऊन त्याचे लाड करील, त्याला खेळवील--अगदी पोटच्या गोळ्याप्रमाणे प्रेमाने त्याचें लालनपालन करील. परंतु मजा अशी की, तुम्हीं तिला कामावरून दूर करतांच आपलें चंबूगबाळें गुंडाळून ती आपला रस्ता धरण्यासाठी तयार. तुमच्या मुलावर असलेल्या साऱ्या मायाममतेचा तिला पार विसर पडतो. तुमच्या मुलाला सोडून देऊन दुसऱ्याच्या मुलाला आपलें म्हणतांना दाईला कसलीच खंत वाटणार नाही. आपण देखील, आपलें म्हणून जें कांही आपल्याला वाटतें त्याविषयी ही अशीच वृत्ति बाळगली पाहिजे. आपण दाई आहोंत; आणि आपला जर ईश्वरावर विश्वास असेल तर आपण अशी श्रद्धा बाळगावयास हवी की, आपण ज्यांना आपल्या म्हणून मानतों त्या सर्व गोष्टी वस्तुतः त्या प्रभूच्याच होत. आत्यंतिक दुर्बलता पुष्कळदा मोठ्या साधुतेचें आणि सबलतेचें रूप धारण करीत असते. आपल्यावर कुणी अवलंबून आहे आणि आपण कुणाचें भलें करूं शकतों असें वाटणें अत्यंत दुर्बलतेचें लक्षण आहे. अहंकाराची ही भावनाच सर्वप्रकारच्या आसक्तीचें उगमस्थान आहे, आणि आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या समस्त दुःखकष्टांची जननी ही आसक्तिच होय. ह्या अपार विश्वसंसारामधील एकहि जीव आपल्यावर अवलंबून नाही, एकदेखील भिकारी आपल्या भिक्षेवर अवलंबून नाही, एकहि प्राणी आपल्या दयेवर अवलंबून नाही, कुणी म्हणतां कुणीहि आपल्या मदतीवर अवलंबून नाही ही वस्तुस्थिति आपण आपल्या मनावर पुरेपूर बिंबवून घ्यावयास हवी. प्रकृति सर्वांना साहाय्य करीत आहे, आणि आपल्यापैकी लक्षावधि जरी इहलोक सोडून गेले तरीहि लोकांना साहाय्य

मिळावयाचें तें मिळतच राहील. तुमच्यामाझ्यासारख्यांसाठी प्रकृतीची अनिरुद्ध गति कधीहि बंद व्हावयास रिकामी नाही. दुसऱ्यांना मदत करण्याने आपल्याला स्वतःलाच शिक्षण कसें लाभत असतें तें आपण मागे पाहिलेंच आहे. आणि म्हणूनच, आपल्याला परोपकार करण्यास वाव मिळत आहे हें आपलें परम सौभाग्यच म्हटलें पाहिजे. आयुष्यांत शिकण्यासारखा हा एक मोठा धडा आहे. तो एकदा संपूर्ण आत्मसात् केल्यानंतर मग आपण कधीहि दुःखी होणार नाहीं. मग आपण समाजांत हवें तिथे जाऊन मिसळलों तरीहि कांही अनिष्ट होणार नाही. तुम्हांला पति आहे असू द्या, पत्नी आहे असू द्या, घरभर दासदासी असल्या तरी चालेल, एखाद्या सिंहासनाचे तुम्ही अधिकारी असा ना का, पण जर तुम्ही हें एक तत्त्व आपल्या हृत्पटलावर कोरून ठेवून संसारांत वागाल की, जग तुमच्या भोगासाठी नाही आणि तुमच्या-वांचून त्याचें कांहीसुद्धा अडणार नाही, तर मग ह्या सर्व गोष्टी तुमचें थोडेंदेखील अनिष्ट करूं शकणार नाहीत. या चालू वर्षींच तुमचे कितीतरी मित्र कदाचित् दिवंगत झाले असतील. जग काय त्यांच्या परत फिरण्याची वाट पाहत बसलें आहे? त्यांच्यासाठी जग काय चालायचें अडून बसलें आहे? जगाचा स्रोत आपला होता तसाच अविच्छिन्न चालू आहे. करिता, आपण जगावर कांही उपकार करूं शकतों ही कल्पना आपल्या डोक्यांतून अजीबात काढून टाका. जगाला तुमच्या मदतीची मुळीदेखील अपेक्षा नाही. जगाला साहाय्य करण्यासाठी माझा जन्म, असें समजणें म्हणजे अगदी निखालस मूर्खपणा होय. हा निव्वळ अहंकार आहे. ही शुद्ध स्वार्थपरता आहे; केवळ सद्‌गुणाचें रूप धारण करून ती आमची प्रतारणा करीत आहे, इतकेंच. ही दुनिया तुमच्या अथवा इतरहि

कुणाच्या मदतीवर मुळीच अवलंबून नाही, या भावनेच्या सत्यतेचा जेव्हा तुम्हांला पुरेपूर प्रत्यय येईल, ती जेव्हा तुमच्या नसानसांत, तुमच्या रोमारोमांत भिनून जाईल तेव्हा मग कर्मापासून उद्भवणारी दु:खरूप प्रतिक्रिया तुम्हांला आणखी भोगावी लागणार नाही. जेव्हा कुणा एखाद्याला कांही देऊन त्याच्या मोबदल्यांत तुम्ही कसलीच आशा धरणार नाही, त्या इसमाने कृतज्ञ व्हावें एवढ्यादेखील प्रतिदानाची इच्छा तुम्ही बाळगणार नाही, तेव्हाच त्याच्या कसल्याहि वर्तणुकीचा -- त्याच्या कृतघ्नतेचाहि तुमच्यावर तिळमात्र परिणाम होणार नाही. कारण, तुम्हीं त्याच्यापासून कशाचीच अपेक्षा केली नव्हती, बदल्यांत कांही मिळण्याचा तुम्हांला अधिकार आहे असें तुम्ही कधीच समजला नव्हता त्याचें जें प्राप्य होतें तें तुम्हीं त्याला दिलें, इतकेंच. त्याच्या स्वत:च्या कर्माचें फल म्हणून तें त्याला लाभलें, तुमच्या कर्माने तुम्हांला त्याचें वाहक मात्र केलें. कांही दिल्याचा तुम्हांला अहंकार कां व्हावा? पैशाच्या म्हणा किंवा इतर कशाच्याहि दानाचें म्हणा, तुम्ही तर फक्त वाहक; जग स्वत:च्या कर्मानेच तें लाभण्यास पात्र ठरत असतें. अशा परिस्थितींत अहंकाराला जागाच कुठे आहे? जगाला तुम्हीं जें काय दिलें त्यांत एवढें आहे तरी काय बरें? असो तर, एकदा असला हा अनासक्तीचा भाव आत्मसात् केल्यानंतर मग तुमच्या दृष्टीने भलें किंवा बुरें, शुभ अथवा अशुभ कांहीच राहणार नाही. स्वार्थच भल्याबुऱ्याचा भेद उत्पन्न करीत असतो. तुम्ही स्वत: अवसर आणि संधि देत नाही तोंपर्यंत या विश्वांतली कोणतीच वस्तु तुमच्यावर अंमल गाजवूं शकणार नाही. ही गोष्ट समजण्यास कठीण आहे खरी, पण कालांतराने तुम्हांला तिची सत्यता पटल्या-

खेरीज राहणार नाही. माणसाचा आत्मा जोंवर मूर्खपणाने आपली स्वाधीनता गमावून दुसऱ्या एखाद्या शक्तीच्या कह्यांत जात नाही, तोंवर त्याच्यावर अंमल बजावूं शकेल अशी एकहि शक्ति अलम दुनियेंत अस्तित्वांत नाही. सारांश, अनासक्तीच्या द्वारा तुम्ही तुमच्यावर परिणाम करूं पाहणाऱ्या कोणत्याहि शक्तीवर मात करीत असतां, तिचा अंमल झुगारून देत असतां. आता, 'माझ्या इच्छेविरुद्ध माझ्यावर कार्य करण्याची कुणाचीच बिशाद नाही' असें वायफळ बडबडणें अर्थातच फार सोपें आहे. परंतु, खरोखरच स्वत:वर कोणत्याहि शक्तीचा असर न होऊं देणाऱ्या व्यक्तीचें, बाह्य जगांतील घटनांचा भला-बुरा परिणाम होऊनहि सुखी किंवा दु:खी न होतां अविचलित राहणाऱ्या व्यक्तीचें खरें लक्षण कोणतें ? तिचें लक्षण हेंच की, चांगलें किंवा वाईट कांहीहि तिच्या मन:स्थितींत परिवर्तन घडवून आणूं शकत नाही; सर्वच अवस्थांत ती सारखी राहूं शकते.

* * *

मीमांसाशास्त्रांत, काम्यकर्म निश्चितपणें फळ देतें असें सांगितलें आहे. परंतु निर्विशेष आत्म्याचें दर्शन मात्र कर्माच्या द्वारा व्हावयाचें नाही. कारण आत्मज्ञानलाभाची इच्छा असणाऱ्यांसाठी 'साधनादि कर्म करा, पण फळाबाबत उदासीन राहा' असें सांगितलें आहे. यावरून हेंच दिसतें की ही सारीं साधनादि कर्में साधकाच्या फक्त चित्तशुद्धीलाच कारणीभूत होतात, आणखी कांहीहि नाही. एरवी, प्रत्यक्षपणें याच साधनादि कर्मांचें फळ म्हणूनच जर आत्मसाक्षात्कार होणार असता तर शास्त्रांनी या साऱ्या कर्मांच्या फळांचा त्याग करावयास साधकाला सांगितलें नसतें. म्हणून, मीमांसाशास्त्रांत सांगितलेल्या 'फलप्रद कर्मवाद'चें

खंडन करण्यासाठीच गीतेंतील निष्काम कर्मयोगाचा जन्म झाला आहे.

* * *

भगवद्‌गीतेंत भगवान कृष्णांनी ज्ञानाचा सुस्पष्ट उपदेश केला आहे. हें महान् काव्य भारतीय वाङ्मयाचा मुकुटमणि समजलें जातें. तें वेदावरील एकप्रकारचें भाष्य आहे. गीता आपल्याला शिकविते की आध्यात्मिकता प्राप्त करून घेण्यासाठी या जीवनांतच आपल्याला लढा दिला पाहिजे. म्हणून जीवनापासून आपण पळ काढतां कामा नये. उलट त्याच्यापासून जें कांही मिळवितां येईल तें मिळविण्यासाठी झटलें पाहिजे. उच्च गोष्टींच्या लाभासाठी केल्या जाणाऱ्या संघर्षाचें गीता हें प्रतीक असल्यामुळे ती युद्धक्षेत्रावर सांगितली गेली ही घटनाच मोठी काव्यात्मक आहे. एका पक्षाचा नेता जो अर्जुन त्याचें सारथ्य करीत असलेले श्रीकृष्ण त्याला दुःखी न होण्याचा, मृत्यूला न भिण्याचा उपदेश करतात. याचें कारण हें की, आत्मा अमर आहे व जें कांही परिवर्तनशील आहे तें मानवाचें खरें स्वरूप असूं शकत नाही हें त्यांना माहीत होतें. एकामागून एक अशा अनेक अध्यायांत श्रीकृष्ण अर्जुनाला तत्त्वज्ञान व धर्म यांमधील उच्च सत्यांचा उपदेश करतात. ह्या उपदेशांमुळेच हें काव्य इतकें सुंदर बनलें आहे. वेदान्ताचें प्रायः समग्र तत्वज्ञानच त्यांत समाविष्ट झालें आहें. वेद सांगतात की आत्मा अनंत असून शरीराच्या मृत्यूचा त्याच्यावर कांहींहि परिणाम होत नाही. आत्मा असें एक वर्तुळ आहे की ज्याला परिघ नाही, पण ज्याचा मध्यबिंदु कोणत्या ना कोणत्या शरीरांत असतो. मृत्यु--तथाकथित मृत्यु -- म्हणजे केवळ या मध्यबिंदूचें स्थानान्तर होय. ईश्वर हें असें एक वर्तुळ

आहे की ज्याचा परिघ कोठेहि नाही, पण ज्याचा मध्यबिंदु सर्वत्र आहे; आणि जेव्हा आपण सीमित देहाच्या मध्यबिंदूतून बाहेर पडूं तेव्हा आपल्याला ईश्वराचा, म्हणजे आपल्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार होईल.

* * *

गीतेंत मला अधिक आवडणारें असें कांही असेल तर तें म्हणजे प्रभावी व सारभूत असलेले, श्रीकृष्णाच्या उपदेशाचें मर्मच असे पुढील दोन श्लोक होत :

"समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ।।
समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ।।"

—"सर्व भूतांमधे समभावें विद्यमान असलेल्या परमात्म्याला जो पाहतो, विनाशी वस्तूंत अविनाशी परमात्म्याला जो पाहतो त्यालाच खरोखर दिसत असतें. कारण ईश्वराला सर्वत्र व समभावें अवस्थित असलेला पाहून तो आत्म्याच्या द्वारें आत्म्याचा नाश करीत नाही आणि याप्रमाणे तो परमगति प्राप्त करून घेतो."†

* * *

तुमच्यापैकी ज्यांनी गीतेचा अभ्यास केला असेल त्यांना हे स्मरणीय श्लोक आठवत असतील की

"विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ।।
इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ।।"

† गीता १३, २७–२८

अनुक्रम ७८८८३ दि: ...
क्रमांक 2099 2013/09 दा. क्र. ...


--"विद्वान् ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा, किंवा चांडाल या सगळ्यांना जो समदृष्टीने पाहतो तोच महात्मा होय, तोच ज्ञानी पुरुष होय ;" "जे साम्यावस्थेंत प्रतिष्ठित झाले त्यांनी या जन्मांतच पृथ्वी, स्वर्गादि सर्व लोकांवर विजय मिळविला; परमेश्वर सम आणि निर्दोष आहे, म्हणून ज्यांच्या ठायीं सर्वांविषयी समदृष्टि आहे व जे पवित्र आहेत ते परमेश्वरांत वास करीत असतात."† ही सर्व भूतांविषयी समदृष्टि-- हेंच वेदान्ताच्या नीतिशास्त्राचें सार होय.

* * *

प्रत्येक जीव एका विशिष्ट शक्तीच्या प्रकटीकरणाचें एकेक केंद्र असतो. आपल्या पूर्वकर्मांचें फल असलेली ती शक्ति आपल्यांत संचित झालेली असते, ती घेऊनच आपण जन्मत असतों. जोंपर्यंत ती शक्ति कार्याच्या रूपाने प्रकट होऊन जात नाही तोंपर्यंत कर्म टाकून देऊन कोण चुपचाप राहूं शकेल बरें ? तोंवर भल्या-बुऱ्या कर्मांचा कडु-गोड फलभोग कोण चुकवूं शकेल बरें ? मानगुट पकडून तोंवर ती शक्ति त्याच्याकडून कर्म करून घेईल. भोग जर याप्रमाणे चुकणारच नसेल तर मग दुःखभोगापेक्षा सुखभोग बरा नव्हे का ? कर्म चुकतच नसेल तर मग कुकर्मापेक्षा सुकर्म बरें नव्हे काय ? पूज्यपाद रामप्रसाद‡ म्हणतात-- "चांगलं आणि वाईट दोन्ही आहे. त्यांपैकी चांगलं करणंच चांगलं."

आता प्रश्न आहे की 'चांगलं' म्हणजे काय ? ज्याला मुक्ति हवी आहे त्याचं 'चांगलं' वेगळं, आणि ज्याला धर्म हवा आहे

---

† गीता, ५, १८–१९

‡ बंगालमधील एक सुप्रसिद्ध कालीभक्त आणि संतकवि. त्यांचीं पदें बंगालमधे आबालवृद्धवनिता सर्वांना परिचित आहेत.

त्याचं 'चांगलं' वेगळं. गीतोपदेशक भगवान श्रीकृष्णांनी गीतेंत हेंच महान् सत्य मोठ्या प्रयासांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या महासत्यावरच हिंदूंचा 'स्वधर्मा'चा सिद्धान्त, त्यांची वर्णाश्रमव्यवस्था उभी आहे. गीतेमधलीं "**अद्वेष्टा सर्वभूतानाम् मैत्रः करुण एव च**" (जगांत कुणाहिविषयी त्याच्या चित्तांत द्वेष नसतो, तो सर्वांचा मित्र असून सर्वांविषयी करुणा बाळगतो) इत्यादि भगवंतांचीं वचनें मोक्षेच्छूंसाठी आहेत. आणि "**क्लैब्यं मा स्म गमः पार्थ**" (अर्जुना, तूं असा दुबळा बनूं नकोस) "**तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व**" (म्हणून तूं ऊठ, युद्धांत शत्रूंचा पराभव करून यश मिळव) इत्यादि वचनांद्वारा भगवंतांनी धर्म-लाभाचा उपाय दाखवून दिला आहे ! आता हें खरें की कर्म करूं जातां कांही ना कांही पाप हें लागणारच. लागलें तर लागलें, अजीबात उपास पडण्यापेक्षा अर्धपोट जेवण चांगलें नाही ? कांहीच न करण्यापेक्षा, मातीचे पेंड होऊन पडण्यापेक्षा कर्म, मग त्यांत भल्या-बुऱ्या दोहोंची मिसळ असेना का, तेंच करणें चांगलें नाही का ? गाय कधी खोटं बोलत नाही, भिंत कधी चोरी करीत नाही. पण गाय ती कायमची गायच आणि भिंत ती भिंतच राहणार. माणूस चोरी करतो, खोटं बोलतो, परत तोच माणूस देवता बनतो. सत्त्व-गुणाचा प्रकर्ष झाल्यास माणूस निष्क्रिय होतो, त्याला परम ध्यानाची अवस्था प्राप्त होते. रजोगुणाचें प्राधान्य झाल्यास तो चांगलीं-वाईट कामें करतो. आणि तमोगुणाचें प्राबल्य झाल्यानेंहि माणूस परत निष्क्रिय, जड होतो. आता बाहेरून बघतां, तुमच्यांत सत्त्वगुण वाढला आहे की तुम्हांला तमोगुणाने झपाटलें आहे हें कसं समजायचं सांगा बघूं ? सुखदुःखाच्या पलीकडे, क्रियातीत, शांतिमय अशा सात्त्विक अवस्थेंत आपण आहोंत की चेतनाहीन,

निर्जीव, मातीच्या गोळयासारख्या जड, शक्तीच्या अभावीं क्रियाहीन अशा घोर तामसिक अवस्थेमधे पडलों असून हळूहळू चुपचाप कुजत आहोंत, ह्याचं उत्तर द्या बघूं--नीट आपल्या मनाला विचारून उत्तर द्या. उत्तराबित्तराची गरज तरी काय आहे म्हणा,--'फलेन परिचीयते'--फळावरून झाडाची पारख आपोआपच होते. सत्त्वगुण वृद्धिगत झाल्याने माणूस निष्क्रिय होतो, शांत होतो खरा. पण तें निष्क्रियत्व म्हणजे महाशक्तीची घनीभूत अवस्था होय, ती शांति महावीर्याची खाणच असते. त्या महापुरुषाला मग तुमच्या-आमच्यासारखें हातांपायांनी काम करावें लागत नाही. त्याच्या केवळ इच्छेने सारीं क़ामें अगदी सहज, लीलेने होऊन जातात. असा पुरुषच सत्त्वगुणप्रधान, ब्राह्मण--सर्वलोकपूज्य. त्याला काय मग 'माझी पूजा करा हो' असें म्हणत गल्लोगल्लीं आरडत फिरावें लागतें ? जगदंबा त्याच्या कपाळावर स्वतःच्या हाताने लिहून देते की ह्या पुरुषाची सगळेजण पूजा करा. अन् तिचा तो आदेश जगाला मान तुकवून ऐकावा लागतो, मानावा लागतो. असा महापुरुषच खरोखरी "अद्वेष्टा सर्वभूतानाम् मैत्रः करुण एव च." अन् हे जे मिळमिळीत, पुचाट, मरतुकडे, आवंढा गिळत गिळत बायकीपणा करीत बोलतात, सुडके कुणीकडचे, आवाज तर असा की जसे कांही साता दिवसांचे उपाशी, थोबाडांत दोन लगावल्या तरी हां नाही की हूं नाही--हा सारा तमोगुण. मृत्यूचीं चिन्हं हीं सारीं. हा सत्त्वगुण नव्हे. सारं सडलेलं, कुजलेलं--घाण सुटलेली. अर्जुन ह्या अशांच्या मेळयांत सामील व्हायला निघाला होता म्हणूनच ना त्याची समजूत काढण्यासाठी भगवंतांनी गीतेंत जंगजंग पछाडले आहेत ? भगवंतांच्या तोंडून अगदी पहिल्याप्रथम काय निघालं बघा -- 'क्लैब्यं मा स्म गमः

पार्थ.' आणि अखेर--'तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व." या जैनांच्या अन् बौद्धांच्या तावडींत सापडून आम्ही ह्या तमोगुण्यांच्या मेळयांत सामील झालों आहोंत. साऱ्या देशभऱ्यांतले लोक हरिनामाचा गजर करीत आहेत, भगवंतांच्या नांवाने हाका मारीत आहेत--आज हजार वर्षें झालींत. भगवान मख्ख; कांहीकेल्या कांही.कानांवरच घेत नाहीत. कशाला घेतील ? बेकुबांचं बोलणं माणसूच कानीं घेत नाही, मग भगवान कुठले घ्यायला बसलेत. आता उपाय आहे, भगवंतांचं हें वचन ऐकणं--"क्लैब्यं मा स्म गमः पार्थ" "तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व."

# श्रीकृष्ण

(कॅलिफोर्नियांत १ एप्रिल १९०० रोजीं दिलेलें व्याख्यान)

भारतांत बौद्ध धर्माला ज्या परिस्थितीने जन्म दिला, प्राय: तीच परिस्थिति श्रीकृष्णांच्या उदयाच्या वेळीं अस्तित्वांत होती. केवळ हेंच नव्हे, तर त्या काळच्या घटना आपण आपल्या आजच्या काळांतहि घडत असलेल्या पाहतों.

कांही एक आदर्श असतो. त्याचबरोबर बहुसंख्य मानव नेहमीच असे असतात. की त्यांना ह्या आदर्शापर्यंत पोहोचतां येत नाही--बौद्धिक दृष्टयाहि त्यांना तें जमत नाही. . . .जे समर्थ असतात ते आदर्श कार्यान्वित करतात आणि अनेकदा त्यांना दुर्बलांविषयी मुळीच सहानुभूति नसते. समर्थ असलेल्यांना दुर्बळ म्हणजे निव्वळ भिकारी वाटतात. समर्थ लोक पुढे जातात. . . .अर्थात् आपल्याला सहज दिसतें की या बाबतींत सर्वोच्च अशी भूमिका घ्यावयाची असल्यास जे दुर्बल आहेत त्यांच्याविषयी सहानुभूति बाळगणें, त्यांना साहाय्य करणें हीच ती भूमिका होय. परंतु पुष्कळ वेळां असें घडतें की तत्त्वज्ञ हा आपल्या सहानुभूतीने वागण्याच्या मार्गांत अडथळा आणतो. सारें अनंत जीवन हें येथल्या थोडच्या वर्षांच्या जीवनाने येथेच व आताच निर्णीत व्हावयाचें आहे ही तात्त्विक भूमिका जर आपण अनुसरली तर मग आपल्यापक्षीं परिस्थिति अत्यंत निराशा-

---

हें व यापुढील तीन व्याख्यानें हीं इडा ॲन्सेल ह्यांनी टिपून घेतलीं होतीं. अपूर्ण टिपणांवरून हीं व्याख्यानें प्रकाशनार्थ तयार केलीं असल्यामुळे त्यांत बऱ्याच ठिकाणीं मजकूर गळल्यासारखा झाला आहे. अशा बहुतेक ठिकाणीं तीन टिंबें दिलेलीं आढतील.

जनक आहे. . . .आणि जे दुर्बल आहेत त्याच्याकडे मागे वळून दृष्टिक्षेप करावयास आपल्याला थोडासाहि वेळ नाही. परंतु परिस्थिति जर अशी नसेल, जर जग म्हणजे ज्यांतून आपल्याला उत्तीर्ण होऊन बाहेर पडावयाचें आहे अशा अनेक शाळांपैकी एक शाळा असेल, शाश्वत नियमानुसार जर शाश्वत जीवनाला आकार यावयाचा असेल, आणि जर शाश्वत नियम सर्वांसाठी वाट पाहत असेल व शाश्वत संधि सर्वांना लाभणार असतील, तर मग आपल्याला त्वरा करण्याचें कांही कारण नाही. मग सहानुभूति प्रकट करण्यास, सभोवार दृष्टिक्षेप टाकण्यास, दुर्ब-लांना साहाय्य देण्यासाठी आपला हात पुढे करण्यास व त्यांना वर आणण्यास आपल्याला वेळ मिळेल.

बौद्धमताशीं निगडित असे दोन शब्द आपल्याला संस्कृत भाषेंत आढळतात--'बौद्ध धर्म' आणि 'बौद्ध पंथ'. ही अतिशय विलक्षण गोष्ट आहे की श्रीकृष्णांच्या शिष्यांच्या व अनुयायांच्या धर्माला कोणतेंहि नांव नाही. विदेशी लोक त्याला 'हिंदु धर्म' वा 'ब्राह्मण धर्म' असें म्हणतात. धर्म एक असतो, आणि पंथ पुष्कळ असतात. ज्या क्षणीं तुम्ही त्याला नांव देतां, त्याला इतरांपासून अलग करतां त्या क्षणीं तो पंथ होतो, मग तो धर्म राहत नाही. पंथ आपलें स्वतःचें सत्य जाहीर करतो आणि अशी घोषणा करतो की त्याव्यतिरिक्त दुसरें कोणतेंहि सत्य कोठेहि अस्तित्वांत नाही. धर्माचा असा विश्वास आहे की जगांत पूर्वी एकच धर्म होता आणि आजहि एकच धर्म आहे. दोन धर्म असे कधी नव्हतेच. एकच धर्म निरनिराळ्या ठिकाणीं निर-निराळ्या रूपांत प्रकट होत आहे. मानवजातीचें अंतिम लक्ष्य कोणतें आहे आणि त्याकडे जाण्याचे कोणते मार्ग उपलब्ध आहेत

हें योग्य रीतीने समजून घेणें हें आपल्यापुढील कार्य आहे.

आपली दृष्टि साफ करणें आणि प्रगतीच्या व उन्नतीच्या मार्गावर वाटचाल करीत असलेल्या मानवजातीकडे विशाल दृष्टीने पाहावयास लावणें हेंच श्रीकृष्णांचें थोर कार्य होतें. सर्वांच्या ठायीं सत्य विद्यमान आहे हें प्रथम त्यांच्याच विशाल हृदयाने अनुभवलें; त्यांच्याच मुखांतून प्रथम सर्वांसाठी प्रेमाचे शब्द बाहेर पडले.

श्रीकृष्ण हे बुद्धदेवांच्या सुमारें एक हजार वर्षें आधी होऊन गेले. . . .श्रीकृष्ण हे अस्तित्वांत होते यावर कित्येक लोक विश्वास ठेवीत नाहीत. कांहींचा असा विश्वास आहे की श्रीकृष्णाची पूजा ही प्राचीन सूर्यपूजेंतून उद्‌भवली. अनेक श्रीकृष्ण होऊन गेल्याचें दिसतें. एकाचा उपनिषदांत उल्लेख आहे; दुसरा एक राजा होता; आणखी एक सेनापति होता. या सगळयांचाच एका श्रीकृष्णांत समावेश करून टाकण्यांत आला आहे याने फारसें बिघडत नाही. सत्य गोष्ट ही आहे की, कोणी एक अशी व्यक्ति उदयास येते की जिच्या ठिकाणीं असाधारण आध्यात्मिकता असते. मग तिच्याभोवती सर्व प्रकारच्या कल्पित कथा गुंफल्या जातात. परंतु या एका व्यक्तीशीं निगडित करण्यांत आलेल्या सर्व ग्रंथांना व कथांना तिच्या स्वभावाशीं जुळेल असें रूप देणें आवश्यक असतें. बायबलच्या नवसंहितेंतील साऱ्या कथांना येशू ख्रिस्तांच्या सर्वमान्य जीवनाशीं व स्वभावाशीं जुळेल असें रूप देणें आवश्यक आहे. बुद्धदेवांविषयीच्या सगळचा भारतीय कथांतून त्यांच्या समग्र जीवनाचा मध्यवर्ती सूर राखलेला आढळतो; आणि तो म्हणजे त्यांनी इतरांसाठी केलेला त्याग हा होय. . . .

श्रीकृष्णांच्या संदेशांत दोन कल्पना सर्वाधिक महत्त्वाच्या आढळतात. . . .प्रथम म्हणजे विविध मतांचा समन्वय; दुसरी म्हणजे अनासक्ति. सिंहासनावर बसला असतांना, सैन्यांना आदेश देत असतांना, राष्ट्राकरिता मोठमोठ्या योजना अमलांत आणीत असतांना मानव हा पूर्णत्वाच्या सर्वोच्च ध्येयाप्रत पोहोचूं शकतो. खरें पाहतां श्रीकृष्णांनी आपला महान् उपदेश रणांगणावर दिला होता.

जुन्या पुरोहितांचे सर्व हास्यास्पद विधि, त्यांचीं विडंबनें व त्यांचीं अनुष्ठानें या सर्वांचा पोकळपणा श्रीकृष्णांना पुरेपूर उमगला होता; आणि तरीहि त्यांना त्यांत कांहीं चांगलें आढळलें होतें.

तुम्ही समर्थ असाल तर उत्तम! परंतु जे इतर लोक तुमच्या दृष्टीने पुरेसे समर्थ नाहीत त्यांचा धिक्कार करूं नका. . . .प्रत्येकजण म्हणतो, "तुम्हां लोकांचा धिक्कार असो!" "मला तुम्हांला साहाय्य करतां येत नाही म्हणून माझा धिक्कार असो" असें कोण म्हणतो? लोक आपापल्या साधनांच्या, कुवतीच्या व ज्ञानाच्या मानाने शक्य तितकें चांगलेंच करीत आहेत. "मी जेथे आहें त्या उंचीपर्यंत मी त्यांना वर आणूं शकत नाहीं म्हणून माझा धिक्कार असो!" म्हणून श्रीकृष्ण म्हणतात की विधि-अनुष्ठानें, देवपूजा, पौराणिक कथा हें सर्व ठीक आहे. . . . कां? कारण त्या सर्व गोष्टी एकाच ध्येयाप्रत घेऊन जातात. विधि-अनुष्ठानें, ग्रंथ इत्यादि सर्व एकाच साखळींतील दुवे आहेत. कसेंहि करून ही साखळी धरा. हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. तुमच्या ठायीं जर योग्य कळकळ असेल आणि तुम्हीं खरोखरीच एखादा दुवा जर पकडला असेल, तर तो सोडूं नका.

उरलेली सर्व साखळी निश्चितच तुमच्या हातांत येईल. परंतु लोक कांहीच हातीं धरत नाहीत. हातीं काय धरावें यावरूनच ते भांडतात व भांडणांत सगळा वेळ घालवितात आणि ते कांहीच हातीं धरीत नाहीत....आपण सर्वदा सत्याच्या मागे लागलेले असतों, परंतु तें प्राप्त करून घेण्याची आपली कधीच इच्छा नसते. याच्याकडे त्याच्याकडे जाऊन सत्यासंबंधी विचारण्याचें सुख तेवढें आपल्याला हवें असतें. आपल्या ठायीं खूप उत्साह-शक्ति असते. आपण तिचा याप्रकारें व्यय करतों. या कारणामुळे श्रीकृष्ण म्हणतात, "एकाच केंद्रापासून निघालेल्या या साखळ्यां-पैकी कोणतीहि एक पकडा. कोणतीहि एक पायरी दुसरीहून थोर नाही....कळकळीने युक्त असलेल्या कोणत्याहि धर्म-कल्पनेची निंदा करूं नका. या दुव्यांपैकी कोणताहि एक धरून ठेवा आणि तो तुम्हांला केंद्रापर्यंत घेऊन जाईल. स्वतः तुमचें हृदयच बाकीचें सर्वकांही तुम्हांला शिकवील. आंतला शिक्षक सर्व मतें, सर्व तत्त्वज्ञानें तुम्हांला शिकवील....

येशू ख्रिस्तांप्रमाणे श्रीकृष्ण स्वतःविषयी 'ईश्वर' असा उल्लेख करून बोलतात. ते स्वतःत ईश्वर पाहतात आणि म्हणतात, "कोणीहि एक दिवस देखील माझ्या मार्गांतून बाहेर जाऊं शकत नाही. सर्वांना माझ्याकडे यावेंच लागतें. कोणालाहि ज्या कोणत्या प्रकारें माझी उपासना करावयाची असेल त्या प्रकाराविषयीची श्रद्धा मी त्याला देतों, आणि तिच्या द्वारें मी त्याला भेटतों."*... त्यांच्या हृदयांत बहुजनसमाजाविषयी सहानुभूति आहे.

श्रीकृष्ण हे सर्वांत स्वतंत्र म्हणून उठून दिसतात. त्यांच्या

* गीता ४–१२

उपदेशांतील धीटपणाच आपल्याला भयचकित करून टाकतो. आपण अनेक गोष्टींवर -- कांही चांगल्या शब्दांवर, कांही चांगल्या परिस्थितीवर---अवलंबून राहतों. ज्या वेळीं आत्मा कशावरहि अवलंबून राहूं इच्छीत नाही, जीवनावरहि अवलंबून राहूं इच्छीत नाही. त्या वेळीं तो तत्त्वज्ञानाचा सर्वोच्च बिंदु असतो, मनुष्यत्वाचा सर्वोच्च बिंदु असतो. उपासना याच ध्येया-कडे घेऊन जाते. श्रीकृष्ण उपासनेवर खूप भर देतात. ईश्वराची उपासना करा!

उपासनेचे नाना प्रकार आपण या जगांत पाहतों. रुग्ण मनुष्य ईश्वराची खूप उपासना करतो. . . .एखादा मनुष्य आपलें सारें वैभव गमावून बसतो; तो देखील पुष्कळ प्रार्थना करतो--द्रव्य मिळविण्यासाठी. जो मनुष्य ईश्वरावर ईश्वरासाठी प्रेम करतो त्याचीच उपासना सर्वोच्च उपासना होय. असा प्रश्न विचारतां येईल की "जर ईश्वर असेल तर जगांत एवढें दुःख कां असावें ?" उपासक उत्तर देतो की ". . .जगांत दुःख आहे, परंतु त्यामुळे मी ईश्वरावर प्रेम करणें सोडून देत नाहीं. त्याने माझ्या दुःखाचा परिहार करावा म्हणून मी त्याची उपासना करीत नाहीं. मी त्यावर अशासाठी प्रेम करतों की तो स्वतः प्रेमस्वरूप आहे." उपासनेचे इतर प्रकार खालच्या दर्ज्याचे आहेत, परंतु श्रीकृष्ण कशाचीच निंदा करीत नाहीत. निष्क्रिय असण्यापेक्षा कांहीतरी करणें अधिक चांगलें. जो मनुष्य ईश्वराची उपासना करण्यास आरंभ करतो त्याचा हळूहळू विकास होईल आणि मग तो ईश्वरावर प्रेमासाठी प्रेम करूं लागेल. . . .

हें आपलें जीवन जगत असतां पावित्र्य कसें संपादन करावयाचें ? आपण सर्वांनी अरण्यांतील गुहांत जाऊन राहावें

काय ? त्याने कोणता लाभ होईल ? मन जर संयत नसेल तर गुहेंत राहण्यापासून कांही फायदा नाही, कारण तेंच मन तेथे सर्व प्रकारचे व्यत्यय बरोबर घेऊन जाईल. गुहेंत आपल्याला वीस सैतान आढळतील, कारण सगळे सैतान आपल्या मनांतच आहेत जर मन ताब्यांत असेल तर आपण कोठेहि असलों तरी आपण गुहेंत असल्यासारखे राहूं.

आपली मनोवृत्ति जशी असेल तसें आपल्याला जग दिसतें. आपले विचार वस्तूंना सुंदर बनवितात, आपले विचार त्यांना कुरूप बनवितात. सारें जग आपल्या मनांत असतें वस्तूंकडे योग्य दृष्टीने पाहावयास शिका. प्रथम या जगावर विश्वास ठेवा, म्हणजे प्रत्येक गोष्टीमागे कांही अर्थ आहे हें जाणून असां. जगांतील प्रत्येक वस्तु चांगली आहे, पवित्र आहे, सुंदर आहे. तुम्हांला जर कांही वाईट दिसलें तर असा विचार करा की तुम्ही योग्य दृष्टीने त्याच्याकडे पाहत नाही. सारी जबाबदारी स्वत:वरच घ्या! . . .जेव्हा जग खड्डयांत चाललें आहे असें म्हणण्याचा आपल्याला मोह होईल तेव्हा आपण स्वत:चें परीक्षण करावयास हवें आणि मग आपल्याला आढळून येईल की वस्तु यथार्थ स्वरूपांत पाहण्याची शक्ति आपण गमावून बसलों आहोंत.

रात्रंदिवस कर्म करा! "पाहा, मी विश्वाचा स्वामी आहें. मला कांही कर्तव्य नाही. प्रत्येक कर्तव्य हें बंधन आहे. परंतु मी कर्मासाठी कर्म करतों . मी जर कर्म करायचा निमिषभर थाबलों तर विश्वांत सारा गोंधळ होऊन जाईल."* म्हणून तूं कर्म कर, 'हें कर्तव्य आहे' अशी भावना मुळीच न बाळगतां तूं कर्म कर. . . .

* गीता ३–२२, २३

हें जग म्हणजे एक खेळ आहे तुम्ही त्या प्रभूचे खेळगडी आहांत. कर्म चालू ठेवा, कशाचेंहि दु:ख न वाटूं देतां कर्म चालू ठेवा. गचाळ वस्तींत व उत्तमोत्तम निवासस्थानांत त्याचीच क्रीडा पाहा! लोकांचा उद्धार करण्यासाठी कार्य करा ! ते नीच वा अध:पतित आहेत म्हणून नव्हे. श्रीकृष्ण तसें म्हणत नाहीत.

चांगलें कार्य इतकें थोडें कां होतें हें तुम्हांला माहीत आहे काय ? श्रीमती अमुक अमुक घाणेरड्या वस्तीत भेट देतात . . . . तेथील लोकांना कांही नाणीं देऊन त्या म्हणतात, "माझ्या गरीब लोकांनो ! हें घ्या व सुखी व्हा !" . . . अथवा दुसऱ्या एखाद्या श्रीमती रस्त्याने जातांना एका दरिद्री माणसास पाहून त्याच्याकडे एक छोटें नाणें फेकतात. या साऱ्या प्रकारांतील ईश्वरनिंदेचा विचार करा ! प्रभूने आपली शिकवणूक तुमच्या बायबलमधे दिली आहे हें आपलें भाग्य आहे. येशू ख्रिस्त म्हणतात, "माझ्या अत्यंत निकृष्ट बांधवांकरता तुम्हीं जें केलें आहे तें तुम्हीं माझ्याकरताच केलें आहे." तुम्ही कोणालाहि साहाय्य करूं शकतां असा विचार करणें ही ईश्वरनिंदा होय. प्रथम आपल्या मनांतून ही साहाय्य करण्याची कल्पना समूळ काढून टाका आणि नंतर पूजेसाठी जा. देवाचीं अपत्यें हीं तुमच्या प्रभूचीं अपत्यें होत. आणि अपत्यें म्हणजे पित्याचींच निरनिराळीं रूपें होत. तुम्ही त्याचे सेवक आहांत . . . . जिवंत देवाची सेवा करा ! देव तुमच्याकडे आंधळ्याच्या, पंगु माणसाच्या, गरिबाच्या, दुबळ्याच्या आणि सैतानी प्रवृत्तीच्या व्यक्तीच्या रूपांत येतो. पूजा करण्याची तुम्हांला ही केवढी सुंदर संधि आहे ! आपण 'मदत' करीत आहोंत हा विचार ज्या क्षणीं तुमच्या मनांत येतो त्या क्षणीं तुम्ही सारेंकांही बिघडवून टाकतां व स्वत:चा अध:पात करून

घेतां. हें जाणून कर्म करा. तुम्ही विचाराल 'असें केल्याने काय होतें ?' असें केल्याने तुम्हांला तो अपेक्षाभंग, तें दुःख अनुभवावें लागत नाही. . . .मग कर्म म्हणजे गुलामगिरी राहत नाही. तें एक खेळ बनतें, साक्षात् आनंद बनतें. . . .कर्म करा ! आसक्ति असूं देऊं नका ! हेंच संपूर्ण रहस्य आहे. तुम्ही आसक्त झालांत की तुम्हीं स्वत:वर दुःख ओढवून घेतलेंच म्हणून समजा. . . .

जीवनांत आपण जें कांही करतों त्या प्रत्येक कार्याशीं आपण एक होऊन जातों. एखादा मनुष्य मला उद्देशून कठोर शब्द बोलतो. मला क्रोध येत आहे अशी मला जाणीव होते. कांही क्षणांतच क्रोध व मी एक होऊन जातों आणि मग दुःख येतें. तुम्ही प्रभूशिवाय दुसऱ्या कशावरहि आसक्त होऊं नका, कारण प्रभूखेरीज बाकी सर्वकांही असत्य आहे. असत्याविषयी आसक्ति बाळगल्याने दुःख भोगावें लागतें. एकच सद्वस्तु अस्तित्वांत आहे; एकच चैतन्य अस्तित्वांत आहे; आणि त्यांत ज्ञेयहि नाही व ज्ञाताहि नाही. . . .

परंतु आसक्तिरहित प्रेम तुम्हांला दुःख देणार नाही. कांहीहि करा--विवाह करा, मुलें असूं द्या . . .तुम्हांला आवडेल तें कांहीहि करा--कांहीहि तुम्हांला दुःख देणार नाही. 'माझें' या कल्पनेने कांहीहि करूं नका. कर्तव्यासाठी कर्तव्य, कर्मासाठी कर्म करा. 'माझें'पणा बाळगूं नका. तुम्ही बाजूस उभे राहा.

आपण जेव्हा ही अनासक्ति प्राप्त करून घेतों तेव्हा आपल्याला या विश्वाचें विस्मयावह गूढ समजतें; या विश्वांत आत्यंतिक क्रियाशीलत्व व तीव्र स्पंदन कसें आहे आणि त्याचबरोबर आत्यंतिक शांति व स्तब्धताहि कशी आहे, त्यांत प्रतिक्षणीं कर्म कसें होत आहे व त्यांत प्रतिक्षणीं विश्रांतिहि कशी आहे हें

आपल्याला समजून येतें. निर्गुण आणि सगुण एकत्र वसत आहेत, अनंत व सान्त एकत्र राहत आहेत हेंच विश्वाचें रहस्य आहे. मग आपल्याला हें रहस्य उकलेल. "जो आत्यंतिक क्रियाशीलतेंत अत्यंत विश्रांति पाहतो आणि ज्याला अत्यंत विश्रांतींत निरतिशय क्रियाशीलता आढळते, तो योगी झाला आहे." * तोच खरा कर्म करणारा होय, इतर कोणीहि नाही. आपण थोडेसें कर्म करतों व कोलमडून पडतों. असें कां होतें ? आपल्या ठिकाणीं त्या कर्माविषयी आसक्ति निर्माण होते. आपल्या ठिकाणीं जर आसक्ति निर्माण झाली नाही तर कर्म करीत असतां त्याच वेळीं आपल्याला अनंत विश्रांति पण लाभते . . . .

अशा प्रकारच्या अनासक्तीपर्यंत येऊन पोहोचणें हें किती दुर्घट आहे ! म्हणून श्रीकृष्ण आपल्याला खालच्या स्तरावरील मार्ग दाखवितात. प्रत्येकाला सर्वांत सुगम मार्ग हा की प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपापलें कर्म करावें आणि त्याचें फल स्वत: घेऊं नये. आपली वासना आपल्याला बांधून टाकते. आपण आपल्या कर्माचें चांगलेंवाईट फल स्वत: घेतलें तर तें आपल्याला भोगावें लागेल. परंतु जर आपण स्वत:साठी कर्म न करतां प्रभूसाठी कर्म केलें तर आपल्याला कर्माचीं फळें भोगावीं लागणार नाहीत. "कर्मावरच तुमचा अधिकार आहे, फळांवर नाही."† सैनिक कर्म करतो तें फलासाठी नव्हे. तो आपलें कर्तव्य बजावतो. पराजय झाला तर तो सैनिकाचा नसतो, तो सेनापतीचा असतो. आपण आपलें कर्तव्य प्रेमाप्रीत्यर्थ करतों--सेनापतीच्या प्रेमाप्रीत्यर्थ, प्रभूच्या प्रेमाप्रीत्यर्थ . . . .

तुम्ही जर समर्थ असाल तर वेदान्त तत्त्वज्ञान घ्या आणि

---

* गीता ४–१८

† गीता २–४७

मुक्त व्हा. तुम्ही तें करूं शकत नसाल तर ईश्वराची उपासना करा; तेंहि न जमल्यास एखाद्या मूर्तीची पूजा करा. तुमच्या ठिकाणीं हेंहि करण्याचें सामर्थ्य नसेल तर फलेच्छा न बाळगतां सत्कर्मे करा. तुमचें सर्वस्व प्रभुसेवेसाठी अर्पण करा. साधना करीत राहा ! "कोणी माझ्या वेदीवर पानें, पाणी वा एखादें फूल--कांहीहि ठेवतो, तें मी सारख्याच आनंदाने स्वीकारतों."* तुम्हांला कांहीच करतां येत नसेल, एकहि सत्कर्म करतां येत नसेल, तर प्रभूला शरण जा. "प्रभु जीवांच्या हृदयांत वास करतो, त्यांना आपल्या चक्रावर भ्रमण करावयास लावतो. तूं अंतःकरण-पूर्वक त्याला शरण जा."‡. . .

श्रीकृष्णांनी ईश्वरप्रेमाविषयी गीतेंत जें विवरण केलें त्यांतील या कांही सर्वसाधारण कल्पना आहेत. इतर थोर ग्रंथां-तूनहि -- बुद्धदेवांच्या व येशू ख्रिस्तांच्या ग्रंथांतूनहि प्रेमावर प्रवचनें आहेत. . . .

श्रीकृष्णांच्या चरित्राविषयी मी आता कांही सांगतों. येशू ख्रिस्त आणि श्रीकृष्ण यांच्या चरित्रांत बरेंच साम्य आहे. ह्या दोघांपैकी कोणी कोणापासून उसनवारी केली याबद्दल चर्चा चालू आहे. दोघांच्याहि चरित्रांत जुलमी राजाचा उल्लेख आहे. दोघेहि गवाणींत जन्मले. दोघांचेहि आईवडील बंदिवासांत होते. दोघांनाहि देवदूतांनी वांचविलें. दोघांच्याहि जन्माच्या वर्षी जन्मलेले सर्व मुलगे ठार करण्यांत आले होते. दोघांचें बालपण समान आहे. . . .तसेंच, अखेरीस दोघेहि ठार केले गेले. श्रीकृष्ण हे अपघाताने मारले गेले; त्यांना ठार करणाऱ्यास त्यांनी स्वर्ग-लोकीं नेलें. येशू ख्रिस्तांना ठार मारण्यांत आलें; त्यांनी

* गीता ९-२६ ‡ गीता १८--६१

अंतकाळीं चोराला आशीर्वाद दिला व स्वर्गास नेलें.

बायबलची नवसंहिता व गीता यांच्या शिकवणुकींत पुष्कळ साम्यस्थळें आहेत. मानवी विचाराची गति सर्वत्र सारखी असते. . . . मी याचें उत्तर तुमच्यासाठी श्रीकृष्णांच्याच शब्दांतून शोधून देतों. "जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो आणि अधर्म बळावतो तेव्हा तेव्हा मी अवतार घेतों. मी पुन:पुन: पृथ्वीवर अवतीर्ण होतों. म्हणून जेव्हा एखादा थोर महापुरुष मानवजातीच्या उद्धारासाठी प्रयत्न करतांना तुला आढळेल तेव्हा मी आलों आहें असें तूं जाण आणि उपासना कर." † . . .

आता असा प्रश्न उद्भवतो की तो ईश्वरच जर बुद्ध व येशू ख्रिस्त यांच्या रूपाने येत असेल तर एवढा मतभेद कां असावा ? अवतारांच्या शिकवणुकींचें अनुसरण केलें पाहिजे ! हिंदु भक्त म्हणेल की ईश्वरच ख्रिस्त, कृष्ण, बुद्ध आणि अन्य थोर आचार्य झाला आहे. हिंदु तत्त्वज्ञ म्हणेल की हे महापुरुष आहेत; ते आधीपासूनच मुक्त आहेत. आणि ते जरी मुक्त असले तरी सारें जग दु:खांत खितपत पडलें आहे तोंवर ते आपल्या मुक्तीचा स्वीकार करीत नाहीत. ते पुन: पुन: येतात, मानवशरीर धारण करतात आणि मानवजातीला साहाय्य करतात. आपण कोण आहोंत आणि कशासाठी आलों आहोंत हें त्यांना बालपणापासून ठाऊक असतें. . .आपण जसे बंधनामुळे जन्माला येतों तसे ते येत नाहीत. . .ते स्वेच्छेने जन्म घेतात आणि त्यांच्या ठायीं प्रचंड आध्यात्मिक सामर्थ्य अनिवार्यपणेंच असतें. आपल्याला त्या सामर्थ्याचा प्रतिकार करतां येत नाही. बहुसंख्य मानव आध्यात्मिकतेच्या भोवऱ्यांत ओढले जातात आणि ह्या महा-

---

† गीता ४-८; १०-४१

पुरुषांपैकी एकेकाने चालना दिल्यामुळे आध्यात्मिकतेचें हें स्पंदन चालूंच राहतें. अशा रीतीने सर्व मानवजात मुक्त होऊन पृथ्वीवरील खेळ समाप्त होईपर्यंत आध्यात्मिकतेचें हें स्पंदन चालूंच राहतें.

ज्या महापुरुषांचीं चरित्रें आपण अभ्यासीत आलों त्यांचा जयजयकार असो ! ते या पृथ्वीवरील जिवंत ईश्वर आहेत. ह्या महापुरुषांची आपण उपासना करावयास हवी. ईश्वर जर माझ्याकडे आला तर त्याने मानवी रूप धारण केलें असेल तरच मी त्याला ओळखूं शकेन. तो सर्वत्र आहे, पण तो आपल्याला दिसतो काय ? जर तो स्वत:ला मानवी रूपांत सीमित करून घेईल तरच आपण त्याला पाहूं शकूं. . . . जर मानव आणि . . . इतर प्राणी ईश्वराचीं व्यक्त रूपें असलीं तर हे मानवजातीचे आचार्य आहेत, नेते आहेत, आपले गुरु आहेत. ज्यांचे चरण देवदूतांनी पूजिले आहेत अशा तुम्हां महापुरुषांना वंदन असो ! तुम्हां मानवजातीच्या नेत्यांना प्रणाम असोत ! तुम्हां थोर आचार्यांना प्रणाम असोत ! तुम्हां नेत्यांना आमचे शाश्वत प्रणाम असोत !

---

# गीता–१

(सॅन् फ्रान्सिस्को येथे दि. २६ मे १९०० रोजीं दिलेलें व्याख्यान)

गीतेचें आकलन करण्यासाठी तिची ऐतिहासिक पूर्वपीठिका अवगत हवी. गीता हें उपनिषदांवरील भाष्य आहे. उपनिषदें म्हणजे भारतवर्षाचें 'बायबल' होत. बायबलच्या नवसंहितेचें जें स्थान आहे तेंच उपनिषदांचें आहे. उपनिषदें म्हणून ज्ञात असलेल्या पुस्तकांची संख्या शंभर किंवा त्याहूनहि अधिक आहे. त्यांतील कांही फार लहान आहेत, तर कांही फार मोठीं आहेत; परंतु प्रत्येक उपनिषद स्वतंत्र आहे. उपनिषदांत कोणत्याहि आचार्यांच्या जीवनाचें वर्णन नाही. तीं केवळ तत्त्वें शिकवितात. तीं म्हणजे राजांच्या दरबारीं किंवा इतरत्र भरविण्यांत आलेल्या सभांमधे झालेल्या विद्वज्जनांच्या चर्चांची जणु लघुलिपींत घेण्यांत आलेलीं टिपणें आहेत. 'उपनिषद्' शब्दाचा अर्थ 'बैठक' अथवा 'गुरूच्या जवळ बसणें' असा होतो. आपणांपैकी ज्यांनी कांही उपनिषदांचें अध्ययन केलें असेल त्यांना तीं कशीं लघुलिपींत घेतलेलीं संक्षिप्त टिपणें आहेत तें समजेल. दीर्घ चर्चा होऊन गेल्यानंतर, तीं संभवत: स्मरणांतून टिपून काढण्यांत आलीं होतीं. अडचण ही आहे की तुम्हांला त्यांत पूर्वपीठिका अशी फार थोडी मिळते. महत्त्वाचे व ज्ञान देणारे असे जे मुद्दे आहेत तेच मांडलेले आहेत. प्राचीन संस्कृताचा आरंभकाळ इसवी सनापूर्वी ५००० वर्षें हा आहे. उपनिषदें हीं त्याहूनहि कमींत कमी दोन हजार वर्षें आधीचीं आहेत. तीं नेमकी किती पुरातन आहेत हें कोणालाच माहीत नाही. गीतेने उपनिषदांचे विचार आणि कांही स्थळीं तर त्यांचे शब्द घेतले आहेत. उपनिषदांनी प्रतिपादिलेल्या

समग्र विषयाचें संक्षिप्त, सुघटित व व्यवस्थित विवेचन करण्याच्या उद्देशाने हे विचार गीतेंत एकत्र ग्रंथित करण्यांत आले आहेत.

हिंदूंच्या मूळच्या धर्मग्रंथांना 'वेद' म्हणतात. ते एवढे विस्तृत होते--तें सारें लिखाण एवढें मोठें होतें--की ते येथे आणण्यांत आले असते तर या खोलींत ते मावले नसते. त्यांतील पुष्कळ अंश नष्ट झाला आहे. वेदांचें विविध शाखांत विभाजन करण्यांत आलें होतें; प्रत्येक शाखा कांही पुरोहितांनी पाठ केली होती आणि त्यांच्या स्मरणशक्तीच्या सामर्थ्यामुळेच या शाखा जिवंत राहिल्या. अशीं माणसें अद्यापहि दिसून येतात. तीं वेदांच्या संहिता एकामागून एक घडाघडा म्हणून दाखवितील आणि त्यांत स्वराची एकहि चूक होणार नाही. वेदांचा अधिकांश भाग लोप पावला आहे जो छोटासा भाग राहिला आहे तोच एक संपूर्ण ग्रंथालय भरून टाकील. यांतील प्राचीनतम अंश म्हणजे ऋग्वेदांतील सूक्तें होत. या वैदिक रचनांचा क्रम पुनः स्थापित करणें हें आधुनिक विद्वानांचें उद्दिष्ट आहे. जुनी वा पुराणमतवादी लोकांची कल्पना अगदी वेगळी आहे. बायबलविषयी तुमच्याकडील पुराणमतवादी लोकांची कल्पना ही आधुनिक विद्वानांच्या तद्विषयक कल्पनेहून जशी भिन्न आहे तसेंच वेदांच्या बाबतींत आहे. वेदांचें विभाजन दोन भागांत करण्यांत आलें आहे एक उपनिषदें वा ज्ञानकांड; आणि दुसरा कर्मकांड.

वेदांच्या कर्मकांडाविषयी थोडीशी कल्पना देण्याचा प्रयत्न करूं या. तो यज्ञयागादि विधि आणि स्तोत्रें यांचा बनलेला आहे. हीं स्तोत्रें विविध असून अनेक देवतांना उद्देशून रचलीं गेलीं आहेत. कर्मकांडांतील कांही अनुष्ठानें अत्यंत विस्तृत स्वरूपाचीं आहेत. त्यांत अनेक पुरोहितांची आवश्यकता असते. पुरोहितांचें

काम हें एक शास्त्रच बनलें. याला कारण म्हणजे या अनुष्ठानांचा प्रचंड विस्तार. क्रमशः या स्तोत्रांभोवती व अनुष्ठानांभोवती लोकांची पूज्यबुद्धि वा आदरभाव केंद्रित झाला. देवदेवतांचा लोप होऊन त्यांची जागा या यज्ञयागादि विधींनी घेतली. ही भारतवर्षांतील विलक्षण अशी घटना होती. मीमांसक संप्रदायाचे हिंदु देवांवर विश्वास ठेवीत नाहीत. इतर हिंदु देवांवर विश्वास ठेवतात. तुम्हीं जर मीमांसकांना विचारलें, 'या वेदांतील देवांचा काय अर्थ आहे?' तर त्यांना समाधानकारक उत्तर देतां येणार नाही. पुरोहित वा ऋत्विज हीं स्तोत्रें गातात आणि हविद्रव्यें व आहुति अग्नींत अर्पण करतात. तुम्हीं जर मीमांसकांना याचा अर्थ विचारला तर ते म्हणतील की शब्दांच्या ठायीं कांही फल निर्मिण्याचें सामर्थ्य असतें एवढाच त्याचा अर्थ आहे. संपूर्ण प्राकृतिक व दिव्य शक्ति या शब्दांमधेच आंहे. वेद म्हणजे केवळ असे शब्द होत की ज्यांच्या ठिकाणीं स्वरोच्चार बरोबर झाल्यास फल उत्पन्न करण्याची गूढ शक्ति वास करते. परंतु एक स्वर जरी चुकला तरी कार्य व्हावयाचें नाही. प्रत्येक स्वराचा उच्चार निर्दोष असावयास हवा. याप्रमाणे इतर धर्मांत जिला 'प्रार्थना' म्हणतात ती लोप पावली आणि वेद हेच देव बनले. यावरून वेदांतील शब्दांना जें प्रचंड महत्त्व देण्यांत आलें तें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. हे तेच शाश्वत शब्द होत की ज्यांतून साऱ्या विश्वाची निर्मिति झाली. शब्दावांचून कोणताच विचार संभवत नाही. अशा प्रकारें या जगांत जें कांही आहे तें विचाराची अभिव्यक्ति आहे आणि विचार स्वतःला केवळ शब्दांच्या द्वारेंच व्यक्त करूं शकतो. ज्या शब्दसमूहाच्या द्वारें अव्यक्त विचार व्यक्त होतात तो शब्दसमूह म्हणजेच वेद होय. यावरून हा

निष्कर्ष निघतो की बाह्य विश्वांतील प्रत्येक वस्तूचें अस्तित्व वेदांवर अवलंबून आहे. कारण विचार शब्दावांचून असूं शकत नाही. 'अश्व' हा शब्दच नसता तर कोणालाहि अश्वाचा विचार करतां आला नसता. म्हणून विचार, शब्द व बाह्य वस्तु यांत अविभाज्य संबंध असला पाहिजे. हे शब्द खरोखर काय आहेत ? ते वेद आहेत. भारतांतील लोक तिला मुळी 'संस्कृत भाषा' म्हणतच नाहीत. ती वैदिक भाषा आहे, दैवी भाषा आहे. संस्कृत हें तिचें अवनत रूप होय. हीच गोष्ट इतर सर्व भाषांना लागू आहे. वैदिक भाषेहून अधिक पुरातन अशी कोणतीहि भाषा नाही. तुम्ही विचाराल, वेद कोणीं लिहिले ? ते लिहिले गेले नव्हते. वर सांगितल्याप्रमाणे शब्द हेच वेद आहेत. मला जर शब्दाचा नीट उच्चार करतां येत असेल तर तो शब्दच वेद होय. मग तो तात्काळ इष्ट फल उत्पन्न करील.

हे वेद अनंत काळापासून अस्तित्वांत आहेत आणि सारें जग या शब्दसमूहाची अभिव्यक्ति होय. नंतर जेव्हा कल्प पूर्ण होतें तेव्हा शक्तीचा हा सगळा आविष्कार सूक्ष्म, सूक्ष्मतर होत जातो; तो निव्वळ शब्द बनतो आणि त्यानंतर विचाररूप धारण करतो. पुढील कल्पांत विचाराचें प्रथम शब्दांत रूपान्तर होतें आणि नंतर त्या शब्दांतून सारें विश्व निर्माण होतें. वेदांमधे नसलेली एखादी वस्तु जर तुम्हांला तेथे दिसत असेल तर तो तुमचा भ्रम होय. असल्या वस्तूला अस्तित्वच नसतें.

ह्या विषयावर लिहिलीं गेलेलीं अनेक पुस्तकें वेदांचें समर्थन करतात. तुम्हीं जर या पुस्तकांच्या लेखकांना सांगितलें की वेद प्रथम माणसांकडून उच्चारले गेले असले पाहिजेत तर ते नुसते हसतील. वेदांचा ज्यांनी प्रथम उच्चार केला अशा कोण-

त्याहि माणसाचें नांव तुम्हांला ठाऊक नाही. बुद्धदेवांचे शब्द घ्या. अशी परंपरागत समजूत आहे की त्यांनी आपल्या अनेक पूर्वजन्मांमधे हे शब्द उच्चारले होते. एखादा ख्रिस्ती माणून उठून म्हणूं लागला की "माझा धर्म हा ऐतिहासिक धर्म आहे, म्हणून तुमचा धर्म चुकीचा व माझा बरोबर आहे" तर मीमांसक त्याला असें उत्तर देईल की "तुमचा धर्म ऐतिहासिक असल्याने तुम्ही कबूल करतां की एकोणीसशे वर्षांपूर्वी एका मनुष्याने तो नव्याने शोधून काढला. जें सत्य आहे तें अनंत व शाश्वत असलें पाहिजे. तीच सत्याची एकमेव कसोटी आहे. सत्य केव्हाच क्षय पावत नाही, तें निरंतर तसेंच राहतें. तुमचा धर्म अमक्या अमक्या माणसाने उपत्न्न केला हें तुम्ही मान्य करतां. वेद असे कोणीं उत्पन्न केले नव्हते. कोणत्याहि द्रष्टयाने नव्हे किंवा आणखी कोणींहि नव्हे. . . .वेद म्हणजे केवळ अनंत शब्द होत--स्वरूपत: अनंत असे शब्द होत. त्यांच्यापासून सारें विश्व निघतें व त्यांच्यांतच तें विलीन होतें." तात्त्विक दृष्टया हें संपूर्णतया बरोबर आहे. . . .सृष्टीच्या आरंभीं शब्द वा ध्वनि असला पाहिजे. जसे प्राणीशरीराचें आधारभूत बीज असतें तसेंच सर्व शब्दांचे आधारभूत असे बीजशब्द असले पाहिजेत. शब्दावांचून कोणतेहि विचार असूं शकत नाहीत. . . .ज्या ज्या ठिकाणीं कांही सवेदना, विचार वा भावना आहेत त्या त्या ठिकाणीं शब्द असले पाहिजेत. हे चार ग्रंथ तेवढेच वेद आहेत, इतर कोणतेहि ग्रंथ वेद नाहीत असें जेव्हा मीमांसक म्हणतात तेव्हाच अडचण उत्पन्न होते. मग एखादा बौद्ध उठून म्हणेल, "आमचे ग्रंथ वेद आहेत. ते आमच्यासाठी नंतर प्रकट झाले." तसें असूं शकत नाही. सृष्टि अशा प्रकारें चालत नाही. सृष्टि आपले नियम क्रमश:

प्रकट करीत नाही; गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा कांही अंश आज प्रकट झाला, तर दुसरा अंश उद्या प्रकट झाला असें घडत नाही. प्रत्येक नियम संपूर्ण आहे. नियमांत कोणताच क्रमविकास नाही. तो एकदाच आणि नेहमीसाठी प्रकट होतो. ‘ आमचा धर्म नवीन आहे म्हणून तो अधिक चांगला आहे ’ इत्यादि सर्व विधानें अर्थशून्य आहेत. त्यांत कांहीच सार नाही. नियम हजारो असतील आणि माणसाला आज त्यांतले अगदी थोडे माहीत असतील. आपण ते शोधून काढतों, इतकेंच. शाश्वत शब्दांविषयीचा प्रचंड दावा सांगणाऱ्या त्या प्राचीन पुरोहितांनी देवांना दूर सारलें आणि त्यांनी स्वतः देवांची जागा घेतली. ते म्हणाले, “तुम्हांला शब्दांची शक्ति कळत नाही. त्यांचा कसा उपयोग करावयाचा तें आम्ही जाणतों. आम्ही जगांतील जिवंत देव आहोंत. तुम्ही आम्हांला धन द्या; आम्ही शब्दांचा हवा तसा उपयोग करूं आणि तुम्हांला हवें तें मिळवून देऊं. तुम्ही स्वतः शब्दांचा उच्चार करूं शकतां काय ? तुम्ही करूं शकत नाही. कारण, लक्षांत ठेवा की एक चूक जरी झाली तरी नेमका उलट परिणाम घडून येईल. तुम्हांला धनी, रूपवान व्हावयाचें आहे काय ? तुम्हांला दीर्घायुष्य हवें आहे काय ? तुम्हांला सुरेख नवरा हवा आहे काय ?” पुरोहिताला दक्षिणा द्या आणि तुम्ही स्वस्थ बसा !

तरी वेदांच्या शिकवणीला दुसरीहि बाजू आहे. वेदाच्या प्रथम भागाचें––कर्मकांडाचें––उद्दिष्ट हें त्याच्या द्वितीय भागाच्या––उपनिषदांच्या––उद्दिष्टाहून सर्वस्वी वेगळें आहे. पहिल्या भागाचें उद्दिष्ट हें वेदान्त सोडून जगांतील इतर सर्व धर्मांच्या उद्दिष्टाशीं जुळणारें आहे. तें उद्दिष्ट म्हणजे इहपरलोकीं सुख भोगणें, नवरा, बायको, मुलें, हें आहे. तुम्ही दक्षिणा

द्या आणि पुरोहित तुम्हांला शिफारसपत्र देईल, आणि नंतर स्वर्गांत तुमची सुखाने कालक्रमणा होईल. तुम्हांला तुमचीं सारीं माणसें तेथे भेटतील आणि तुम्हांला पुनःपुनः आनंद मिळत राहील--त्याचा अंत होणार नाही. तेथे अश्रु नाहीत, रडणें नाही, केवळ हसणें आहे. तेथे पोटदुखी नाही, परंतु भरपूर खाणें आहे. डोकेदुखीचें नांव नाही, परंतु मेजवान्या आहेत. त्या पुरोहितांच्या मतें मनुष्याचें हेंच सर्वोच्च ध्येय होय.

या तत्त्वज्ञानांत आणखी एक कल्पना तुमच्या आधुनिक विचारांशीं जुळणारी अशी आहे. मनुष्य हा प्रकृतीचा गुलाम आहे, आणि अनंत काळ त्याला गुलामच राहावें लागेल. आम्ही त्याला 'कर्म' म्हणतों. 'कर्म' म्हणजे नियम आणि तो सर्वत्र लागू आहे. प्रत्येक वस्तु 'कर्मा'ने बांधलेली आहे. "बाहेर पडायला कोणताच मार्ग नाही काय ?" "नाही ! सर्वकाळ गुलाम म्हणून राहा,--अगदी उत्तम गुलाम ! आम्ही शब्दांचा अशा रीतीने उपयोग करूं की त्यामुळे तुम्हांला केवळ चांगलेंच फल लाभेल, वाईट फल लाभणार नाही; अर्थात् एका अटीवर--ती म्हणजे तुम्हीं आम्हांला पुरेशी दक्षिणा दिली पाहिजे." हें मीमांसकांचें ध्येय होतें. हीं उद्दिष्टें युगानुयुगांपासून लोकप्रिय आहेत. बहुसंख्य मानव विचारशील नसतात. जरी त्यांनी विचार करण्याचा प्रयत्न केला तरी असंख्य भोळ्या समजुतींचा त्यांच्यावर असलेला प्रभाव भयंकर असतो. त्यांच्यांत दुबळेपणा शिरतांच त्यांच्यावर आघात होऊन त्यांच्या पाठीचा कणा मोडून त्याचे तुकडे तुकडे होतात. त्यांच्याकडून काम करवून घ्यावयाचें असल्यास त्यांना प्रलोभन दाखवावें लागतें किंवा धाक दाखवावा लागतो. आपण होऊन ते कधीच काम करणार नाहीत त्यांना भय दाखविलें पाहिजे,

खूप भय दाखविलें पाहिजे. मग ते तुमचे कायमचे गुलाम बनतील. त्यांच्याजवळ मग दुसरें कांही काम उरत नाही. दक्षिणा देणें व आज्ञापालन करणें एवढेंच त्यांचें काम होऊन बसतें. बाकी सारेंकांही पुरोहित करतात. . . . अशा प्रकारें धर्म कितीतरी सोपा होऊन जातो ! तुम्हांला कांहीच करावें लागत नाही. घरीं जावें आणि स्वस्थ बसावें. कोणीतरी सारा खटाटोप तुमच्यासाठी करीत असतो. गरीब बिचारे प्राणी !

याबरोबरच दुसरीहि विचारपद्धति होती. उपनिषदांचे सारे निष्कर्ष मीमांसकांच्या निष्कर्षाहून अगदी विरुद्ध स्वरूपाचे आहेत. अगदी प्रथम सांगावयाचें म्हणजे उपनिषदांचा, जगाचा स्रष्टा व नियन्ता अशा ईश्वरावर विश्वास आहे. नंतरच्या काळांत तुम्हांला दयाळू ईश्वराची कल्पना आढळते. ती सर्वस्वी उलट स्वरूपाची आहे. आता, आपण पुरोहिताचें अनुसरण करीत असलों तरी ध्येय हें खूपच सूक्ष्म स्वरूपाचें आहे. अनेक देवांऐवजी मग त्यांनी एकच ईश्वर मानला.

दुसरें म्हणजे तुम्ही सर्वजण कर्माच्या नियमाने जखडलेले आहांत हें उपनिषदांना मान्य आहे. परंतु त्यांनी बाहेर पडण्याचा मार्ग दाखवून दिला. नियमाच्या पलीकडे जाणें हेंच मनुष्याचें ध्येय आहे. भोग कधीच ध्येय होऊं शकत नाही; कारण भोग केवळ प्रकृतीच्या मर्यादेंतच संभवतो.

तिसरी गोष्ट म्हणजे उपनिषदें सर्व यज्ञांची निंदा करतात आणि म्हणतात की हीं सारीं हास्यास्पद अनुष्ठानें आहेत. यज्ञयाग तुम्हांला हवें तें सर्व देतीलहि, परंतु तें इष्ट नाही; कारण जों जों अधिकाची तुम्हांला प्राप्ति होते तों तों तुमची इच्छा अधिकच वाढते व तुम्ही निरंतर गोल गोल फिरत राहतां व याचा कधी

अंत होत नाही. तुम्ही सतत भोग भोगतां आणि अश्रु ढाळतां. शाश्वत सुख हें कोठेहि संभवनीय नाही. तें केवळ बालिश स्वप्न आहे. तीच शक्ति कधी आनंदाच्या तर कधी दुःखाच्या रूपांत प्रकट होते.

मीं माझें मानसशास्त्र आज थोडें बदललें आहे मला एक विलक्षण गोष्ट आढळली आहे. तुमच्या मनांत एक विचार उठला आहे, परंतु तो तुम्हांला नको आहे. मग तुम्ही तुसऱ्या कशाचा तरी विचार करतां आणि तुम्हांला जो विचार दडपून टाकावयाचा होता तो संपूर्णतया दडपला जातो. तो कोठे जातो ? तो पंधरा मिनिटांच्या अवधींत पुनः वर येतांना दिसतो. तो बाहेर पडतो व मला घाबरवून सोडतो. तो इतका प्रबल असतो आणि तो इतक्या वेगाने व जोराने येतो की मला वेड लागतें की काय असें वाटूं लागतें. आणि हें सर्व जेव्हा संपतें तेव्हा मला कळून येतें की पूर्वीची एखादी भावना दडपली गेल्यामुळेच हें सारें घडलें होतें. बाहेर काय आलें होतें ? तो माझाच कुसंस्कार होता; त्याचा संपूर्ण क्षय व्हावयाचा होता. "प्रकृति आपल्या मार्गाने जाणारच; निग्रह बिचारा काय करणार ?"* गीतेंतील हें विधान मोठें भयंकर आहे. असें वाटतें की कांहीहि केलें तरी ही सर्व धडपड व्यर्थच ठरणार आहे. तुमच्या ठिकाणीं एकाच वेळीं हजारो वासना वर येण्याचा प्रयत्न करीत असतील. तुम्ही त्यांना दडपून टाकाल, पण तुमचें दडपण थोडें ढिलें होतांच त्या पुनः वर येतील.

परंतु, आशेला जागा आहे. तुम्ही जर पुरेसे समर्थ असाल तर तुम्ही आपली जाणीव एकाच वेळीं वीस भागांत विभागून टाकूं शकाल. मी माझें मानसशास्त्र बदलीत आहें. मनाचा विकास

* गीता ३–३३

होतो असें योगी सांगतात. एखादा विकार असतो; तो दुसऱ्या विकाराला जागृत करतो, आणि पहिला विकार लोप पावतो. तुम्ही जर क्रुद्ध झालांत व नंतर सुखी झालांत तर दुसऱ्या क्षणीं क्रोध मावळतो. त्या क्रोधांतून तुम्हीं नंतरची अवस्था निर्मिलीत. या अवस्था नेहमी एकदुसरीच्या बदलीं आणतां येतात. चिरंतन सुख व चिरंतन दुःख हें एक बालिश स्वप्न आहे. उपनिषदें दाखवून देतात की मनुष्याचें ध्येय सुखहि नाही वा दुःखहि नाही; परंतु सुख आणि दुःख हीं दोन्हीं ज्यांतून निर्माण होतात त्यावर आपल्याला प्रभुत्व प्रस्थापित केलें पाहिजे. मानसिक अवस्थेच्या जणु मुळावरच आपण प्रभुत्व संपादन केलें पाहिजे.

दुसरा भेदाचा मुद्दा असा आहे की उपनिषदें साऱ्या यज्ञ-क्रियांची निंदा करतात; विशेषतः ज्यांत पशुहत्या आहे अशा यज्ञांची ते निंदा करतात. उपनिषदांची अशी घोषणा आहे की या साऱ्या यज्ञक्रिया निरर्थक आहेत. तत्त्वज्ञांची एक जुनी शाखा म्हणते की तुम्हांला जर विशिष्ट फल प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर तुम्हीं अमुक प्राणी अमक्या वेळी ठार केला पाहिजे. तुम्ही उत्तर द्याल, "परंतु यांत पशुहत्येचें पाप आहे; त्यामुळे आम्हांला त्याचा वाईट परिणाम भोगावा लागेल." या तत्त्वज्ञांचें यावर म्हणणें आहे की, "तुम्हीं जें म्हणतां तें अर्थहीन आहे. काय बरोबर आहे आणि काय चूक आहे हें तुम्हांला कसें ठाऊक? तुमचें मन तसें म्हणतें ? तुमचें मन काय म्हणतें याची कोण पर्वा करतो ? हें काय तुम्ही अर्थहीन बडबडत आहांत ? तुम्ही आपल्या मनाला श्रुतींच्या विरुद्ध उभें करीत आहां. तुमचें मन एक गोष्ट सांगत असेल आणि वेद दुसरेंच कांही सांगत असतील, तर तुमच्या मनाचें न ऐकतां वेदांवर विश्वास ठेवा. ते जर म्हणत

असतील की मनुष्याला ठार मारणें बरोबर आहे तर तें बरोबर आहे. तुम्ही जर म्हणाल, 'नाही, माझी सदसद्विवेक बुद्धि उलट सांगते' तर तें चालणार नाही. ज्या क्षणीं तुम्ही एखाद्या ग्रंथावर हा 'शाश्वत शब्द' आहे, हा पवित्र आहे असा विश्वास ठेवतां त्या क्षणापासून पुढे केव्हाहि तुम्ही त्याविरुद्ध आक्षेप घेऊं शकणार नाही." तुम्ही येथील लोक जेव्हा बायबलविषयी असें म्हणतां की "हे शब्द किती विस्मयजनक आहेत! ते किती बरोबर व किती चांगले आहेत!" तेव्हा तुम्ही त्या ग्रंथावर विश्वास ठेवतां तो कोणत्या अर्थाने हें मला उमगत नाही; कारण, तुमचा जर बायबलवर 'हा ईश्वराचा शब्द आहे' असा विश्वास असेल तर तुम्हांला त्याच्याविषयी आपला अभिप्राय प्रकट करण्याचा मुळीच अधिकार नाही. ज्या क्षणीं तुम्ही असा अभिप्राय व्यक्त करतां त्या क्षणीं 'आम्ही बायबलहून श्रेष्ठ आहोंत' असें तुम्हांला वाटत असतें. मग तुम्हांला बायबलचा काय उपयोग ? जुन्या संप्रदायाचे पुरोहित म्हणतात, "आम्ही तुमच्या बायबलशीं किंवा दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाशीं तुलना करण्यास तयार नाहीं. तुलना करण्यांत कांही अर्थ नाही. कारण, प्रमाण कुणाला मानावयाचें? आम्हांला एवढेंच म्हणावयाचें आहे. तुम्हांला जर एखादी गोष्ट बरोबर नाही असें वाटत असेल तर वेदांच्या अनुषंगाने ती बरोबर करून घ्या."

उपनिषदांचा वेदप्रामाण्यावर विश्वास आहे; परंतु, त्यांच्याजवळ अधिक उच्च असा एक मापदंड आहे. एकीकडे त्यांना वेदांना झुगारून द्यावयाचें नाही, तर दुसरीकडे त्यांना पशुबलि आणि पुरोहितांकडून होणारें सर्वांच्या वित्ताचें अपहरण या गोष्टी उचित नाहीत हें दिसतें. परंतु मानसशास्त्राच्या बाबतींत

उपनिषदांचें जुन्या संप्रदायांशीं एकमत आहे. सर्व भेद तत्त्वज्ञानाच्या बाबतींत आहे--आत्म्याचें स्वरूप काय आहे याविषयी सर्व मतभेद आहे. आत्म्याला शरीर आणि मन आहे काय ? आणि मन म्हणजे कांही नाड्यांचा समूह आहे काय ? संवेदनाशील नाड्यांचा, क्रियाशील नाड्यांचा तें एक समूह आहे काय ? ते सगळे गृहीत धरून चालतात की मानसशास्त्र हें पूर्णतेस गेलेलें आहे. त्यांत भेदाला कांहीच अवकाश नाही. सगळा झगडा आहे तो तत्त्वज्ञानाविषयी--आत्म्याचें स्वरूप, ईश्वराचें स्वरूप इत्यादींविषयी.

यानंतर जुन्या संप्रदायांचे पुरोहित आणि उपनिषदें यांच्यांत आणखी एक मोठा भेद आहे. उपनिषदें म्हणतात, "त्याग करा." ही सर्व गोष्टींची कसोटी आहे. सर्वस्वाचा त्याग करा. मनाची निर्मितिशक्ति हीच आपल्याला या जंजाळांत आणून सोडते. जेव्हा मन शांत असतें तेव्हा तें स्वतःच्या स्वरूपांत अवस्थित असतें. ज्या क्षणीं तुम्ही त्याला शांत करूं शकाल त्याच क्षणीं तुम्हांला सत्याचें ज्ञान होईल. मनाला भरकटायला कोण लावतें ? --कल्पनाशक्ति, निर्मितिशक्तीची क्रिया. ही निर्मिति थांबवा म्हणजे तुम्हांला सत्याचें ज्ञान होईल. निर्मितिशक्तीची सारी क्रिया थांबली पाहिजे, आणि मग तुम्हांला तात्काळ सत्याचा साक्षात्कार होईल.

याच्या उलट जुन्या संप्रदायाचे पुरोहित प्रजानिर्मितीच्या पक्षाचे आहेत. प्राण्यांचा असा एखादा प्रकार कल्पा की ज्याच्या ठिकाणीं निर्मितिरूप कोणतीच क्रिया नाही. अशी कल्पना आपल्याला करतां येणार नाही. स्थिर समाजाची निर्मिति करण्यासाठी लोकांना योजनेचा आश्रय घ्यावाच लागला. अगदी कांटेकोर निवडीच्या पद्धतीचा अंगीकार करण्यांत आला. उदाहरणार्थ, जे

आंधळेपांगळे आहेत ते विवाह करूं शकत नाहीत. परिणामतः तुम्हांला भारतांत जगांतील इतर कोणत्याहि देशापेक्षा व्यंग असलेले लोक कितीतरी कमी आढळतील. फेपऱ्याने पछाडलेले वा वेडे लोक तेथे फारच क्वचित् आढळतील. कांटेकोर निवडीचा हा परिणाम आहे. पुरोहित म्हणतात, "अशा लोकांना संन्यासी होऊं द्या." याउलट उपनिषदें म्हणतात, "छे तसें नव्हे! पृथ्वीवरील उत्तमोत्तम, सर्वाधिक सुंदर व अगदी ताजीं टवटवींत अशीं जीं सुमनें असतील तीं वेदीवर अर्पण करा. सबल, तरुण, धडधाकट शरीराचे, कार्यक्षम बुद्धीचे असे जे असतील त्यांनी सत्यप्राप्तीसाठी प्रयत्न करावयास हवा."

मीं तुम्हांला सांगितलें की अशा प्रकारें पुरोहितांचीं मतें भिन्न असल्यामुळे त्यांनी अगोदरच स्वतःची एक वेगळी जात बनविली. दुसरी जात राजांची होती. . . .उपनिषदांचें सर्व तत्त्वज्ञान हें राजेलोकांच्या मेंदूतून निघालें आहे, पुरोहितांच्या मेंदूतून नव्हे. प्रत्येक धार्मिक संघर्षामधून आर्थिक संघर्षहि चालू असलेला आढळतो. मनुष्य नांवाच्या या प्राण्यावर धार्मिक स्वरूपाचा कांही प्रभाव आहे, परंतु आर्थिक विचाराने त्याच्या जीवनाला वळण मिळतें. कांही विशिष्ट व्यक्ति दुसऱ्या कोणत्या तरी कारणाने प्रेरित होऊन कार्य करतात, परंतु अधिकांश लोक आर्थिक प्रश्न अंतर्भूत असल्यावांचून कार्य करीत नाहीत. सर्व तपशिलांनी परिपूर्ण नसलेला असा एखादा धर्म तुम्ही प्रतिपादूं शकाल, पण त्याला जर आर्थिक पार्श्वभूमि असेल आणि त्याचा प्रचार करण्यासाठी तुमच्याजवळ जर उत्साही प्रचारक असतील तर तुम्ही तो धर्म समग्र देशाला पटवून देऊं शकाल. . . .

जेव्हा कोणताहि धर्म विजयी होतो तेव्हा त्याचें कांही

आर्थिक मूल्य असलें पाहिजे. एकमेकांसारखे हजारो पंथ सत्तेसाठी धडपड करतील, परंतु जे पंथ आर्थिक प्रश्नाची नीट सोडवणूक करतील तेच तेवढे ती सत्ता प्राप्त करून घेतील. मनुष्याला पोट पुढे पुढे नेत असतें. तो जेव्हा चालतो तेव्हा प्रथम पोट पुढे जातें, नंतर डोकें. तुम्हीं हें पाहिलें नाही काय ? डोकें प्रथम पुढे जाण्यासाठी अनेक युगें लोटावीं लागतील. मनुष्य साठ वर्षांचा झाला की त्याला या जगाचा निरोप घ्यावा लागतो. समग्र जीवन हा एक भ्रम आहे; आणि तुम्हांला विभिन्न गोष्टींचें खरें स्वरूप कळूं लागतें न लागतें तोंच तुम्हांला हें जग सोडावें लागतें. जोंवर पोट प्रथम पुढे जात होतें तोंवर सर्व ठीक होतें. जेव्हा बालिश स्वप्नें नाहीशीं होऊं लागतात आणि वस्तूंचें खरें स्वरूप तुम्हांला कळूं लागतें तेव्हा डोकें प्रथम पुढे जाऊं लागतें, पण तेवढ्यांतच तुम्हांला या जगाबाहेर जावें लागतें.

उपनिषदांचा धर्म लोकप्रिय होणें हें अवघड काम होतें. त्यांत आर्थिक लाभ फार थोडा आहे, परंतु त्यांत परहिताची शिकवण प्रचंड प्रमाणांत आहे....

स्वतःच्या हातीं राजसत्ता वागविणाऱ्या राजांनी जरी उपनिषदें शोधून काढली तरी उपनिषदांचें असें फारच थोडें राज्य होतें. म्हणून संघर्ष अधिकच भीषण होऊं लागला.... त्याचें पर्यवसान आणखी दोन हजार वर्षांनी बौद्धधर्मांत झालें. राजे व पुरोहित यांच्यामधील संघर्षांत बौद्धमताचें बीज आहे आणि या संघर्षांत धर्माची अवनति झाली. एकाला धर्मासाठी सर्वकांही समर्पण करावयाचें होतें. तर दुसऱ्याला यज्ञ, वैदिक देव यांना चिकटून राहावयाचें होतें. बौद्धधर्माने जनतेच्या शृंखला तोडून टाकल्या....सगळ्या जाती, सगळे पंथ तात्काळ समान झाले.

अशा प्रकारें भारतांत महान् धार्मिक कल्पना अस्तित्वांत आहेत, परंतु अद्यापि त्यांचा प्रचार व्हावयाचा आहे. हा प्रचार झाल्याशिवाय त्यांच्यापासून कांहीहि हित व्हावयाचें नाही. . . .

प्रत्येक देशांत पुरोहित हेच जुन्याला चिकटून राहणारे वा पुराणमतवादी असतात. याला दोन कारणें आहेत. एक तर त्यांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून असतो, आणि दुसरें म्हणजे ते केवळ लोकांबरोबर पुढे जाऊं शकतात. सर्व पुरोहित कणखर नसतात. लोक जर म्हणतील "दोन हजार देवतांचें प्रतिपादन करा," तर पुरोहित तसें करतील. जो लोकसमूह त्यांना पैसे देतो त्याचे ते सेवक असतात. ईश्वर त्यांना पैसे देत नाही. म्हणून पुरोहितांना दोष देण्यापूर्वी स्वत:लाच दोष द्या. तुमची जशी पात्रता असेल तसेंच शासन, तसाच धर्म व तसेच पुरोहित तुम्हांल लाभतील-- त्यांहून अणुभरहि सरस लाभणार नाहीत.

अशा रीतीने भारतांत महान् संघर्ष सुरू झाला आणि गीतेंत त्याचें एक पर्यवसित रूप दिसून येतें. जेव्हा सारा भारत दोन गटांत विभक्त होईल असें भय या संघर्षामुळे निर्माण झालें होतें तेव्हा श्रीकृष्ण पुढे आले आणि त्यांनी गीतेंत पुरोहितांचे धर्मविधि आणि इतर लोकांचें तत्त्वज्ञान यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. तुम्ही येशू ख्रिस्तांवर ज्याप्रमाणे प्रेम करतां, त्यांची पूजा करतां, त्याचप्रमाणे भारतांतील लोक श्रीकृष्णांवर प्रेम करतात, त्यांची पूजा करतात. फरक केवळ युगाच्या बाबतींत आहे. तुम्ही येशू ख्रिस्तांचा जन्मदिन जसा पाळतां तसाच हिंदु लोक श्रीकृष्णांचा जन्मदिन पाळतात. श्रीकृष्ण पांच हजार वर्षांपूर्वी होऊन गेले आणि त्यांचें चरित्र अद्भुत घटनांनी भरलेलें आहे. त्यांतील कांही घटना येशू ख्रिस्तांच्या आयुष्यांतील अद्भुत

घटनांसारख्या आहेत. बालक कृष्णाचा जन्म कारागृहांत झाला. पित्याने त्याला तेथून दूर नेलें आणि गुराख्यांत ठेवलें. त्या वर्षी जन्मलेल्या सर्व मुलांच्या वधाची आज्ञा देण्यांत आली. आज्ञा देणारा राजा ठार मारला गेला; तसें त्याच्या दैवांत लिहिलें होतें.

श्रीकृष्ण हे विवाहित होते. त्यांच्याविषयी हजारो ग्रंथ आहेत. त्यांत मला फारशी गोडी वाटत नाही. हिंदु लोक गोष्टी सांगण्यांत मोठे तरबेज आहेत. ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी बायबल-मधून जर एक गोष्ट सांगितली तर हिंदु वीस गोष्टी सांगतील. तुम्ही म्हणतां, "व्हेल माशाने जोनाला गिळलें;" हिंदु म्हणतात, "कोणींतरी हत्तीला गिळलें." . . . मीं बालपणासून कृष्णाच्या चरित्राविषयी गोष्टी ऐकल्या आहेत. मी हें गृहीत धरतों की कृष्ण नांवाचा एक मनुष्य होऊन गेला असला पाहिजे, आणि त्याने आपल्या मागे एक आश्चर्यकारक ग्रंथ ठेवला हें त्याच्या गीतेवरून कळून येतें. एखाद्या माणसाविषयी प्रसृत झालेल्या गोष्टींवरून आपण त्याचा स्वभाव समजूं शकतों हें मीं तुम्हांला सांगितलें. या गोष्टी आभूषणांसारख्या असतात. तुम्हांला असें आढळून येईल की या सर्व गोष्टी उत्तम रीतीने सजवलेल्या आणि कथानायकाच्या स्वभावरेखेशीं जुळतील अशा प्रकारें रचलेल्या असतात. बुद्धदेवांचें उदाहरण घ्या. त्यांच्या जीवनांतील मध्यवर्ती कल्पना 'त्याग' ही आहे. त्यांच्याविषयी हजारो लोककथा प्रचलित आहेत, परंतु प्रत्येक कथेंत त्यागाचा भाव दिसून येतो. लिंकन-विषयी हजारो गोष्टी आहेत; त्यांच्या कोणत्या ना कोणत्या स्वभावविशेषावर त्या प्रकाश पाडतात. तुम्ही सर्व गोष्टी घ्या व त्यांतील सामान्यभाव शोधून काढा, आणि तो त्या व्यक्तीच्या स्वभावाचा केंद्रस्वरूप स्वभावविशेष होता हें तुम्हांला कळून

येईल. श्रीकृष्णांच्या जीवनांत अनासक्ति हा केंद्रस्वरूप भाव आहे. त्यांना कांही नको असतें; त्यांना कशाची आवश्यकता नसते. ते कर्मासाठी कर्म करतात. "कर्मासाठी कर्म करा. उपासनेसाठी उपासना करा. भलें करणें चांगलें आहे, म्हणून भलें करा कशाचीहि अपेक्षा करूं नका." हा श्रीकृष्णांचा स्वभावविशेष असला पाहिजे. अन्यथा त्यांच्याविषयीच्या साऱ्या कथांमधे हा अनासक्तीचा एकच भाव दिसला नसता. गीता ही कांही त्यांची एकच एक शिकवणूक नव्हे. . . .

मला माहीत असलेल्यांपैकी ते सर्वांगपरिपूर्ण महापुरुष आहेत. मेंदू, हृदय व हात यांच्या शक्तीचा त्यांच्या ठायीं सारखाच व आश्चर्यकारक विकास झाला होता. त्यांच्या जीवनांतील प्रत्येक क्षण हा कर्मशीलतेने भरलेला आहे. केव्हा एक सभ्य गृहस्थ म्हणून, केव्हा योद्धा म्हणून, केव्हा मंत्री म्हणून, केव्हा आणखी कोणत्या रूपाने ते कार्य करीत असलेले आपल्याला दिसून येतात. सभ्य गृहस्थ म्हणून, विद्वान् म्हणून, कवि म्हणून ते थोर होते. ही सर्वांगपरिपूर्ण व आश्चर्यकारक कर्मशीलता, हृदय व मेंदू यांचा हा आश्चर्यकारक मिलाफ तुम्हांला गीतेंत व इतर ग्रंथांत आढळतो. त्यांचें अत्यंत विस्मयावह हृदय व त्यांची कमालीची सुंदर भाषा यांना तोड नाही. ह्या महापुरुषाच्या प्रचंड कर्मशीलतेचा ठसा अद्यापहि विद्यमान आहे. पांच हजार वर्षें लोटलीं आणि लक्षावधि कोटचवधि लोकांवर त्यांचा प्रभाव पडला आहे. तुम्हांला माहीत असो वा नसो, या महापुरुषाचा साऱ्या जगावर केवढा प्रभाव पडला आहे याची नुसती कल्पना करून पाहा. त्यांच्या निर्दोष सुज्ञत्वामुळे माझ्या मनांत त्यांच्याविषयी आदर आहे. त्यांच्या मेंदूत कोणत्याच प्रकारचीं जळमटें नाहीत, कोणतीहि खुळचट

समजूत नाही. प्रत्येक गोष्टीचा उपयोग त्यांना अवगत आहे आणि प्रत्येक गोष्टीचें योग्य स्थान त्यांनी दाखवून दिलें आहे. नुसती बडबड करीत जे इकडेतिकडे भटकतात, वेदांतील गूढ सत्यांविषयी जे पृच्छा करतात त्यांना सत्याचें ज्ञान नसतें. ते निव्वळ ढोंगी लोक असतात. वेदांत अज्ञानमूलक भोळसट समजुतींना सुद्धा वाव आहे सगळें रहस्य जर कशांत असेल तर तें प्रत्येक गोष्टीचें योग्य स्थान शोधून काढण्यांत आहे.

आणि नंतर श्रीकृष्णांचें हृदय पाहा. बुद्धदेवांच्या कितीतरी अगोदर होऊन गेलेले ते असे पहिले महापुरुष होते की ज्यांनी धर्माचें द्वार प्रत्येक जातीकरता खुलें केलें. त्यांची ती विस्मयकारक बुद्धि ! त्यांचें तें प्रचंड कर्मशील जीवन ! बुद्धदेवांचें कार्य एकाच पातळीवर होतें--ती म्हणजे शिकवणूक देण्याची पातळीं. आपली पत्नी व अपत्य आपल्याजवळ ठेवून त्यांना त्याचबरोबर उपदेशक होतां आलें नाही. श्रीकृष्णांनी भर समरांगणांत आपला उपदेश दिला. "अत्यंत उत्कट कर्मशीलतेंत ज्याला प्रगाढ शांतीचा अनुभव येतो आणि कमालीच्या शांत अवस्थेंत ज्याला उत्कट कर्मशीलतेचा अनुभव येतो तो सर्वश्रेष्ठ योगी आणि सर्वश्रेष्ठ ज्ञानी होय."* त्यांच्या भोवती अस्त्रें भिरभिरत असत, परंतु त्याचें त्यांना कांही वाटलें नाही. शांत, स्थिर राहून त्यांनी जीवनमरणाच्या समस्यांचें विवरण केलें. द्रष्टयांपैकी प्रत्येकजण हा स्वतःच आपल्या शिकवणुकीवरील उत्कृष्ट भाष्य असतो. तुम्हाला जर बायबलच्या नव्या संहितेचा अर्थ जाणून घ्यावयाचा असेल तर तुम्ही श्रीयुत अमुक यांच्याकडे जातां. परंतु या नव्या संहितेचे चार खंड तुम्ही पुनःपुनः वाचा आणि

* गीता ४-१८

त्यांत वर्णिलेल्या प्रभूच्या आश्चर्यजनक जीवनाच्या प्रकाशांत त्यांचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न करा. थोर महापुरुष विचार करतात आणि तुम्ही व मी देखील विचार करतों. परंतु दोहोंत फरक आहे. आपण विचार करतों, पण आपलीं शरीरें त्या विचाराचें अनुसरण करीत नाहीत. आपल्या क्रियांचा आपल्या विचारांशीं सुसंवाद असत नाही. जे शब्द वेद बनतात त्या शब्दांचें सामर्थ्य आपल्या शब्दांत नसतें. . . . हे महापुरुष ज्याचा ज्याचा म्हणून विचार करतात तें तें सिद्धीस जातेंच. ते जर म्हणाले, 'मी हें करतों' तर त्यांचें शरीर त्याप्रमाणे कार्य करतें. त्यांचें शरीर त्यांच्या पूर्णपणें ताब्यांत असतें. हेंच अंतिम लक्ष्य आहे. तुम्ही एका मिनिटांत स्वतः ईश्वर असल्याचा विचार करूं शकतां, परंतु तुम्ही ईश्वर होऊं शकत नाही. हीच अडचण आहे. ते जसा विचार करतात तसेच ते होतात; आपण क्रमाक्रमाने होऊं.

याप्रमाणे श्रीकृष्ण आणि त्यांचा काल यासंबंधी मीं तुम्हांला सांगितलें. पुढील व्याख्यानांत आपण त्यांच्या ग्रंथाविषयी अधिक माहिती करून घेऊं

---

# गीता—२

(सॅन फ्रान्सिस्को येथे २८ मे १९०० रोजीं दिलेलें व्याख्यान)

गीतेची भूमिका म्हणून थोडयाशा प्रस्तावनेची आवश्यकता आहे. हा प्रसंग कुरुक्षेत्राच्या रणांगणावर घडला. सुमारे पांच हजार वर्षांपूर्वी एकाच वंशाच्या दोन शाखा भारताच्या साम्राज्यासाठी एकमेकींशीं युद्ध करीत होत्या. पांडवांच्या पक्षाला न्याय होता, परंतु कौरवांच्या पक्षाला बळ होतें. पांडव पांचजण भाऊ होते. ते रानांत राहत होते. कृष्ण पांडवांचा सखा होता. कौरव सुईच्या अग्रावर राहील एवढीहि भूमि पांडवांना देईनात.

सुरुवातीचें दृश्य हें रणांगणाचें आहे. दोन्ही पक्षांना आपले आप्तमित्र दिसतात. एक भाऊ एका पक्षांत होता, तर दुसरा विरुद्ध पक्षांत. आजोबा एका पक्षांत होते, तर नातू दुसऱ्या पक्षांत. . . .आपलेच मित्र व आप्त दुसऱ्या पक्षांत असलेले जेव्हा अर्जुन पाहतो आणि आपल्याला आता यांना मारावें लागेल हें जेव्हा त्याला दिसतें तेव्हा त्याच्या हृदयाचा धीर सुटतो आणि तो म्हणतो, "मी लढणार नाहीं." याप्रमाणे गीतेचा आरंभ होतो.

या जगांत आपलें सर्वांचें जीवन म्हणजे सतत चालणारें युद्ध आहे. . . .कित्येक वेळां असें घडतें की आपलें दुर्बलत्व व भीरुत्व म्हणजे आपली क्षमाशीलता व आपला त्याग होय असा अर्थ आपल्याला करावासा वाटतो. भिकाऱ्याच्या त्यागाला कांही महत्त्व नाही. जो दणका देऊं शकतो अशा माणसाने जर क्षमा केली तर त्यांत कांही विशेषत्व आहे. ज्याच्याजवळ कांही आहे त्याने जर त्याचा त्याग केला तर त्याचें कांही महत्त्व आहे. आपल्याला हें माहीत आहे की आपल्या जीवनांत आपण कसे अने-

कदा आळशीपणाने व भित्रेपणाने युद्धांतून माघार घेतों आणि आपण शूर आहोंत अशी आपल्या मनाची भ्रामक समजूत करून घेण्याचा आपण प्रयत्न करतों.

गीता पुढील अत्यंत अर्थपूर्ण श्लोकाने सुरू होते : " ऊठ ! राजपुत्रा ! हें हृदय-दौर्बल्य, हा कमकुवतपणा टाकून दे. उठून उभा राहा आणि युद्ध कर. "[१] श्रीकृष्णांशीं युक्तिवाद करतांना अर्जुन उच्चतर नैतिक कल्पना पुढे मांडतो, अप्रतिकार हा प्रतिकारापेक्षा कसा श्रेष्ठ आहे इत्यादि विवेचन करतो. तो आत्मसमर्थन करण्याचा प्रयत्न करीत असतो, परंतु तो श्रीकृष्णाला चकवूं शकत नाही. श्रीकृष्ण हा परमात्मा वा ईश्वर आहे. अर्जुनाच्या युक्तिवादाच्या मुळाशीं काय आहे हें श्रीकृष्णांना तात्काळ दिसतें. याठिकाणीं दुर्बलता ही अर्जुनाच्या युक्तिवादा-मागील प्रेरकशक्ति आहे. अर्जुनास आपले आप्त दिसतात आणि तो त्यांच्यावर प्रहार करूं शकत नाही. . . .

भावना आणि कर्तव्य यांचे द्वंद्व अर्जुनाच्या हृदयांत उद्‌भवतें. पशु व पक्षी यांच्या अवस्थेच्या आपण जितके अधिक निकट असतों तितक्या अधिक प्रमाणांत आपण भावनेच्या नरकांत असतों. आपण त्याला 'प्रेम' अशी संज्ञा देतों. हें आत्मसंमोहन होय. आपण पशूंप्रमाणे आपल्या भावनांच्या काबूंत असतों. गाय आपल्या बछड्याकरता आपला जीव अर्पण करू शकते. प्रत्येक प्राणी तसें करूं शकतो. त्याचें काय ? पक्ष्यांच्या भावनेसारखी अंध भावना ही आपल्याला पूर्णत्वास नेऊन पोहोचवीत नाही. . . .शाश्वत स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेणें हेंच मानवाचें अंतिम लक्ष्य आहे तेथे भावनेला, भावनाविवशतेला अथवा इंद्रियांशीं संबंध असलेल्या

[१] गीता २–३

कोणत्याहि गोष्टीला वाव नाही––केवळ शुद्ध बुद्धीला तेथे वाव आहे. त्या ठिकाणीं मनुष्य आत्मस्वरूपांत प्रतिष्ठित होतो.

आता अर्जुन या भावनाविवशतेच्या आहारीं गेला आहे. तो जसा असावयास पाहिजे तसा नाही––म्हणजे तो थोर आत्मसंयमी असा ज्ञानी पुरुष नाही, बुद्धीच्या शाश्वत प्रकाशांत तो कार्य करीत नाही. तो एखाद्या पशूसारखा, एखाद्या बालकासारखा झाला आहे; तो आपल्या बुद्धीवर आपल्या भावनेचा पगडा बसू देतो; याप्रमाणे तो स्वत:लाच मूर्ख बनवून आपल्या दुबळेपणावर 'प्रेम' इत्यादि सुंदर शब्दांचें आवरण घालण्याचा प्रयत्न करीत आहे. श्रीकृष्णाला याच्या मागे काय आहे हें स्पष्ट दिसतें. कांही ज्ञान असलेल्या माणसाप्रमाणे अर्जुन बोलतो आणि बराच युक्तिवाद करतो, परंतु त्याच वेळीं तो मूर्खासारखें बोलत असतो.

"जे जिवंत आहेत वा जे मृत आहेत त्यांच्यासाठी पंडित शोक करीत नाहीत."[२] श्रीकृष्ण म्हणतात "तुला मृत्यु नाही किंवा मलाहि मृत्यु नाही. आपण अस्तित्वांत नव्हतों असा कोणताच काळ नव्हता. आपण अस्तित्वांत असणार नाहीं असा काळ कधी येणार नाही. या जन्मांत जसा मनुष्य बाल्यापासून आरंभ करून यौवन व वार्धक्य या अवस्थांतून जातो, तद्वत् मृत्युसमयीं तो निव्वळ दुसऱ्या प्रकारच्या शरीरांत प्रवेश करतो. त्यासाठी सुज्ञ माणसाला दु:ख करण्याचें काय कारण ?"[३] आणि ज्या भावविवशतेने तुला ग्रासलें आहे तिचा आरंभ कोठे आहे ? तो इंद्रियांत आहे. "इंद्रियांचा विषयाशीं संयोग झाला म्हणजे शीत, उष्ण, सुख, दु:ख हीं आपल्या अनुभवास येतात. तीं येतात

---

[२] गीता २–११ [३] गीता २–१२, १३

व जातात."[४] मनुष्य एका क्षणीं दुःखी असतो, तर दुसऱ्या क्षणीं सुखी. यामुळे तो आत्म्याचें स्वरूप अनुभवूं शकत नाही. . . .

"जें सत् आहे तें कधी असत् होऊं शकत नाही व जें असत् आहे तें कधी सत् होऊं शकत नाही. . . .म्हणून या समग्र विश्वाला जें व्यापतें तें अनादि, अनंत आहे हें तूं जाण. तें अविकारी आहे. विश्वांत असें कांहीहि नाही की जें या अविकारी वस्तूंत परिवर्तन घडवूं शकेल. जरी या शरीरास आदि व अंत आहे तरी त्यांत राहणारा आत्मा हा अनंत व अविनाशी आहे."[५]

हें जाणून ऊठ आणि युद्ध कर ! एक पाऊलहि माघार घेऊं नकोस. हीच मुख्य गोष्ट आहे. . . .कांहीहि होवो, तूं शेवट-पर्यंत लढ. आकाशांतील तारे खाली पडूं देत ! सारें जग आपल्या विरुद्ध उभें ठाकूं दे ! मरण म्हणजे केवळ वस्त्र बदलणें आहे. त्याचें काय ? म्हणून तूं लढ. भेकड होऊन तुमचा कांही फायदा होणार नाही. . . माघार घेतल्याने तुम्हांला कोणतेंच संकट टाळतां येणार नाही. जगांतील साऱ्या देवांची तुम्हीं रडून रडून प्रार्थना केली आहे पण तुमच्या दुःखाचा अंत झाला काय ? भारतांतील सर्वसामान्य जनता सहा कोटी देवांची रडून प्रार्थना करते आणि तरीहि त्यांना कुत्र्याचें मरण येतें. कोठे आहेत हे देव ? . . . तुमचा जेव्हा विजय होतो तेव्हा देव तुमच्या साहाय्याला येतात. मग त्यांचा काय उपयोग ? झुंजत झुंजत मरा. . . . माझ्या आत्म्या ! हें खुळचट समजुतींपुढे लोटांगण घालणें, हें स्वतःच्याच मनाचा गुलाम बनणें, तुला शोभत नाही. तूं अनंत आहेस, तुला जन्म नाही, मृत्यु नाही. तूं अनंत आहेस, म्हणून तुला गुलाम बनणें शोभत नाही. . . . ऊठ ! जागा हो ! उभा

[४] गीता २-१४ [५] गीता २-१६, १७, १८

राहा आणि लढ ! मरावें लागलें तर मृत्यूला तूं तोंड दे ! तुला साहाय्य करणारा असा कोणी नाही. तूंच सारें जग आहेस. तुला कोण मदत करूं शकेल ?

"जन्माआधी व मृत्यूनंतर प्राणी आपल्या इंद्रियांस अज्ञात असतात. केवळ या दोन अवस्थांच्या मधल्या अवधींत ते आपल्याला दिसतात. मग शोक करण्याचें काय कारण आहे ?"[६]

"कांहीजण आत्म्याकडे आश्चर्यानें पाहतात. कांही त्याच्याविषयी 'तो आश्चर्यकारक आहे' असें बोलतात. इतर त्याच्याविषयी आश्चर्यानें ऐकतात. आणखी दुसरे त्याच्याविषयी ऐकूनहि त्याला जाणत नाहीत."[७]

परंतु तूं जर म्हणत असशील की या सर्व लोकांना मारणें हें पाप आहे, तर याचा तूं आपल्या जातिधर्माच्या दृष्टीने विचार कर...."सुख-दुःख, जय-पराजय समान मानून तूं उभा राहा आणि लढ."[८]

गीतेच्या आणखी एका विशिष्ट तत्त्वाचा हा आरंभ आहे. तें तत्त्व अनासक्तीचें तत्त्व होय. म्हणजे असें की आपल्याला आपल्या कर्माचें जें फल भोगावें लागतें त्याचें कारण हें की आपण त्याविषयी आसक्ति बाळगतों... "केवळ जें कर्तव्यासाठी कर्तव्य म्हणून केलें जातें तें कर्म कर्माचें बंधन तोडून टाकूं शकतें. ..."[९] तुम्ही स्वधर्म जितका जास्त आचराल तितका चांगलाच, त्यांत अतिरेकाचें भय नाही ... "तुम्हीं या कर्मयोगाचें जरी स्वल्प आचरण केलेंत तरी हा योग तुम्हांला जन्म-मरणाच्या भयंकर फेऱ्यांतून वांचवील."[१०]

---

[६] गीता २–२८ [७] गीता २–२९ [८] गीता २–३८
[९] गीता २–३९ [१०] गीता २–४०

"अर्जुना, एकाग्र झालेलें मन यशस्वी होतें हें तूं जाण. ज्या मनांत हजारो विषयांचा विचार चालत असतो त्याची शक्ति विकीर्ण होते. कांही लोक आलंकारिक भाषा बोलूं शकतात आणि ते समजतात की वेदांपलीकडे दुसरें कांही नाही. त्यांना स्वर्गास जावयाचें असतें. त्यांना वेदांच्या सामर्थ्याद्वारा उत्तम गोष्टी हव्या असतात, म्हणून ते यज्ञयाग करतात."[११] अशा लोकांनी या सर्व भौतिक कल्पना टाकून दिल्याशिवाय त्यांना आध्यात्मिक जीवनांत कधीहि यश मिळणार नाही.[१२]

हा एक दुसरा मोठा पाठ आहे. भौतिक कल्पनांचा त्याग केल्यावांचून आध्यात्मिकता कधीहि प्राप्त होऊं शकणार नाही. ...इंद्रियांत काय आहे ? इंद्रियें म्हणजे सारा भ्रम आहे. लोकांना मरणोत्तरहि स्वर्गांत डोळे, नाक इत्यादि इंद्रियें राखून ठेवण्याची इच्छा असते. कांहीजण कल्पना करतात की त्यांना आता असलेल्या इंद्रियांपेक्षा स्वर्गांत अधिक इंद्रियें मिळतील. त्यांना अनंत कालपर्यंत सिंहासनस्थ ईश्वर पाहावयाचा असतो, त्या ईश्वराचें भौतिक शरीर पाहावयाचें असतें. . . .अशा लोकांच्या इच्छा शरीरासंबंधीच्या असतात; त्यांना अन्न, पेय, भोग हीं हवीं असतात. त्यांना या जगांतील भौतिक जीवनच स्वर्गांतहि हवें असतें. मनुष्याला या जीवनापलीकडे कशाचाहि विचार करतां येत नाही. हें जीवन शरीरासाठीच असतें. "अशा मनुष्याला मुक्तीप्रत पोहोचविणाऱ्या एकाग्रतेचा केव्हाच लाभ होत नाही."[१३]

"वेद केवळ सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या कक्षेंत असलेल्या गोष्टी शिकवितात." [१४] वेद केवळ प्रकृतीच्या अंत-

---

[११] गीता २–४१, ४२, ४३ [१२] गीता २–४४ [१३] गीता २–४४
[१४] गीता २–४५

र्गत असलेल्या गोष्टींविषयी शिकवितात. जें त्यांना पृथ्वीवर आढळत नाही अशा कशाविषयीच लोक विचार करूं शकत नाहीत. ते स्वर्गाविषयी बोलत असले तर ते सिंहासनावर राजा बसला आहे आणि लोक त्याच्या समोर धूप जाळीत आहेत असा विचार करतात. हें सर्व प्रकृतीच्या अंतर्गत आहे, हें प्रकृतीच्या पलीकडील नाही. म्हणून वेद हे प्रकृतीच्या पलीकडचें कांही शिकवीत नाहीत. "प्रकृतीच्या पलीकडे, जगांतील द्वंद्वांच्या पलीकडे, स्वत:च्या जाणिवेपलिकडे जा, चांगल्या-वाइटाची पर्वा करूं नकोस."[१५]

आपण स्वत:च्या शरीराशीं आपलें तादात्म्य करून टाकलें आहे. आपण निव्वळ शरीर आहोंत, अथवा शरीराचा आपल्यावर ताबा आहे. मला जर कोणीं चिमटा काढला तर मी ओरडतों. परंतु हें सर्व मूर्खपणाचें आहे, कारण मी आत्मा आहें. ही सारी दु:खाची मालिका, कल्पना, प्राणी, देव, राक्षस आणि इतर सर्व गोष्टी--हें सारें जग--हें सारें शरीराशीं आपलें तादात्म्य कल्पिल्यामुळे निर्माण होतें. मी आत्मा आहें. तुम्ही मला चिमटा काढलांत तर मी उडी कां मारतों ? . . .यांतील गुलामगिरीकडे लक्ष द्या. तुम्हांला या गोष्टीची लाज वाटत नाही काय ? आम्ही धार्मिक वृत्तीचे आहोंत ! आम्ही तत्त्वज्ञ आहोंत ! आम्ही ऋषि-मुनि आहोंत ! ईश्वर आमचें भलें करो ! काय आहोंत आपण ? आपण जिवंत नरक आहोंत. आपण पागल आहोंत !

आपल्याला देहबोध टाकून देतां येत नाही. आपण पृथ्वीला जखडलें गेलों आहोंत. . . .आपल्या कल्पना दफनस्थानांसारख्या आहेत. आपण जेव्हा शरीर सोडतों तेव्हा हजारो तऱ्हांनी आपण

---

[१५] गीता २–४५

त्यांच्याशीं बांधलेले असतों.

आसक्ति न बाळगतां कोण कर्म करू शकतो ? हाच खरा प्रश्न आहे. असा मनुष्य कार्यांत यशस्वी झाला काय किंवा अयशस्वी झाला काय, त्याच्या मनाची समता ढळत नाही. त्याने जीवनभर केलेलें कार्य एका क्षणांत जळून खाक झालें तरी त्याचें हृदय मुळीच विचलित होत नाही. "असा ज्ञानी पुरुष फळाची अपेक्षा न बाळगतां नेहमी कर्मासाठी कर्म करतो. याप्रमाणे तो जन्म-मृत्यूच्या दुःखापलीकडे जातो. अशा प्रकारें तो मुक्त होतों."[१६] मग त्याला उमगतें की आसक्ति म्हणजे सर्व भ्रम आहे. आत्मा कधीहि आसक्त होऊं शकत नाही. . . .नंतर तो सर्व शास्त्रें व दर्शनें यांच्या पलीकडे जातो.[१७] पुस्तकें व धर्म-ग्रंथ यांच्यामुळे भ्रान्त होऊन मन जर भोवऱ्यांत सापडत असेल तर या साऱ्या ग्रंथांचा काय उपयोग ? एक ग्रंथ अमुक सांगतो, तर दुसरा ग्रंथ तमुक सांगतो. तुम्ही कोणता ग्रंथ घ्याल ? एकटे उभे राहा ! स्वतःच्या आत्म्याचें ऐश्वर्य पाहा व आपल्याला कर्म करीत राहावें लागेल हें समजून घ्या. मग तुम्ही स्थिर बुद्धीचे व्हाल.[१८]

अर्जुन विचारतो, "स्थिर बुद्धीचा मनुष्य कुणाला म्हणावें ?"[१९]

श्रीकृष्ण उत्तर देतात, "ज्या मनुष्याने साऱ्या इच्छा सोडून दिल्या आहेत, जो कशाची इच्छा धरीत नाही, जो या जीवनाची, स्वाधीनतेची, देवांची, कर्मांची वा कशाचीच इच्छा धरीत नाही त्याला स्थिर बुद्धीचा वा स्थितप्रज्ञ म्हणावें. जेव्हा

---

[१६] गीता २–५१ [१७] गीता २–५२ [१८] गीता २–५३
[१९] गीता २–४५

तो संपूर्णतया संतुष्ट होतो तेव्हा त्याला कशाचीच इच्छा राहिलेली नसते."[२०] त्याने आत्म्याचा महिमा अनुभवलेला असतो, आणि त्याला हें कळलेलें असतें की जग, देव, स्वर्ग सर्वकांही त्याच्या आत्म्याच्या आंतच आहेत....मग देव हे देव उरत नाहीत; मृत्यु हा मृत्यु राहत नाही; जीवन हें जीवन राहत नाही; सर्वकांही बदलून जातें. " जेव्हा मनुष्याची बुद्धि स्थिर होते, जेव्हा त्याचें मन दुःखाने विचलित होत नाही, जेव्हा तो सुखाची इच्छा बाळगीत नाही, जेव्हा तो साऱ्या आसक्तीपासून, भयापासून व क्रोधापासून मुक्त होतो तेव्हा त्याला ज्ञानी म्हणावें...."[२१]

"ज्याप्रमाणे कासव आपले पाय आंत ओढून घेऊं शकतें, आणि तुम्हीं त्याच्यावर प्रहार केला तरी त्याचा एकहि पाय बाहेर येत नाही त्याचप्रमाणे ज्ञानी पुरुष आपलीं सर्व इंद्रियें आंत ओढून घेऊं शकतो;"[२२] आणि तीं कशानेच बाहेर ओढलीं जात नाहीत. त्याला कोणतेंच प्रलोभन वा दुसरें कांही विचलित करूं शकत नाही. सारें विश्व त्याच्या समोर कोलमडून पडलें तरी त्यामुळे त्याच्या मनांत लहानसा तरंगहि उठत नाही.

यानंतर एक महत्त्वाचा प्रश्न येतो. केव्हा केव्हा लोक कित्येक दिवस उपास करतात....वाईटांतील वाईट माणसाचा जेव्हा वीस दिवस उपवास होतो तेव्हा तो अगदी सौम्य होतो. उपासतापास करून स्वतःला क्लेश देण्याचा प्रघात साऱ्या जगभर लोकांनी आचरला आहे. श्रीकृष्णांचें मत असें आहे की हा सारा मूर्खपणा आहे. ते म्हणतात की जो मनुष्य स्वतःला क्लेश देतो त्याचीं इंद्रियें क्षणमात्र परावृत्त होतील, परंतु तीं पुनः वीसपट

---

[२०] गीता २-५५ [२१] गीता २-५६ [२२] गीता २-५८

जोराने वर उसळतील. . . .तुम्हीं काय करावयास हवें ? श्रीकृष्णांचें मत असें आहे की आपलें सर्वकांही 'स्वाभाविक' असलें पाहिजे, त्यांत देहदंड असू नये. काम करा, फक्त तुम्ही आसक्त होणार नाही याची दक्षता बाळगा. ज्याने अनासक्तीचें रहस्य समजून घेतलें नाही आणि जो त्याचें आचरण करीत नाही त्याची बुद्धि केव्हाच स्थिर होणार नाही.

मी बाहेर पडतों व माझे डोळे उघडतों. जर तेथें कांही असेल तर तें मला पाहावेंच लागतें. मला दुसरी गति नाही. मन इंद्रियांमागे धावतें. इंद्रियांनी स्वत:वर प्रकृतीची प्रतिक्रिया होऊं देतां कामा नये.

" इंद्रियांनी जखडलेल्या जगाच्यापक्षीं जेव्हा अंधारी रात्र असते तेव्हा संयमी मनुष्य जागा असतो त्याला तो दिवसाचा उजेड असतो . . .आणि जेव्हा जग जागें असतें तेव्हा ज्ञानी झोपलेला असतो." [२३] कोणत्या ठिकाणीं जग जागें असतें ?––इंद्रियांच्या ठिकाणीं. लोकांना खायला प्यायला हवें असतें, मुलें हवीं असतात आणि नंतर ते कुत्र्याच्या मरणाने मरतात. . .इंद्रियांप्रीत्यर्थ ते नेहमी जागे असतात. त्यांचा धर्म देखील केवळ त्याकरताच असतो. स्वत:ला साहाय्य करण्यासाठी ते एक देव शोधून काढतात––अशासाठी की त्याने त्यांना अधिक स्त्रिया, अधिक धन, अधिक मुलें द्यावींत. परंतु देवसदृश होण्यासाठी देवाने साहाय्य करावें यासाठी त्यांना देव नको असतो. "जेथे सारें जग जागें असतें तेथे ज्ञानी झोपतो. परंतु जेथे अज्ञानी झोपेंत असतात तेथे ज्ञानी जागा राहतो." प्रकाशाच्या राज्यांत जेथे मनुष्य स्वत:ला पक्षी, प्राणी, शरीर मानीत नाही, तर अनंत,

---

[२३] गीता २–६९

अमर असा आत्मा मानतो तेथे अज्ञानी झोपेंत असतात आणि त्यांना सत्याचें आकलन करण्यासाठी वेळ, बुद्धि वा शक्ति नसते; त्या प्रकाशाच्या राज्यांत ज्ञानी जागा असतो. तो त्याला दिवसाचा प्रकाश असतो.

"जगांतील साऱ्या नद्या ज्याप्रमाणे आपलें पाणी सर्वदा समुद्रांत ओतीत असतात, परंतु तरीहि भव्य, विशाल समुद्र ज्याप्रमाणे अविचलित राहतो, अविकृत राहतो त्याचप्रमाणे सारीं इंद्रियें जरी प्रकृतींतून नाना प्रकारच्या संवेदना घेऊन येतात तरी ज्ञानी पुरुषाचें समुद्रतुल्य हृदय मुळीच विचलित होत नाही, भयभीत होत नाही."[२४] दु:खांच्या लाखो नद्या येवोत, सुखांच्या शेकडो नद्या येवोत ! मी दु:खाचा गुलाम नाहीं ! मी सुखाचा गुलाम नाहीं !

---

[२४] गीता २–७०

# गीता—३

( सॅन् फ्रान्सिस्को येथे २९ मे १९०० रोजीं दिलेलें व्याख्यान )

अर्जुन विचारतो तूं आताच कर्म करण्याचा उपदेश केलास आणि तरीहि तूं ब्रह्मज्ञान ही जीवनांतील सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे असें सांगतोस. कृष्णा ! जर तुझ्या मतें कर्मापेक्षा ज्ञान अधिक श्रेष्ठ असेल तर तूं मला कर्म करावयाला कशाला सांगतोस ?"[1]

श्रीकृष्ण म्हणतात--"प्राचीन काळापासून या दोन पद्धति आपल्यापर्यंत चालत आल्या आहेत. सांख्य तत्त्वज्ञानी ज्ञानाची पद्धति प्रतिपादतात. योगी कर्माची पद्धति प्रतिपादतात. परंतु कर्में टाकून कोणालाच शांति प्राप्त होत नाही. या जीवनांत कोणीहि क्षणभरसुद्धा कर्म थांबवूं शकत नाही. प्रकृकिचे गुण माणसाला कर्म करावयास भाग पाडतील. जो आपलीं कर्में थांबवितो, परंतु त्यांचें चिंतन मात्र चालूं ठेवतो तो कांहीच प्राप्त करूं शकत नाही. तो केवळ ढोंगी बनतो. परंतु, जो आपल्या मनाच्या शक्तीने आपलीं इंद्रियें हळूहळू नियत्रणाखाली आणतो आणि त्यांना कर्मांत गुंतवून ठेवतो तो मनुष्य अधिक चांगला. म्हणून तूं कर्म कर." . . .

"तुम्हांला कांहीच कर्तव्य नाही, तुम्ही मुक्त आहां हें रहस्य तुम्हांला कळलें असलें तरी तुम्हांला इतरांच्या भल्याकरता कर्म करावयास हवें. कारण, थोर व्यक्ति जसें आचरण करतात तसेंच आचरण सामान्य लोक करीत असतात."[3] ज्याला मनःशांति व मुक्ति प्राप्त झाली आहे असा थोर मनुष्य जर कर्म टाकील तर इतर सर्व ज्ञानहीन, शांतिहीन लोक त्याच्या अनुकरणाचा प्रयत्न

---

[1] गीता ३–१ [2] गीता ३–२ ते ८ [3] गीता ३–२०, २१

करतील आणि अशा प्रकारें गोंधळ उद्‌भवेल.

"बघ अर्जुना, माझ्याजवळ नाही असें कांहीच नाही; मला मिळवावयाचें आहे असेंहि कांही नाही. तरी मी कर्म करणें चालू ठेवतों. मीं क्षणभर कर्म थांबवलें तर सारें विश्व उध्वस्त होईल. अज्ञानी जें फलेच्छापूर्वक करतात, लाभाच्या हेतूने करतात तें कोणत्याहि आसक्तीवांचून, फलाच्या वा लाभाच्या इच्छेवांचून ज्ञानी माणसाने करावयास हवें."[४]

"तुम्ही ज्ञानी असलांत तरी अज्ञान्यांची लहान मुलांच्या श्रद्धेसमान असणारी श्रद्धा विचलित करूं नका. उलट, त्यांच्या पातळीपर्यंत खाली जाऊन क्रमाक्रमाने त्यांना वर आणा."[५] हा फार शक्तिशाली विचार आहे, आणि भारतांत तो आदर्श बनला आहे. म्हणून तुम्हांला थोर तत्त्वज्ञ मंदिरांत जातांना व मूर्तींचें पूजन करतांना आढळतो; तो ढोंगीपणा नसतो.

पुढे एका ठिकाणीं श्रीकृष्णांनी म्हटलें आहे--"जे इतर देवतांची पूजा करतात ते सुद्धा खरें म्हणजे माझीच पूजा करीत असतात."[६] ज्याची मानव पूजा करतो तो साक्षात् परमेश्वर असतो. तुम्ही परमेश्वराला चुकीच्या नांवाने संबोधलेंत तर काय तो रागावेल? तो मग परमेश्वरच राहणार नाही. तुम्हांला कळत नाही काय की मनुष्याच्या हृदयांत जें कांही असतें तो परमेश्वरच असतो, मग तो दगडाची कां पूजा करीत असेना? त्याचें काय विशेष?

धर्म हा कांही ठराविक मतांचा बनलेला असतो या कल्पनेपासून आपण एकदा सुटका करून घेतली म्हणजे वरील गोष्ट आपल्याला अधिक स्पष्टपणें कळेल. धर्माविषयी अशी एक कल्पना

---

[४] गीता ३-२२ ते २५ [५] गीता ३-२६, २९ [६] गीता ९-२३

चालत आलेलीं आहे की ॲडमने सफरचंद खाल्लें म्हणून साऱ्या जगाची उत्पत्ति झाली, त्यांतून सुटकेचा कोणताच मार्ग नाही. येशू ख्रिस्तांवर विश्वास ठेवा--एका विशिष्ट व्यक्तीच्या मृत्यूवर विश्वास ठेवा ! परंतु, भारतांत धर्माविषयीची कल्पना अगदी वेगळी आहे तेथे धर्म म्हणजे आत्मसाक्षात्कार होय. दुसरें कांही नाही. गंतव्य स्थळीं कोणी चार घोडयांच्यां वाहनांतून गेला काय, विजेच्या गाडींतून गेला काय किंवा भुईवर लोळत लोळत गेला काय, कांहीच बिघडत नाही. गंतव्य स्थान एकच आहे. ख्रिस्ती लोकांपुढे मोठा प्रश्न म्हणजे भयंकर अशा परमेश्वराच्या क्रोधापासून कशी सुटका करून घ्यावयाची हा असतो. भारतीय लोकांपुढे प्रश्न हा असतो की, आम्ही वस्तुतः जें आहोंत तें कसें व्हावयाचें ! आमचें हरपलेलें आत्मस्वरूप कसें परत मिळवावयाचें ? . . .

तुम्ही आत्मा आहां याची तुम्हांला प्रतिति झाली आहे काय ? 'मी करतों' असें जेव्हा तुम्ही म्हणतां तेव्हा 'मी'चा काय अर्थ असतो ? ज्याला 'शरीर' म्हणतात तो मांसाचा पिंड, की अनंत, आनंदस्वरूप, स्वयंप्रकाश, अमर असा आत्मा ? तुम्ही सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ असाल, परंतु जोंपर्यंत 'मी शरीर आहें' अशी तुमची कल्पना असते तोंपर्यंत तुमच्या पायाखालून सरपटणाऱ्या कीटकाहून तुम्ही अणुमात्रहि श्रेष्ठ नाही ! तुम्ही कांही सबब दाखवूं शकत नाही ! तुम्हांला सगळीं दर्शनें 'ठाऊक आहेत' आणि त्याच वेळीं 'मी शरीर आहें' असें तुम्ही मानतां हें तर आणखीच वाईट आहे. तुम्ही शरीराला देव मानणारे आंहात ! हा काय धर्म आहे ?

धर्म याचा अर्थ आत्म्याला आत्मा म्हणून ओळखणें, त्याचा

अनुक्रम ....७५९२३.... दि: ............१०/७/२०१०
क्रमांक ...२०८८.... नोंद दि. ................
२०/३/०९


साक्षात्कार करून घेणें हा आहे. सध्या आपण काय करीत आहोंत ?––नेमकें उलट. आपण आत्म्याला जडद्रव्य समजतों. अमर अशा ईश्वराला आपण अचेतन जडवस्तु समजतों आणि अचेतन जडद्रव्याला आपण आत्मा मानतों. . . .

स्वत:च्या डोक्यावर उभें राहून वा एका पायावर उभें राहून किंवा तीन तीन डोक्यांच्या प्रत्येक जर अशा पांच हजार देवांची पूजा करून जर तुम्हांला ब्रह्मसाक्षात्कार होत असेल तर तें चांगलेंच आहे ! . . .ज्या मार्गानें जमेल त्या मार्गानें ब्रह्म-साक्षात्कार करून घ्या. कोणालाच या बाबतींत कांही म्हणण्याचा अधिकार नाही. म्हणून श्रीकृष्ण म्हणतात की जर तुमची पद्धति अधिक चांगली व वरच्या श्रेणीची असेल तर दुसऱ्याची पद्धति वाईट आहे असें म्हणण्याचें तुम्हांला कांही कारण नाही––मग दुसऱ्याची पद्धति तुम्हांला कितीहि दुष्ट कां न वाटो.

तसेंच, आपण हें समजून घ्यावयास हवें की धर्म म्हणजे विकास होय, तो कांही मूर्खपणाच्या शब्दांचा समूह नव्हे. दोन हजार वर्षांपूर्वी एका माणसाने ईश्वर पाहिला. मोझेसने जळत्या झुडुपांत ईश्वर पाहिला. मोझेसला जेव्हा ईश्वराचें दर्शन झालें तेव्हा त्याने जें कांही केलें त्याने तुमचा उद्धार होईल काय ? कोणत्याहि माणसाला घडलेलें ईश्वरदर्शन हें तुम्हांला उत्तेजित करून ईश्वरदर्शन करून घेण्यास प्रवृत्त करण्यापलीकडे रतिभरहि साहाय्य करीत नाही. प्राचीनांच्या उदाहरणांची एवढीच उप-युक्तता आहे, याहून अधिक नाही. हीं उदाहरणें म्हणजे केवळ मार्गदर्शक पाटचा आहेत. कोणाहि माससाच्या खाण्याने दुसऱ्या माणसाची भूक दूर होत नाही. कोणाहि माणसाच्या ईश्वर-दर्शनाने दुसऱ्या माणसाला मुक्ति प्राप्त होत नाही. तुम्हांला

स्वतःच ईश्वरदर्शन करून घेतलें पाहिजे. हे सगळे लोक ईश्वराचें रूप कसें आहे यावर रणें माजवतात. त्याला एकाच शरीरांत तीन डोकीं आहेंत की सहा देहांत पांच डोकीं आहेत हा यांच्या वादाचा विषय असतो ! "तुम्हीं ईश्वर पाहिला आहे का ?" "नाही."...आणि आपण त्याला पाहूं शकूं यावरहि या लोकांचा विश्वास नसतो. आपण मर्त्य मानव केवढे मूर्ख आहोंत ! निश्चित मूर्ख आहोंत ! पागल आहोंत !

भारतांत परंपरेने हा विचार चालत आला आहे की जर ईश्वर असेल तर तो तुमचाहि ईश्वर असेल व माझाहि ईश्वर असेल. सूर्य कोणाचा आहे ? तुम्ही म्हणतां "सॅमकाका सर्वांचा काका आहे." ईश्वर असेल तर तुम्हांला त्याला पाहतां आलें पाहिजे. ईश्वर जर पाहतां येत नसेल तर त्याचा काय उपयोग आहे ?

प्रत्येकाला आपली पद्धति सर्वश्रेष्ठ वाटते. फार छान ! परंतु ध्यानांत ठेवा की ती तुमच्यापक्षीं चांगली असेल. एखाद्याला मुळीच न पचणारा खाद्यपदार्थ दुसऱ्या एखाद्याला सहज पचूं शकतो. एखादी पद्धति तुमच्यापक्षीं चांगली आहे एवढ्याच आधारावर एकदम असा निष्कर्ष काढूं नका की ती सर्वांनाच उपयोगी पद्धति आहे. जॅकचा कोट जॉन व मेरी यांच्याहि अंगांत बसेल असें म्हणूं नका. सर्वंच अशिक्षित, असंस्कृत असलेल्या व विचारशील नसलेल्या स्त्रीपुरुषांच्या अंगावर एकाच प्रकारचा तंग कपडा चढविण्यांत आला आहे ! तुम्ही स्वतः स्वतंत्रपणें विचार करा. निरीश्वरवादी बना, जडवादी बना, तें अधिक चांगलें ठरेल! मनाचा उपयोग करा....अमुक माणसाची पद्धति चुकीची आहे, असें म्हणण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ? ती तुमच्या

दृष्टीने चुकीची असेल. म्हणजे तुम्हीं जर तिचा अवलंब केला तर तुम्ही खालच्या स्तरावर घसराल. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की त्या पद्धतीचा अवलंब केल्याने त्या दुसऱ्या माणसाचा अधः-पात होईल. म्हणून श्रीकृष्ण म्हणतात की तुम्ही ज्ञानी असलां आणि तुम्हांला एखादा मनुष्य दुबळा आढळला तर तुम्ही त्याचा धिक्कार करूं नका. शक्य असल्यास त्याच्या स्तरावर जाऊन त्याला साहाय्य करा. त्याचा विकास व्हावयास हवा. पांच तासांत मी त्याच्या डोक्यांत ज्ञानाच्या पांच बादल्या ओतूं शकतों. परंतु त्याचा काय उपयोग ? त्याची स्थिति पहिल्यापेक्षा आणखी थोडी वाईटच होईल.

कर्माचें हें सारें बंधन कोठून येतें ? याचें कारण हें की आपण आत्म्याला कर्माशीं निगडित करतों. आमच्या भारतीय पद्धतीस अनुसरून दोन वस्तु आहेत : एका बाजूस प्रकृति व दुसरीकडे आत्मा. 'प्रकृति' या शब्दाने केवळ हें सारें बाह्य जगत् तेवढें अभिप्रेत नाही, परंतु आपला देह, मन, बुद्धि, इतकेंच नव्हे तर आपला अहंकार, हें सारें त्या शब्दाने अभिप्रेत आहे. त्या सर्वां-पलीकडे अनंत चैतन्य आणि आत्म्याचा प्रकाश आहे. . . . या तत्त्वज्ञानानुसार आत्मा हा प्रकृतीपासून पूर्णतया वेगळा आहे, निरंतर वेगळा होता, सर्वदा वेगळा राहील. . . .आत्म्याचें मनाशीं देखील तादात्म्य कधीहि कल्पितां येऊं शकत नाही. . . .

तुम्ही जें अन्न सेवन करतां त्याने सर्वकाल तुमचें मन तयार होत असतें हें अगदी उघड आहे. मनसुद्धा एक जडवस्तु आहे. अन्नाशीं आत्म्याचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाही. तुम्हीं खाल्लें वा खाल्लें नाही याने आत्म्याचें कांही बिघडत नाही. . . . तुम्हीं विचार केला वा केला नाही यानेहि कांही बिघडत नाही.

तो आत्मा अनंत प्रकाशस्वरूप आहे. त्याचा प्रकाश नित्य समान असतो. उजेडासमोर तुम्ही निळी वा काळी कांच धरली तर त्या उजेडाचा त्या कांचेशीं काय संबंध ? त्या उजेडाचा रंग अपरिवर्तनीय आहे. मनांतच परिवर्तन घडत असतें व त्यामुळे रंग बदलत असतात. ज्या क्षणीं आत्मा शरीराला सोडून जातो त्या क्षणीं शरीर नाश पावतें.

प्रकृतींतील सत्तत्त्व आत्मा हें होय. आत्मचैतन्य वा हें सत्तत्त्व आपल्या शरीराच्या व मनाच्या द्वारें हालतें, बोलतें आणि सर्वकांही करतें. आत्म्याच्या सत्तेवर, शक्तीवर, चैतन्यावर प्रकृतीकडून अनेक प्रकारांनी कार्य घडतें. . . . आपल्या सर्व विचारांचें, शारीरिक क्रियांचें व आपल्या इतर सर्व गोष्टींचें आत्मा हेंच कारण आहे; परंतु त्याला चांगल्यावाइटाचा, सुखदुःखाचा, शीतोष्णाचा, प्रकृतींतील कोणत्याहि द्वंद्वाचा स्पर्श होत नाही. तरीहि तो आपला प्रकाश प्रत्येक वस्तूला पुरवीत असतो.

"म्हणून अर्जुना, या सर्व क्रिया प्रकृतींत आहेत. . . .प्रकृति आपले नियम आमच्या शरीरांत व मनांत कार्यान्वित करीत असते. आपण प्रकृतीशीं स्वतःचें तादात्म्य करून म्हणतों, 'मी हें करीत आहें.' अशा रीतीने मोह आपल्याला ग्रासतो."[७]

आपण नेहमीच कोणत्या ना कोणत्या सक्तीच्या दडपणाखाली कर्म करीत असतों. जेव्हा भूक मला भाग पाडते तेव्हा मी खातों; आणि दुःख भोगणें ही याहूनहि वाईट गुलामगिरी आहे. खरा 'मी' सर्वदा मुक्त असतो. कांही करावयास त्याला कोण भाग पाडूं शकेल ? दुःख अनुभवणारा हा प्रकृतीच्या कक्षेंत असतो. जेव्हा आपण स्वतःचें शरीराशीं तादात्म्य करतों तेव्हाच

---

७ गीता ३–२७

केवळ आपण मूर्खाप्रमाणे म्हणतों, "मी दुःख अनुभवीत आहें, मी श्री. अमुक अमुक आहे" इत्यादि. परंतु ज्याला सत्य कळलें आहे तो स्वतःला या सर्व गोष्टींपासून वेगळें ठेवतो. त्याचें शरीर कांहीहि करो, त्याचें मन कांहीहि करो, तो त्याची पर्वा करीत नाही. परंतु लक्षांत ठेवा की बहुसंख्य मानव या भ्रमाच्या तडाख्यांत सापडलेले असतात आणि तेव्हा जेव्हा ते कांही चांगलें करतात तेव्हा तेव्हा त्यांना असें वाटतें की आपण त्याचे कर्ते आहोंत. त्यांना अद्यापि उच्च तत्त्वज्ञानाचें आकलन करणें शक्य नसतें. त्यांची श्रद्धा विचलित करूं नका ! ते वाईट टाळीत आहेत, चांगलें आचरीत आहेत ही थोर कल्पना आहे ! त्यांना तसें करूं द्या. . . .ते भल्यासाठी खपणारे आहेत. क्रमाक्रमाने त्यांना कळून येईल की भलें करण्याहूनहि श्रेष्ठ अशी एक गोष्ट आहे. ते नुसते 'साक्षी' म्हणून राहतील, आणि कार्यें पार पडतील. . . . हळूहळू त्यांना हें उमगेल. सर्व वाईट टाळून व सर्व चांगलें करून झाल्यानंतर त्यांना असा प्रत्यय येऊं लागेल की आपण साऱ्या प्रकृतीच्या पलीकडे आहोंत. ते 'कर्ते' नाहीत. ते दूर उभे राहतात. ते केवळ साक्षी असतात. . . .ते निव्वळ दूर उभे राहून पाहतात. प्रकृति सारें विश्व निर्माण करते. . . .मग ते आपली पाठ फिरवितील. "हे प्रिय वत्सा ! आरंभीं केवळ सत् होतें. दुसरें कांहीहि अस्तित्वांत नव्हतें. आणि त्याने चिंतन केल्यावर सर्वकांही निर्माण झाले."[८]

"जे मार्ग जाणतात तेहि आपल्या स्वभावाने प्रेरित होऊन कर्म आचरतात. प्रत्येकजण आपल्या स्वभावाप्रमाणे वागतो. त्याला त्याच्या पलीकडे जातां येत नाही." अणु नियम मोडूं

[८] छांदोग्य उपनिषद् ६–२–२, ३

शकत नाही. तो मानसिक अणु असो वा भौतिक अणु असो, त्याला नियम पाळलाच पाहिजे. "बाह्य निग्रहाचा काय उपयोग ?"[१]

जीवनांत कशालाहि मोल येतें तें कशाने ? भोगाने वा मालकीने नव्हे. प्रत्येक गोष्टीचें विश्लेषण करा. तुम्हांला असें आढळून येईल की आपल्याला अनुभव प्राप्त करून देण्याव्यतिरिक्त कोणत्याहि गोष्टीचें मूल्य नाही. त्या गोष्टीला मोल आहे तें यामुळे की तो आपल्याला कांही शिकविते; आणि कित्येक वेळां आपल्याला सोसावे लागणारे क्लेश हे आपल्याला सुखभोगाहूनहि चांगला अनुभव प्राप्त करून देतात. अनेकदा प्रकृतीचे तडाखे हे तिच्या सुखद स्पर्शाहून अधिक चांगला अनुभव आपल्याला देतात. . . .दुष्काळाला सुद्धा स्थान व मोल आहे. . .

श्रीकृष्णांच्या मतानुसार आपण नुकतेच अस्तित्वांत आलेले नवीन जीव नाहीं. आपलीं मनें हीं नवीं मनें नाहीत. . . .आधुनिक कालांत आपण सर्व जाणतों की प्रत्येक मूल आपल्याबरोबर केवळ मानवजातीचाच नव्हे, तर वनस्पतिजीवनाचा भूतकाळ घेऊन येतें. जीवनाचे सारे अध्याय, प्रस्तुतचा अध्याय व भविष्यांतील सारे अध्याय जीवापुढे असतात. प्रत्येकाचा मार्ग निश्चित केलेला असतो, योजलेला असतो. आपल्याला माहित नसलें तरी कारणावांचून कोणतीहि घटना घडत नाही, कोणतीहि अवस्था निर्माण होत नाही. . . .आपण अज्ञानी असतों, एवढेच. कार्यकारणभावाची समग्र अनंत शृंखला ही एका दुव्यात दुसरा, त्यांत तिसरा या क्रमाने प्रकृतीशीं निगडित असते. सारें विश्व अशा प्रकारच्या शृंखलेने जखडलेलें असतें. ती विश्वव्यापी कार्यकारण

---

[१] गीता ३–३३

शृंखला आहे; तिचा एक दुवा वा एक भाग तुमच्या हातीं आला आहे, तर दुसरा माझ्या हातीं. आणि तो भाग म्हणजेच आपला स्वभाव होय.

आता श्रीकृष्ण म्हणतात--"दुसऱ्याच्या मार्गाचा अवलंब करण्यापेक्षा स्वतःचा मार्ग आक्रमीत असतां मृत्यूला वरणें अधिक चांगलें." [१०] हा माझा मार्ग आहे आणि हा मी इकडे खालच्या बाजूला आहें. तुम्ही तिकडे खूप वरच्या बाजूला आहांत. मला अनेक वेळां मोह होतो की आपण आपला मार्ग सोडून द्यावा. माझ्या मनांत येतें की 'मीं तुमच्याकडे यावें व तुमच्या बरोबर राहावें.' आणि मी जर वर गेलों तर 'ना तिकडे ना इकडे' अशी माझी अवस्था होते. आपण या तत्त्वाचें विस्मरण होऊं देतां कामा नये. हा सर्व विकासाचा प्रश्न आहे. धीर धरा, विकास करून घ्या आणि मग तुम्ही सर्वकांही प्राप्त कराल; अन्यथा मोठें आध्यात्मिक संकट तुमच्यावर येऊन कोसळेल. या ठिकाणीं धर्म शिकविण्याचें मूलभूत रहस्य आहे.

'लोकांचा उद्धार करणें' आणि 'सगळ्यांनी एकाच मतावर विश्वास ठेवणें' ह्या तुमच्या म्हणण्याचा काय अर्थ आहे? तसें होऊं शकत नाही. कांही सर्वसाधारण तत्त्वें सर्वांना शिकविलीं जाऊं शकतात. खरा शिक्षक तुमच्यासाठी तुमचा स्वभाव काय आहे तें शोधून काढूं शकेल. संभवतः तो तुम्ही जाणत नाही. तुम्ही ज्याला आपला स्वभाव समजतां तो तुमचा स्वभाव नसणें शक्य आहे. तुमच्या स्वभावाची तुम्हांला जाणीव झालेली नसते. शिक्षकाला तुमचा स्वभाव कळला पाहिजे. . . .तुमच्या चेहऱ्याकडे दृष्टिक्षेप करतांच त्याला तो जाणतां आला पाहिजे

---

[१०] गीता ३-३५

आणि त्याने तुम्हांला तुमचा मार्ग दाखवून दिला पाहिजे. आपण इकडेतिकडे चाचपडत असतों, धडपडत असतों, सर्व प्रकारच्या गोष्टी करीत असतों; आणि योग्य वेळ येऊन स्वधर्माच्या प्रवाहांत पडून त्याबरोबर ओढले जाईपर्यंत आपली मुळीच प्रगति होत नाही. त्या प्रवाहांत पडल्याची खूण ही आहे की ज्या क्षणीं आपण त्यांत पडूं त्या क्षणीं आपण सहज वाहूं लागूं. त्यानंतर संघर्ष होणार नाही. हा प्रवाह आपण शोधून काढावयास हवा. तो सापडल्यावर आपण शेवटपर्यंत त्यांतच राहिलें पाहिजे, तो टाकून आपण दुसऱ्या प्रवाहाचा आश्रय घेऊं नये.

याऐवजी आपण एखादा धर्म सुरू करतों, विशिष्ट मतांचा एक समूह तयार करतों, आणि मानवजातीच्या आदर्शाशीं बेईमानी करतों व सगळ्यांचा स्वभाव एकाच प्रकारचा आहे असें समजून सर्वांशीं वागतों. कोणत्याच दोन व्यक्तींचें शरीर वा मन समान नसतें. . . .कोणत्याच दोन व्यक्तींचा धर्म एकच असूं शकत नाही. . . .

तुम्हांला धार्मिक व्हावयाचें असेल तर कोणत्याच संघटित धर्मांच्या द्वारांत प्रवेश करूं नका. ते लोकांचें जेवढें हित करतात त्याच्या शतपटीने लोकांचें अनिष्ट करतात, कारण ते प्रत्येकाच्या वैयक्तिक विकासाची गति खुंटवितात. अभ्यास प्रत्येक गोष्टीचा करा, परंतु आपलें आसन स्थिर राखा. माझा उपदेश ऐकणार असाल, तर तुम्ही आपली मान खोड्यांत अडकवून घेऊं नका. ज्या क्षणीं ते आपला फास तुमच्या गळ्याभोवती टाकण्याचा प्रयत्न करतील त्या क्षणीं आपली मान फासांतून मोकळी करून घ्या आणि कोठेतरी दुसरीकडे जा. जसा पुष्कळ फुलांमधून मध गोळा करणारा भुंगा स्वतंत्र राहतो, कोणत्याहि फुलाशीं तो

बांधला जात नाही तसेच तुम्हीहि बांधले जाऊं नका. . . .कोणत्याहि संघटित धर्मांत प्रवेश करूं नका. धर्म ही केवळ तुम्ही व तुमचा परमेश्वर यांमधील बाब असते, आणि कोणत्याहि तिसऱ्या व्यक्तीला तुम्हां दोघांत पडण्याचें कांही कारण नाही. या संघटित धर्मांनी काय केलें आहे याचा विचार करा ! या धार्मिक छळापेक्षा कोणता नेपोलियन अधिक भयप्रद होता ? . . .तुम्हीं व मीं संघटना केली तर आपण दोघेहि प्रत्येक व्यक्तीचा द्वेष करावयास आरंभ करतों. जर प्रेम करणें याचा अर्थ दुसऱ्यांचा द्वेष करणें असा असेल तर प्रेम न करणें चांगलें. तें प्रेमच नव्हे. तो नरक आहे ! आपल्या लोकांवर प्रेम करणें म्हणजे त्यांच्याव्यतिरिक्त इतरांचा द्वेष करणें असेल, तर तो निव्वळ स्वार्थीपणा ठरेल, पशुत्वाची पराकोटी ठरेल आणि परिणामीं तुम्ही पशु व्हाल. म्हणून आपल्या स्वाभाविक धर्माचें आचरण करीत असतां मृत्यु आला तरी चालेल, परंतु दुसऱ्याचा स्वाभाविक धर्म तुम्हांला कितीहि थोर भासला तरी त्याचें अनुसरण करूं नका.''[११]

''अर्जुना, लक्षांत ठेव की काम आणि क्रोध हे मोठे शत्रु आहेत. यांना ताब्यांत ठेवावयास हवें. जे सुज्ञ आहेत त्यांच्याहि ज्ञानावर हे दोघे आवरण घालतात. हा कामाग्नि न विझणारा अग्नि आहे, त्याचें स्थान इंद्रियांत व मनांत आहे. आत्म्याला कशाचीच इच्छा नसते.''[१२]

''हा योग प्राचीन काळीं मी विवस्वानाला (सूर्याला) सांगितला. विवस्वानाने तो मनूला सांगितला. . . . अशा प्रकारें ज्ञान एका राजाकडून दुसऱ्या राजाकडे चालत आलें. परंतु कालाच्या ओघांत हा थोर योग नष्ट झाला. म्हणूनच मी तो

---

[११] गीता ३–३५ [१२] गीता ३–३७, ४०

तुला आज फिरून सांगत आहें."[१३]

मग अर्जुन म्हणाला, "तूं असें कां बोलतोस ? तूं तर कालपरवा जन्माला आला आहेस; आणि विवस्वान् तर तुझ्या किती तरी अगोदर जन्मला होता. मग 'मीं विवस्वानाला शिकविलें' या तुझ्या म्हणण्याचा अर्थ काय ?"[१४]

नंतर श्रीकृष्ण म्हणाले, "अरे अर्जुना, तूं व मीं जन्म-मरणाचे पुष्कळदा फेरे केले आहेत, परंतु तुला त्या सर्वांचें ज्ञान नाही. मी अनादि, अज व साऱ्या सृष्टीचा सर्वसत्ताधारी प्रभु आहें. मी आपल्या प्रकृतीच्या साहाय्याने रूप धारण करतों. जेव्हा जेव्हा धर्माची ग्लानि होते व अधर्म प्रबल होतो तेव्हा तेव्हा मी मानवजातीला साहाय्य करण्यासाठी भूलोकीं येतों. साधूंच्या रक्षणासाठी, दुष्टतेच्या निर्दालनासाठी, आध्यात्मिकतेच्या प्रस्थापनेसाठी मी वेळोवेळीं येतों. जो कोणी माझ्याकडे कोणत्याहि मार्गाने येण्याचा प्रयत्न करतो त्याला मी त्याच मार्गाद्वारें भेटतों. परंतु अर्जुना, हें जाण की कोणीहि माझ्या मार्गापासून दुसरीकडे जाऊं शकत नाही."[१५] कोणीहि कधी दुसरीकडे गेला नाही. आपण कसें जाऊं शकूं ? कोणीच त्याच्या मार्गापासून दूर जात नाही.

...सर्व समाज हे सदोष सामान्यीकरणावर आधारलेले असतात. नियम हा निर्दोष सामान्यीकरणावरच आधारला जाऊं शकतो. प्रत्येक नियमाला अपवाद असतात या जुन्या म्हणीचा काय अर्थ आहे ? ...तो जर नियम असेल तर तो मोडला जाऊं शकत नाही. कोणीहि त्याचा भंग करूं शकत नाही. झाडावरून पडणारें फळ गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा भंग करतें काय ? ज्या

---

[१३] गीता ४–१, २, ३ [१४] गीता ४–४

[१५] गीता ४–५ ते ८, ११

क्षणीं नियमाचा भंग होतो त्या क्षणीं विश्वाचें अस्तित्व संपुष्टांत येतें. अशी एक वेळ येईल की जेव्हा तुम्ही नियम मोडाल, आणि त्या क्षणीं तुमची जाणीव, मन, शरीर या सर्वांचा विलय होईल.

कोणी एक इसम चोरी करीत आहे. तो कां चोरी करतो? तुम्ही त्याला शिक्षा करतां. तुम्ही त्याला वाव कां देऊं शकत नाही? तुम्ही त्याच्या शक्तीचा एखाद्या कार्याकडे उपयोग कां करून घेऊं शकत नाही? . . . तुम्ही त्याला म्हणतां, "तूं पापी आहेस." आणि पुष्कळजण म्हणतील की त्याने नियम मोडला आहे. ह्या मानवजातीच्या साऱ्या कळपाला जबरदस्तीने एकरूपता धारण करण्यास भाग पाडलें जातें आणि म्हणून साऱ्या कटकटी, सारें पाप व सारी दुर्बलता उत्पन्न होते. . . . तुम्हांला वाटतें तेवढें जग वाईट नाही. आपण मूर्खांनी त्याला वाईट बनविलें आहे. आपणच भुतें व राक्षस निर्मितों; आणि मग . . . आपण त्यांच्यापासून स्वतःची सुटका करून घेऊं शकत नाहीं. आपण आपल्या डोळयांवर हात ठेवतों व ओरडतों, "कोणीतरी आम्हांला प्रकाश दाखवा." मूर्खांनो! तुम्ही आपले हात डोळयांवरून बाजूला काढा. एवढेंच करण्याची जरूरी आहे. . . . आपण आपलें रक्षण करण्याकरितां देवांना पाचारतों आणि कोणीच स्वतःला दोष देत नाही. हीच तर दुःखाची गोष्ट आहे. समाजांत इतका वाईटपणा कां आहे? लोक या बाबतींत काय म्हणतात? देहबोध, सैतान आणि स्त्री-पुरुषभेद हीं या वाइटाचीं कारणें आहेत. या गोष्टी तुम्ही कां निर्माण करतां? त्या निर्माण करावयास तुम्हांला कोणीहि सांगत नाही. "हे अर्जुना! माझ्या मार्गापासून कोणीहि दूर जाऊं शकत नाही." आपण मूर्ख आहोंत व आपले मार्ग मूर्खपणाचे आहेत. आपल्याला या साऱ्या मायेंतून

जावें लागतें. ईश्वराने स्वर्ग बनविला आणि माणसाने स्वतःच नरक बनविला.

"कोणतेंहि कर्म मला स्पर्श करूं शकत नाही. मला कर्माच्या फळाची मुळीच इच्छा नाही. जो मला अशा रीतीने जाणतो त्याला रहस्य उमगतें आणि तो कर्माने बद्ध होत नाही. प्राचीन ऋषींना हें रहस्य अवगत होतें आणि त्यामुळे ते सुरक्षितपणें कर्मांत व्यग्र राहूं शकत. तूंहि त्याच पद्धतीने कर्म कर."[१६]

"जो उत्कट कर्मशीलतेंत प्रगाढ शांति अनुभवतो आणि प्रगाढ शांतींत तीव्रतेने कर्मशील असतो तो खरोखर सुज्ञ असतो."[१७] . . . प्रश्न असा आहे : प्रत्येक ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय कार्यमग्न असतें तेव्हा तुमच्या ठिकाणीं ती अत्यंत प्रगाढ शांति असते काय की जिच्यामुळे तुम्ही कशानेहि विचलित होत नाही ? बाजारांतील रस्त्यावर तुम्ही उभे आहांत. चोहोबाजूला कोलाहल चालू आहे, तुम्ही गाडीची वाट पाहत आहां. . . . अशा वेळीं तुम्ही शांत, स्वस्थ व ध्यानमग्न असतां काय ? तसेंच तुम्ही गुहेंत असतां तेव्हा तेथील शांतींत उत्कटतेने कर्मशील असतां काय ? तुम्ही तसे असाल तर तुम्ही योगी आहांत, अन्यथा नाही.

"ज्याचा प्रत्येक प्रयत्न लाभाच्या इच्छेपासून, स्वार्थपरतेपासून मुक्त असतो त्याला ऋषि लोक ज्ञानी असें म्हणतात."[१८] आपण जोंवर स्वार्थी आहोंत तोंवर आपल्याला सत्याची कधीहि प्राप्ति होणार नाही. आपण प्रत्येक गोष्टीला आपला स्वतःचा रंग चढवितों. वस्तु आपल्याकडे मूळ स्वरूपांत येतात त्या लपविलेल्या असतात असें नाही, मुळीच नाही. आपण त्या लपवितों. आपल्याजवळ रंगाचा कुंचला असतो. एखादी वस्तु आपल्याकडे येते,

---

[१६] गीता ४–१४, १५ [१७] गीता ४–१८ [१८] गीता ४–१९

आपल्याला ती आवडत नाही, आपण आपला रंगाचा कुंचला तिच्यावरून फिरवतों आणि नंतर तिच्याकडे पाहतों . . . . वस्तूचें स्वरूप जाणून घेण्याची आपली इच्छा नसते. आपण आपल्याच रंगाने सर्वकांही रंगवून टाकतों. सर्व कर्मांत प्रेरक शक्ति स्वार्थ ही असते. प्रत्येक वस्तु आपल्याकडून झाकली जाते. आपण एखाद्या रेशमी किडयासारखे आहोंत. तो आपल्याच शरीरांतून धागा काढून त्याचा कोसला तयार करतो, आणि काय आश्चर्य ! तो स्वत:च त्यांत अडकतो. स्वत:च्याच कर्माने तो बद्ध होतो. आपणहि तसेंच करीत आहोंत. ज्या क्षणीं आपण 'मी' म्हणतों त्या क्षणीं धाग्याचा आपल्याभोवती एक फेरा पडतो. जेव्हा आपण 'मी आणि माझे' म्हणतों तेव्हा आणखी एक फेरा पडतो. अशा रीतीने आपण अधिकाधिक बद्ध होत जातों . . . .

कर्मावांचून आपण एक क्षणहि राहूं शकत नाहीं. कर्म करा ! परंतु तुमचा शेजारी जेव्हा म्हणतो, "जरा येऊन मला मदत करा" तेव्हा तुमची जी भावना असते तीच स्वत:साठी कर्म करीत असतांना मनांत वागवा. तिच्याहून अधिक कांही नको. तुमच्या शरीराचें मूल्य दुसऱ्याऱ्या शरीरापेक्षा मुळीच अधिक समजूं नका. तुम्ही दुसऱ्यासाठी जें करतां त्यापेक्षा स्वत:साठी कांहीहि अधिक करूं नका. हाच धर्म आहे.

"ज्याचीं कर्में इच्छांनी व स्वार्थपरतेने रहित असतात त्याने ज्ञानाग्नीने सारा कर्मपाश भस्मसात् केलेला असतो. अशा पुरुषाला ज्ञानी म्हणावें."[१] 'पुस्तकें वाचल्याने हें साध्य होत नाही. गाढवाच्या पाठीवर समग्र ग्रंथालयाचें ओझें लादतां येईल. परंतु त्याने गाढव मुळीच विद्वान् होत नाही. पुष्कळ पुस्तकें वाचण्यापासून काय

---

[१] गीता ४–१९

लाभ ! "कर्माविषयीची सर्व आसक्ति टाकून देऊन, नित्यतृप्त राहून, लाभाची आशा न बाळगतां ज्ञानी मनुष्य कर्म करतो आणि तो कर्मापलीकडे असतो."[२०] . . .

आपल्या आईच्या गर्भाशयांतून मी विवस्त्र बाहेर आलों आणि विवस्त्र स्थितींतच मी परत जाईन. असहाय स्थितींत मी आलों आणि असहाय स्थितींत मी परत जाईन. आताहि मी असहाय आहें. आणि आपल्याला आपलें अंतिम लक्ष्य माहीत नाही. त्याचा विचार करणें हें आपल्याला भयप्रद वाटतें. आपल्या अशा चमत्कारिक कल्पना असतात ! पिशाच्च बोलावणाऱ्या एखाद्या 'माध्यमा'कडे आपण जातों आणि एखादें पिशाच्च आपल्याला साहाय्य करूं शकतें काय तें पाहतों. या दुबळेपणाचा विचार करा! पिशाच्चें, सैतान, देव, कोणीहि या, पण या ! आणि सर्व पुरोहित आणि लबाड लोक काय करतात ? ज्या क्षणाला आपण दुबळे होतों, नेमकें त्या क्षणाला ते आपल्याला गाठतात. आणि मग ते सगळ्याच देवांना घेऊन येतात.

मला असें आढळतें की माझ्या देशांतील एखादा मनुष्य बळकट होतो, शिक्षित होतो, तत्त्वज्ञ होतो आणि म्हणतो "हीं सारीं स्नानें व या साऱ्या प्रार्थना मूर्खपणाच्या आहेत." . . . त्या मनुष्याचे आई-वडील मरण पावतात. एखाद्या हिंदूला बसणारा हा सर्वांत भयंकर असा धक्का होय. मग तुम्हांला तो प्रत्येक घाणेरड्या डबक्यांत स्नान करतांना, मंदिरांत जातांना व तेथील धूळ चाटतांना आढळेल . . . . कुणीहि मला साहाय्य करा ! परंतु आपण असहाय आहोंत. कोणाकडूनहि आपल्याला साहाय्य मिळत नाही. हें सत्य आहे. मनुष्यांच्या संख्येपेक्षा देवांची संख्या अधिक

---

[२०] गीता ४–२०

आहे; आणि तरीहि साहाय्याच्या नांवाने पूज्य. आपल्याला कुत्र्याप्रमाणे मरण येत आहे. तरीहि साहाय्याचें नांव नाही. सर्वत्र पशुता, दुष्काळ, रोग, दुःख व आपत्ति हीं दिसून येतात! आणि सगळेच साहाय्यासाठी ओरडत आहेत. परंतु साहाय्याचें नांव नाही. तरीहि मनांत निराधार आशा बाळगून आपण सारेच साहाय्यासाठी किंचाळत असतों. अरेरे! किती ही दुर्दशा! किती भयंकर! तुम्ही आपल्या हृदयांत डोकावून पाहा. यांत संपूर्ण दोष आपला नसतो. या दुर्दशेचें अर्धें कारण आपले आईवडील असतात. या दुबळेपणानिशीं आपण जन्माला येतों आणि अधिकाधिक दुबळेपणा आपल्या डोक्यांत कोंबण्यांत येतो. आपल्याला पायरीपायरीने त्याच्या पलीकडे जायचें आहे.

आपण असहाय आहोंत असें वाटणें ही फार मोठी चूक आहे. कोणापासूनहि साहाय्याची अपेक्षा करूं नका. आपणच आपले साहाय्यक आहोंत आपण जर स्वतःला साहाय्य करूं शकलों नाहीं, तर दुसरा कोणी आपल्याला साहाय्य करणार नाही. . . . "तूं स्वतःच स्वतःचा एकमेव मित्र आहेस, तूं स्वतःच स्वतःचा एकमेव शत्रु आहेस. माझ्याशिवाय माझा दुसरा शत्रु नाही, माझ्याखेरीज माझा दुसरा मित्र नाही."[२१] हा शेवटचा व सर्वांत मोठा पाठ आहे, आणि तो समजून घ्यायला केवढा तरी दीर्घ अवधि लागतो! आपण तो ग्रहण केल्याचा भास होतो, आणि पुढच्याच क्षणीं जुनी लाट उसळते. पाठीचा कणा मोडून पडतो. आपण दुबळे बनतों आणि फिरून खुळचट समजुतींचा आधार घेण्याचा, दुसऱ्यापासून साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करतों. त्या प्रचंड दुःखराशीची कल्पना करा. हें सारें दुःख साहाय्य

---

[२१] गीता ६–५

मिविण्याच्या चुकीच्या कल्पनेमुळे उत्पन्न होत असतें. कदाचित् पुरोहित आपले परिपाठाचे कांही शब्द उच्चारतो व कांही मिळेल अशी अपेक्षा करतो. साठ हजार लोक आकाशाकडे पाहतात, प्रार्थना करतात आणि पुरोहिताला दक्षिणा देतात. याप्रमाणे महिन्यांमागून महिने ते आकाशाकडे पाहतात, प्रार्थना करतात व दक्षिणा देतात. .. या गोष्टीचा विचार करा! हा वेडेपणा नव्हे काय? तें दुसरें काय आहे? याला जबाबदार कोण आहे? तुम्ही खुशाल धर्मावर प्रवचन करा. परंतु अविकसित मुलांचीं मनें उत्तेजित करणें. . . . ! तुम्हांला त्याबद्दल शासन भोगावें लागेल. तुम्ही यथार्थत: काय आहांत याचा खोल विचार करून बघा. कोणाच्याहि डोक्यांत तुम्हीं जो जो दुबळेपणाचा विचार घातला असेल त्या प्रत्येकाची फेड तुम्हांला चक्रवाढ व्याज देऊन करावी लागेल. कर्माचा नियम आपलें ऋण वसूल केल्यावांचून राहणार नाही . . . .

या जगांत पाप एकच आहे; तें म्हणजे दुबळेपणा. मीं लहानपणीं मिल्टनचें 'पॅरॅडाइज लॉस्ट' हें महाकाव्य वाचलें होतें. त्यांत वर्णिलेल्या व्यक्तींपैकी मला जर कुणाबद्दल आदर वाटला असेल तर तो सैतानाबद्दल होय. जो माणूस कधीहि दुर्बल होत नाही, सर्व अडचणींना धैर्यानें तोंड देतो आणि झुंजत झुंजत धैर्यानें मरण्याचा निश्चय करतो त्यालाच संत म्हणावें.

उभे राहा आणि झुंजतां झुंजतां धैर्यानें मृत्यूस सामोरे जा! . . . एका खुळचटपणांत दुसऱ्याची भर टाकूं नका. येणाऱ्या वाइटांत तुमच्या दुबळेपणाची आणखी भर नको. एवढेंच मला साऱ्या जगाला सांगावयाचें आहे. शक्तिशाली व्हा! . . . तुम्ही पिशाच्चांविषयी व राक्षसांविषयी बोलतां. आपणच जिवंत राक्षस आहोंत. शक्ति व विकास हें जीवनाचें चिन्ह व दुर्बलता हें

मृत्यूचें चिन्ह आहे. जें कांही दुबळें असेल तें टाळा ! तें मृत्यु-समान आहे. सामर्थ्य, मग तें नरकांत वसत असेल तरी तेथून धुंडून घेऊन या ! जे शूर असतील तेच मुक्त होतील. जे साहसी असतील त्यांनाच त्यांचें ईप्सित प्राप्त होईल. जे अत्यंत शूर आहेत तेच मुक्ति प्राप्त करून घेण्यास पात्र असतात. कोणाचा नरक ? कोणाचे क्लेश ? कोणाचें पाप ? कोणाचा दुबळेपणा ? कोणाचा मृत्यु ? कोणाचा रोग ?

तुमचा ईश्वरावर विश्वास आहे. विश्वास ठेवावयाचा असेल तर तो खऱ्या ईश्वरावर ठेवा. "तूं पुरुष आहेस, तूं स्त्री आहेस, तूं यौवनाच्या सामर्थ्यानिशी चालणारा युवक आहेस. . . . तूं हातच्या लटपटणाऱ्या काठीचा आधार घेणारा म्हातारा मनुष्य आहेस."[२२] तूंच दुबळेपणा आहेस. तूंच भय आहेस. तूंच स्वर्ग व नरक आहेस. तूं चावा घेणारा सर्प आहेस. तूं भयरूपाने ये ! मृत्युरूपाने ये ! दुःखरूपाने ये ! . . .

सारा दुबळेपणा, सारें बंधन म्हणजे निव्वळ कल्पना आहे. एक शब्द बोला की तें अदृश्य होईल. दुबळे होऊं नका ! दुसरा मार्ग नाही. . . .ताठ उभे राहा आणि बलवान व्हा ! भय व खुळचट समजुती यांना थारा देऊं नका. सत्य आहे त्या स्वरूपांत त्याला तोंड द्या ! आपल्यावर येणाऱ्या विपत्तींतील सर्वांत वाईट विपत्ति जो मृत्यु तो जरी आला तरी खुशाल येऊं द्या ! धैर्याने झुंजतां झुंजतां मरण्याचा आपला निर्धार आहे. मला माहीत असलेला सगळा धर्म हाच आहे. मीं अजून तो प्राप्त करून घेतला नाही, परंतु त्यासाठी मी प्रयत्न करीत आहें. मी कदाचित् यशस्वी होणार नाहीं, पण तुम्ही कदाचित् व्हाल. वाट चालत राहा !

---

[२२] श्वेताश्वतर उपनिषद ४–३

जेथे एक दुसऱ्याला पाहतो, एक दुसऱ्याला ऐकतो, जेथे द्वैत असतें तेथे भय असणारच, आणि भय हेंच साऱ्या दुःखांची जननी आहे. जेथे कोणीच दुसऱ्याला पाहत नाही, जेथे सर्व 'एक'च आहे, तेथे दुःखी होईल असा कोणीच नाही.[२३] एकमेवाद्वितीय सद्वस्तुच विद्यमान आहे. म्हणून भिऊं नका. उठा, जागे व्हा आणि ध्येयसिद्धि होईपर्यंत थांबू नका !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...७५६२३... दि: ...१०।८।६१
क्रमांक ...२०९९... नों. दि. ...2013107
अ. क्र. ७३०५६
REFBK-0013756

---

[२३] छांदोग्य उपनिषद ७-२३, २४ (थोडा फेरफार करून)

# आमचें अन्य प्रकाशन

| | | रु.न.पै. |
|---|---|---|
| १. | श्रीरामकृष्ण-चरित्र-- | |
| | न. रा. परांजपे कृत--प्रथम भाग (चवथी आवृत्ति) | ४.२५ |
| २. | ,, ,, --द्वितीय भाग (तिसरी आवृत्ति) | ४.३७ |
| ३. | श्रीरामकृष्ण-वचनामृत--श्री. 'म' कृत (दुसरी आवृत्ति) | ५.५० |
| ४. | स्वामी विवेकानंद यांचें चरित्र-- | |
| | सुधारलेली दुसरी आवृत्ति . . . | ७.२५ |
| ५. | साधु नागमहाशय-चरित्र-(दुसरी आवृत्ति) . . | २.०० |
| ६. | हिमालयाच्या कुशींत--स्वामी अखंडानंद . . | २.५० |
| ७ | श्रीरामकृष्ण-वाक्सुधा--(पांचवी आवृत्ति) | |
| | स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित . . . | १.०० |
| ८. | स्वामी विवेकानंदांच्या आठवणी-(दुसरी आवृत्ति) . | १.७५ |

## स्वामी विवेकानंदकृत योगावरील पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ९. | ज्ञानयोग . . . . . . | ४.०० |
| १०. | राजयोग (पतंजलीच्या योगसूत्रविवरणांसह) . . | ३.०० |
| ११. | कर्मयोग-(तिसरी आवृत्ति) . . . . | २.१० |
| १२ | भक्तियोग-(दुसरी आवृत्ति) . . . . | १.७५ |
| १३. | प्रेमयोग . . . . . . | १.७५ |

## स्वामी विवेकानंदकृत विविध विषयांवरील लोकप्रिय पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १४. | कोलंबो ते अल्मोरा (भारतांत दिलेलीं व्याख्यानें) . | ६.२५ |
| १५. | स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत-- | |
| | (संकलक श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती) | ४.५० |
| १६. | स्वामी विवेकानंदांची पत्रें . . . . | ४.७५ |
| १७. | दैवी वाणी (Inspired Talks) . . . | २.७५ |
| १८. | बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें . . | २.२५ |
| १९. | आत्मसाक्षात्कार : साधना व सिद्धि . . . | २.२५ |
| २०. | युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी . . . | २.२० |
| २१. | धर्माचें विज्ञान आणि तत्त्वज्ञान . . . | २.०० |

| | | रु.न.पै. |
|---|---|---|
| २२. | स्वामी विवेकानंद यांच्या मुलाखती व प्रश्नोत्तरें | २.०० |
| २३. | भारतीय नारी-(दुसरी आवृत्ति) | २.०० |
| २४. | वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव | १.७५ |
| २५. | महापुरुषांच्या जीवनकथा-(सातवी आवृत्ति) | १.६२ |
| २६. | स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | १.६० |
| २७. | कविता | १.५० |
| २८. | वेदान्त आणि जीवन | १.२५ |
| २९. | पूर्व आणि पश्चिम | १.२५ |
| ३०. | सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना | १.०० |
| ३१. | माझे गुरुदेव (चवथी आवृत्ति) | १.०० |
| ३२. | शिकागो व्याख्यानें (चवथी आवृत्ति) | ०.९० |
| ३३. | आधुनिक भारत | ०.९० |
| ३४. | पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व | ०.६० |
| ३५. | सुबोध राजयोग | ०.६० |
| ३६. | हिंदुधर्माचें-नव-जागरण-(दुसरी आवृत्ति) | ०.५६ |
| ३७. | शिक्षण-(दुसरी आवृत्ति) | ०.५६ |
| ३८. | पवहारी बाबा-(दुसरी आवृत्ति) | ०.५० |

## पॉकेटसाईज पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ३९. | माझें जीवन आणि कार्य-स्वामी विवेकानंद | ०.६५ |
| ४० | माझ्या मोहिमेची योजना-स्वामी विवेकानंद | ०.५० |
| ४१. | विवेकानंद-वाणी-(चवथी आवृत्ति) | ०.९० |
| ४२ | स्वामी विवेकानंद म्हणतात- | ०.५० |
| ४३. | रामकृष्ण-संघ--ध्येय व इतिहास-स्वामी तेजसानंद | ०.७५ |

## स्वामी विवेकानंद ग्रंथावली

एकूण १० खंड

किंमत, संपूर्ण संच: कापडी बांधणी ९० रु., बोर्ड बांधणी ७० रु.

श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर-१